

म ग्रं स वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र २४१८
IRBK-0102418
IRBK-0102418

ग्रं.क्र. २३६६
२०९८
२९१.०९१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

११।५७

22 JUN 1971
5 NOV 1971
27 JAN 1973
2 DEC 1975
10 1979

क्र. क्र. २३८८
१५।११८ ९८

# नागपुरी गोष्टी

★

दि. वा. फडणवीस

IRBK-0102418
IRBK-0102418

लो क - सा हि त्य
८७ शिवाजी पार्क, मुंबई २८

१९४६

पहिली आवृत्ति, एप्रिल १९४६

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

Printed by Sharaf Atharali at the New Age Printing Press, 190B Khetwadi Main Road, Bombay 4, and published for Lok-Sahitya by Shakuntala Modak, 87 Shivaji Park, Bombay 28

१५१७७८

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय-शाखा.
क्र. क. २८९८ नों दि ........
वि. क्र५१...

# प्रस्तावनेची संधि साधून —

कुठल्याहि नव्या लेखकानें आपल्या लिखाणाची हुंडी वाचकांच्या पेढीवर वटवितांना एखाद्या प्रथितयश, नामवंत, प्रज्ञावंत, इत्यादि इत्यादि असलेल्या जाड्या साहित्यिकाच्या प्रस्तावनेचें ओळखपत्र घेऊन आलें पाहिजे असा सर्वसाधारण शिरस्ता आहे या शिरस्त्याला माझी फारशी हरकत नाहीं पुस्तक खपण्यासाठीं एखाद्या गोष्टीची मदत होत असेल तर त्याच्या आड येऊन प्रकाशकाच्या पोटावर पाय आणावा असा दुष्ट विचार माझ्यासारख्या मृदु अंतःकरणाच्या लेखकाच्या मनातहि येणें शक्य नाहीं परंतु कुठलाहि प्रथितयश, नामवंत, आणि प्रज्ञावंत लेखक माझ्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिणें शक्य नाहीं अशी माझी खात्री होती. एक ' कम्युनिस्ट झालेला ' लेखक, आणि त्याच्या पुस्तकाला महाराष्ट्रातील प्रथितयश लेखकानें प्रस्तावना लिहायची, ही गोष्ट घडणेंच नाहीं कुठलाहि प्रथितयश, नामवंत आणि प्रज्ञावंत असलेला लेखक आपल्या हातून असलें अपकृत्य घडूं देणार नाहीं

बरें, प्रथितयश, नामवंत आणि प्रज्ञावंत नसलेल्या एखाद्या इतरेजनाकडून प्रस्तावना लिहून घ्यावी तर जाहिरातीच्या दृष्टीनें बिचाऱ्या प्रकाशकाला त्याचा कांहींच उपयोग नाहीं अशा परिस्थितींत प्रस्तावनेच्या फंदांत न पडता तसेंच पुस्तक छापून वाचकांच्या हातीं द्यावें आणि त्यांनाच काय ती आपली किंमत करू द्यावी असा साहित्यिकाला न शोभणारा सरळ विचार करूनच मी स्वस्थ बसलों

एक

परंतु पुस्तक छापता छापतां प्रकाशकाच्या ध्यानात आलें कीं एका फॉर्माचा मजकूर कमी पडतो प्रस्तावना नसल्यामुळें हा घोटाळा निर्माण झाला होता अखेर प्रकाशकानीं फर्मावलें, " नाहीं तर नाहीं. गेला उडत तो प्रथितयश साहित्यिक. तुम्हीच लिहून काढा एक फर्मासपैकीं प्रस्तावना ' प्रकाशकाच्या या औदार्यानें मी अगदींच चाट झालो जिथें, आपण लिहिलेला कॉलम, अर्धा कॉलम मजकूरसुद्धा छापील महाराष्ट्राच्या, साहित्यक्षेत्रातील दलाल तयार होत नाहींत, तिथें हा गृहस्थ आपल्या गोष्टींचें एक पुस्तक प्रसिद्ध करून वर आख्खा फॉर्म प्रस्तावना लिहिण्यासाठी बहाल करतो याचा अर्थ काय ? पुस्तक बाहेर पडताच प्रचार--प्रचार--कलेचा खून--धावा हो,'धांवा ' अशी जी जबरदस्त बोंबाबोंब सुरू होइल त्याची तर या गृहस्थाला दिक्कत वाटत नाहींच, पण महाराष्ट्र साहित्यातील साऱ्या ऐरावताना हा खुशाल उडत जायला सांगतो ?

पण हा सारा विचार करीत बसून हातीं आलेली संधि घालवायला मी कांहीं दुधखुळा नव्हतों 'अशी झकपैकीं प्रस्तावना लिहून आणतों—' असें ऐसपैस आणि घसघशीत आश्वासन देऊन मी प्रकाशकाच्या समोरून सटकलों

* * *

प्रस्तावना लिहायची म्हणजे बऱ्याचशा गोष्टी कराव्या लागतात साहित्य-शास्त्र, रसचर्चा, लघुकथांचें तंत्र, कलेचे कटाक्ष, पुरोगामित्व, प्रतिगामित्व, वाङ्मयीन महात्मता, दुरात्मता, इत्यादि अनेक प्रकरणाची उलट सुलट चिवडा-चिवड करून कोलांट्या उड्या माराव्या लागतात परंतु गॅलरींतील शेवटल्या सीटवर बसून खेळ पाहण्यापलीकडे सर्कसीशी माझा कांहींच संबंध न आल्यामुळें वरील कार्य खुद्द रिंगणातच नित्य वावरणाऱ्या महाभागांकडेच सोपविलेलें बरें. पण मग प्रस्तावनाच कशी लिहायची हाहि मोठा बिकट प्रश्न नाहीं का ? वरील तत्वचर्चेच्या आणि विवेचनाच्या आडरानांत शिरण्याची सोय असल्यामुळेंच भोर संस्थानच्या युवराज युवराज्ञींनी लिहिलेल्या भिकार कवितांच्या एका संग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचें दिव्य वामनराव जोशांना मोठ्या हिंमतीनें पार पाडता आलं नाहीं का ? तसा प्रस्तावना सजविण्याचा आणखी एक मार्ग आहे तो म्हणजे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर लिहायचें परीक्षण अगोदरच लिहून तें पुस्तकाला जोडणे. परंतु गोष्टी मीच लिहिल्या असल्यामुळे तोहि मार्ग मला बंद आहे.

तेव्हां चर्चा आणि परीक्षण या दोन्ही आडवाटा सोडून, मी ज्या गोष्टी म्हणा किंवा इतर कांहीं म्हणा या पुस्तकाद्वारें वाचकाच्यापुढें मांडल्या आहेत त्यांच्याचविषयीं कांहीं तरी लिहितों.

या पुस्तकाला ' नागपुरी गोष्टी ' असें जें नाव देण्यात आलें आहे त्याची मपूर्ण जबाबदारी प्रकाशकावर आहे. माझा त्याच्याशीं कांहींहि संबंध नाहीं परंतु एका दृष्टीनें तें नाव मला आवडतें, कारण नागपुरी संत्री व नागपुरी लुगडी या दोहोंशीं त्याचें साम्य दिसतें नागपुरी संत्रीं अतिशय गोड व रसाळ असतात नागपुरी लुगडीं भलींभक्कम आणि टिकाऊ असतात वरील गुण माझ्या लिखाणात कितपत आहेत हें ठरविण्याची जबाबदारी मी स्वतःवर घेऊं इच्छीत नाहीं वाचकांनीच तें काय तें स्वतः ठरवावें

दुसऱ्याहि एका दृष्टीनें वरील नाव सार्थ आहे असें मला वाटतें, कारण यातील बहुतेक गोष्टी नागपुरात घडलेल्या किंवा न घडलेल्या आहेत त्यातील स्थळें नागपुरातील आहेत, त्यातील व्यक्ति नागपुरी आहेत, त्यातील वातावरण नागपुरी आहे, आणि त्यांतील भाषाहि बरीचशी नागपुरी आहे

नागपूरबद्दल लोकांच्या ( नागपूरबाहेरील ) मनात बरेच गैरसमज आहेत अशी माझी कल्पना आहे खूप कडक उन्हाळा, नागपुरी सत्रीं आणि डॉ मुंजे याशिवाय बाकी नागपुरात काहीच नाही अशी त्यांची साधारणत. समजूत असते या समजुतीला थोडा जरी धक्का पुढील पानांमधील मजकुरानें मिळाला तरी कृतकृत्य झाल्याचें समाधान माझ्या आत्म्याला लाभेल

नागपूर शहराचें श्रेष्ठत्व आणि महत्व पटवून देण्याची खटखट करायला मी कांहीं नागपुरांत भरलेल्या एखाद्या संमेलनाचा किंवा परिषदेचा स्वागताध्यक्ष नाही. तसें असतें तर ज्ञानेश्वरापासून तो तहत कृष्णशास्त्री घुल्यापर्यंतची सगळी परंपरा मी उगाळून काढली असती तसें असतें तर रामटेकच्या रामगिरीपासून तों माझ्या अंगणातील सडासामागे असलेल्या टेकाडापर्यंत सर्व इतिहासप्रसिद्ध आणि अप्रसिद्ध ठिकाणाचा मी उद्धार केला असता परंतु मला तसें करायचें नाहीं व जमावयाचेंहि नाहीं

नागपूर हें एक अत्यंत मागासलेलें, दरिद्री आणि घाणेरडें शहर आहे हें मी पहिल्याच दमात कबूल करून टाकतों तेथील रस्त्यांत धूळ असते आणि गल्ध्यांत घाण घरातील मुलें रस्त्यांतील धुळींत हुंदडत असतात आणि रस्त्यांवरील उकिरडे घरात ठाण मांडून असतात गावातील पाण्याच्या टाक्या कोरड्या ठणठणीत असतात व रस्त्यावर गंगा यमुना वाहात असतात घरात बसलें तर घाणीनें डोकें उठतें आणि बाहेर पडलें तर धुळीमुळें 'भीक नको पण कुत्रा आंवर' अशी अवस्था होते शहराच्या मध्यभागी असलेल्या शुक्रवार तलावातील पाणी

इतकें स्वच्छ कीं साप चावलेल्या इसमाला विषावर उतार म्हणून तें पाजायला कांहींच हरकत नाहीं मच्छराचा त्रास इतका कीं त्यापेक्षा मधमाशाना डिचवल्यामुळें त्याच्याकडून होणारे हाल अधिक सुसह्य वाटतात

नागपुरांत म्युनिसिपालिटी आहे त्याचप्रमाणें सरकारचें आरोग्यखातेंहि आहे पण शहराचें आरोग्यरक्षण आणि शहरसुधारणा याशिवाय इतर सर्व धंदे या महान संस्था करीत असतात

नागपूर जसें घाणेरडें आहे तसेंच तें दरिद्रीहि आहे. नागपूर स्टेशनाची भव्य इमारत पाहून जरी एखाद्याची नागपूरबद्दल भलतीच कल्पना झाली तरी बर्डीचा पूल ओलांडताच नागपूरचें भिकार स्वरूप दृष्टीला पडतें आणि भ्रमाचा भोपळा फुटतो मालगुजारी वाडा दुरून कितीहि भव्य दिसला तरी त्याचे वासे पोकळ असतात याचा तात्काळ अनुभव पटतो नागपुरात हवेल्या नसून अंधारकोठड्या आहेत, घरें नसून खुराडीं आहेत मालगुजार आणि मारवाडी यांच्या तावडीत सापडलेली नागपूरची साडेचार लाख जनता या खुराड्यांतून रहात असते त्यात उदराच्या बिळांपेक्षा जास्त प्रकाश नसतो आणि माणसाखेरीज इतर प्राणीच त्यात अधिक मोकळेपणानें वावरत असतात

या अठराविश्वे दारिद्र्याला साजेल अशीच तिळालाहि आकारमानांत लाजविणारी सांस्कृतिक प्रगति नागपुरात झालेली आढळते जनरलिस्सिमो आवारी जेव्हा उपास करतात तेव्हांच नागपुरात राजकीय चळवळ आहे अशी खबर बाहेरच्या जगाला लागते लोकनियुक्त मंत्र्याच्या कचेरीच्या कामाच्या फायली जेव्हा दिल्लीला वेश्येच्या घरात सापडतात तेव्हांच नागपूरचें नाव वर्तमानपत्रात गाजतें **महाराष्ट्र** आणि **तरुण भारत** अशी इनमिन दोन दैनिकें नागपुरांत आहेत. एक माडखोलकर, दुसरे पु य देशपांडे व अर्धे बेहेरे असे अडीच साहित्यिक नागपुरात राहतात तिथं अर्धा डझन कालेजे असून त्यात भुसावळपासून तों रायगढपर्यंत पसरलेल्या संबंध मध्यप्रांत वऱ्हाडातील विद्यार्थ्यांची सोय लावण्यात येते तीच कथा हायस्कुलाची आणि शाळांची.

या दारिद्र्य आणि अज्ञानाच्या खातेऱ्यात जर मवाल्याचें उमाप पीक पैदा झालें तर त्यात नवल नाहीं नागपुरात मवाली पुष्कळच आहेत बरेचसे मवाली पुढारी आहेत बरेचसे पुढारी मवाली आहेत

मच्छर, मवाली, मालगुजार, आणि मारवाडी यांच्या चौफेर माऱ्यात नागपूर सांपडलें आहे कुठल्याहि शहाण्या सुरत्याच्या दिमाखाचें दिवाळें

म्हार

निघायला एवढा मालमसाला पुरेसा आहे परंतु तरीहि नागपुरात बीरबला ( नागपुरातील एक इतिहास प्रसिद्ध वेडा )चे भाईबंद हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच सापडतील आणि म्हणूनच हीं पुढील पानें वाचकांच्या नजरेला पडत आहेत

नागपुरांत असलेल्या या मातबर परिस्थितींतहि अक्कलहुशारी शाबूत ठेवणारे, एवढेंच नव्हे तर त्या प्रतिकूल परिस्थितीशीं सतत टक्कर देणारे लोक नागपुरात आहेत म्हणूनच नागपूरबद्दल अभिमान वाटतो, प्रेम वाटतें. नागपुरातील गल्ह्या-बोळ घाणेरडे असतील परंतु त्या गल्ह्या आणि बोळी असल्या लोकांच्या आयुष्याशीं निगडीत झालेल्या आहेत त्या लोकांच्या कष्टमय जीवनाच्या स्मृति आणि त्यासाठीं त्यांनी केलेल्या अतुल संग्रामाचा इतिहास याच गल्ह्या-बोळातील धुळींत प्रतिबिंबित झाला आहे याच पुस्तकाच्या ३७ व्या पानावर असलेल्या गोष्टींतील मुसलमान पानवाला हा अशाच एका बोळातला रहिवासी आहे ५२ व्या पानावरील गोष्टींतला रामशरण भय्या हा सुद्धा एका बोळाच्या कोपऱ्यातच आपलें आयुष्य कंठीत असतो पान १२ वरील गोष्टींतील राधेचा पतीसुद्धा बगडगंज, शुक्रवारी, किंवा अशाच कुठल्या तरी दरिद्री मोहल्ल्यातील प्राथमिक शाळेंत तुम्हाला मास्तरकी उर्फ महारकी करताना आढळेल

नागपुरांतील झेंडा सत्याग्रहाचें प्रकरण प्रसिद्ध आहे गढवाल दिनाचा लढा झाला त्यावेळीं मी अगदीं लहान होतों पण तो प्रसंग अजूनहि माझ्या डोळ्यासमोर आहे महालाच्या चौकात आणि सिटी कॉलेज समोरील देवळाच्या चौथऱ्यावर लावून ठेवलेल्या मशीनगन्स अजूनहि मला दिसतात त्या प्रसगीं लाठीमाराला, घोड्यांच्या टापाना आणि गोळीबाराना तोंड देणारे लोक इतवारी बाजारात देशभक्तीचीं दुकानें मांडून बसलेले बनिये नव्हते किंवा दक्षिणामूर्तीच्या देवळांत बसून हिंदुधर्मसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचीं प्रवचनं झोडणारे सत महंतहि नव्हते ते याच गल्ह्या बोळातील खुराड्यांत जीवन कंठणारे साधेसुधे जीव होते १९२० सालची चळवळ मी पाहिली नाहीं १९३० सालच्या चळवळीच्या वेळींहि मी अगदींच लहान होतों पण माझ्याच वयाचीं लहान लहान मुलें हातात राष्ट्रीय निशाण घेऊन प्रभात फेऱ्या काढताना आणि पोलिसांच्या लाठ्या खातांना मी पाहिलीं आहेत कॉंग्रेसचीं बुलेटिन्स वाटण्याबद्दल वानरसेनेच्या कोवळ्या कोवळ्या मुलाना कोतवालींत पकडून नेत आणि वेताच्या छड्यानीं त्यांच्या ढुंगणाचीं चामडी पोलिस उधडून काढीत आणि तरीहि तीं

मुलें डगमगत नसत हीं मुलें कधीं हवेल्यात आणि महालात वागडलीं नव्हतीं. नागपूरच्या गल्लीबोळांतील घाणींतच त्यांच्या जन्म झाला होता आणि त्यांतच त्यांची वाढ झाली होती

अशा किती तरी अविस्मरणीय स्मृति या गल्ल्या बोळाशीं कायमच्या निगडित झाल्या आहेत. १९२७ सालची एक गोष्ट आठवते तो काल हिंदुमुसलमानांच्या दंग्याचा होता सबंध हिंदुस्थानप्रमाणें नागपुरातहि दंगा घडवून आणण्यात सरकारला आणि जातीय पुढाऱ्यांना यश आलें होतें मुसलमानाच्या मोहोल्ल्यात एकटा दुकटा हिंदु सापडला तर तो जिवंत परतणें कठीण, त्याचप्रमाणे हिंदूंच्या बालेकिल्ल्यात मुसलमान सांपडला तर तोहि वाचणें कठीण गोंड राजाच्या किल्ल्यासमोर असलेली काळीकरांची गल्ली म्हणजे हिंदूंची वस्ती त्या गल्लींतून एक म्हातारा मुसलमान एक दिवस घाबरत घाबरत चालला होता जिवावर उदार होण्याइतकें कुठल महत्वाचें काम त्यावेळीं त्याला होतें कुणाला ठाऊक गल्लीच्या तोंडाशीच तीन चारशें लोकाच्या एका जमावानें त्याला अडविलें. दंग्याच्या काळात मवालीच जनतेच पुढारी बनतात त्यांत नागपुरात मवाल्यांची पैदासहि भरपूर तेव्हा या जमावातहि मवाल्याचें प्रमाण भरपूर होतें बिचारा म्हातारा भीतीनेंच अर्धमेला झाला होता क्षणातच बाकीच्या अर्ध्या भागाचीहि पूर्ती झाली असती, परंतु तेवढ्यांतच एक हिंदु तरुण हातात एक दांडकें घेऊन त्याना आडवा झाला एका निशस्त्र, म्हाताऱ्या मनुष्याला एकटा गाठून त्याचा खून करण्याच्या या भ्याड प्रयत्नाचा त्यानें इतक्या तीव्र शब्दात निषेध केला कीं जमावातील जे मवाली नव्हते त्याना आपल्या कृत्याची लाज वाटली जे मवाली होते त्यांना त्याच्या लुकड्या हातातील दांडक्याची आणि एकट्यानेंच त्या म्हाताऱ्याचे रक्षण करण्याची तयारी बाळगणाऱ्या त्याच्या हिंमतीची धास्ती बसली त्यानंतर पुन्हां त्या भागात असा एकट्या दुकट्याचा कुणी खून केला नाहीं

अंत करणाच्या अगदीं खोल भागात कायमचें स्थान पटकावून बसणाऱ्या अशा कैक घटना या नागपूरच्या गल्लीबोळात घडलेल्या आहेत माणुसकी आणि शौर्य याचा जास्तींत जास्त संग्रह याच गल्लीबोळातून आढळतो १९४२ सालीं झालेल्या चळवळींत नागपुरांत जेवढी भयंकर दडपशाही झाली तेवढी इतर ठिकाणीं क्वचितच झाली असेल आणि त्याला कारणहि तसच होतें तीन दिवस नागपुरात ब्रिटिशाचें राज्यच नव्हतें असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं पण हा पराक्रम कुणी केला ? कुणी या दडपशाहीला तोंड दिलें ? चिटणीसपार्कात आज जोरजोरानें गर्जना करून त्या क्रांतीचें श्रेय उपटू पाहणारे त्यावेळी

आपल्या बॉकर रोडवरील घरात दडून बसलेले होते त्यांनीं हा लढा केलेला नाहीं. नागपूरच्या गळ्याबोळातील अज्ञात जनतेनेंच त्यावेळीं नागपूरच्या रस्त्यावर बॅरिकेड्स उभारलीं होतीं

उन्हाळा सर्वी आणि मुंजे यांचें नागपूर हें खरें नागपूर नव्हे गळ्या-बोळातील नागपूर हेंच खरें नागपूर आहे अत्यंत दरिद्री, अत्यंत मागासलेले, परंतु शूर असें हें नागपूर आहे प्राण पणाला लावणे हा त्यांना खेळ वाटतो त्यात आपण कांहीं मोठें कृत्य केलें अशी जाणीवहि कधीं त्यांच्या मनाला शिवत नाहीं कस्तुरीमृगाला ज्या प्रमाणें आपल्या पोटातील सुवासाचा पत्ता नसतो त्याच-प्रमाणें या साध्या सरळ लोकाना आपल्या शौर्याची माहिती नसते रोजच्या कल-हपूर्ण जीवनांतली एक गोष्ट अशाच रीतीनें तो या घटनांकडे बघत असतो बंगालपर्यंत आपला दरारा बसविणाऱ्या भोसल्यांच्या परंपरेंतील सगळा चांगला भाग तेवढा या नागपूरनें उचलला आणि वाईट तेवढा त्या दुसऱ्या नागपूरनें उच-लला असें हा प्रकार पाहून वाटतें

नागपूरच्या गळ्या बोळांतील हा शूर माणूस मनानेंहि तितकाच दिलदार आणि प्रेमळ असतो कुठल्याहि गल्लींतील चार फूट उंचीच्या झोंपड्यांत तुम्ही शिरा, बाहेरच्या कट्ट्यावर चिलिमीचा दम मारीत बसलेला गृहस्वामी तुम्हाला, गुळाचा काळाकळीत कां होईना, चहा पाजल्याशिवाय उठूं देणार नाहीं त्या चहाचा रंग, रूप आणि चव तुमच्या डोळ्यापुढें उभी राहून तुम्ही हे आदरा-तिथ्य टाळण्याचा प्रयत्न कराल, परंतु तुमच्या या आढेवेढ्यांना तुमचा विनय समजून तो या सबबींना मुळींच दाद देणार नाहीं आणि अखेर तो चहा तोंड अजिबात वाकडें न करतां घशाखालीं ओतण्याचें दिव्य तुम्हाला पार पाडावें लागेल चहा संपताच जवळच्या बिंडलांतील एक विडी काढून तो तुमच्यापुढें करील परंतु तुम्ही विडी ओढत नाहीं, तुम्हाला ती चालत नाहीं असें पाहताच तो कनवटीचा पैसा काढून आपल्या सुपुत्राकडे फेंकील आणि ओरडेल " अरे, जा रे बाब्या, जरा महाराजांसाठीं सिगारेट घेऊनशान ये " पोरगा पैशाच्या दोन वाल्या गोल्डफ्लेक कंपनीच्या किंवा 'नेव्ही कट' च्या दोन पांढऱ्या रंगाच्या विड्या तुमच्यापुढें आणून ठेवील तो सिगरेट नामधारी पदार्थ पेटवून त्याचा एक दम मारताच तुम्हाला असा ठसका बसेल कीं त्यापेक्षा विडीच ओढली असती तर बरें झालें असतें असें वाटून तुम्हांला पश्चात्ताप होईल

ह आदरातिथ्य जरा बिकट आहे, परंतु त्यांतून तुमची सुटका होणार

नाहीं तुम्ही सकाळीं जा, संध्याकाळीं जा, कीं मध्यरात्रीं जा, चहा आणि विडी ही तुम्हाला मिळालीच पाहिजे, एवढा पाहुणचार घडलाच पाहिजे मग तो पाहुणा ५०० मैल लांबून आला असो की पाच फुटावरच वास्तव्य करून राहिलेला असो.

नागपुरात तुम्ही कुणाकडे गेला आणि जेवण मिळाल्याशिवाय परतला असे कधीं घडणेंच शक्य नाहीं पाहुणा अगदीं मध्यरात्रीं का टपकेना, घराची मालकीण तेवढ्या रात्रीं उठेल, चूल पेटवील, स्वयपाक करील आणि त्याला जेवायला घालील घरी आलेल्या पाहुण्याला खाणावळीचा मार्ग दाखविणें ही नागपुरात नुसती कमीपणाचीच गोष्ट समजली जात नाहीं, तर तें माणुसकीच्या अभावाचें लक्षण आहे असें मानलें जातें. हा प्रकार नुसता पाहुण्यापुरताच मर्यादित नाहीं, तर सर्वसाधारण आहे कुणीहि कुठल्याहि वेळेला जावें आणि जेवण्याची तयारी दर्शवावी की त्याचें जेवण तयार असतें जेवणाच्या वेळी घरी कुणीहि आला कीं त्याचें पान तिथे पडलेंच म्हणून समजावें घरीं वाट पाहात राहातील म्हणून त्यानें नकार केली तर अरे, घरी काय आणि इथे काय, कुठेंहि जेवले तरी सारखेंच ' असें उत्तर त्याला मिळालेंच म्हणून समजावें आणि या उत्तरावर अपील नसतें.

नागपुरातील लहान मुलें सहसा कधीं आपल्या घरी जेवत असतील किंवा नाहीं याची शंकाच येते माझे वडील आपल्या लहानपणीं घरच्या पेक्षां शेजारच्या सोनाराकडेच जास्त असत असें मी नेहमीं ऐकत असतो खुद्द मी स्वत शेजारच्या माळणीकडे पडला असे तिचा नवरा गिरणींत होता ती स्वत केळीचीं पानें विकण्याचा धंदा करी सकाळीं ८ वाजता न्याहारी करून ती दुकानावर जाई त्यावेळीं मी बहुधा तिथेंच असे तिच्या भाकरींत माझा वांटा असायचाच तिच्याबरोबर भाकरी खाऊन आणि तिच्याच कडेवर बसून मी बाजारात जाई दुपारचे १२ वाजेपर्यंत ती आपला धंदा आणि मी या दोघानाहि एकदमच सांभाळण्याचा पराक्रम करीत असे

तिचा नवरा गांजेकस होता, दारुड्या पण होता तो दारू पिऊन आला म्हणजे तिला खूप बडवीत असे पण ती मुद्दा गडकऱ्यांची सिंधु नव्हती ती चांगली लढाऊ स्त्री होती तो तिच्या झिज्या उपटी तर ती केरसुणीनें त्याचें पेकाट सडकून काढी पण हें युद्ध तेवढ्या पुरतेंच मर्यादित असे त्याची दारू उतरली कीं ताबडतोब तह होऊन युद्ध बंद होई दारूच्या धुंदींत बायकोला मारणाऱ्या या इसमाचा मोहल्ल्यातील लोकाना सुद्धां इतर वेळीं

कसलाच उपद्रव नसे एकदा मोठी मौज झाली मी हायस्कुलात असतानाची गोष्ट आम्ही सकाळीं उठून फिरायला जात असूं आम्ही घरून निघायचे त्यावेळीं उजाडलें सुद्धा नसे असेच एक दिवस अधार असतानाच आम्ही घराबाहेर पडलो त्यावेळीं मोहल्ल्यांत चोराचा उपद्रव सुरू झालेला होता. माळणीच्या नवऱ्याने आम्हाला दारासमोर अधारात उभे असलेले पाहिलें आणि धरून अशी एक मुस्काडात ठेवली की जन्मभर त्याची याद राहावी. त्या राकट मागसाचा मार पडताच आम्ही बोंबाबोंब सुरू केली आणि मोहल्ल्यातील सगळे लोक कंदिल घेऊन जमा झाले कदिलाच्या प्रकाशात आम्ही दृष्टीस पडतांच त्याला आपली चूक उमगून आली आणि मग तो इतका शरमिंदा झाला की कित्येक दिवस आम्हाला तोंड दाखवीत नव्हता अखेर आम्हालाच त्याची समजूत घालून त्याला बोलता करावें लागलं.

असे हे साधे आणि सीध्या अत करणाचे लोक नागपूरच्या गल्ल्यागल्ल्या-तून राहात असतात त्या गल्ल्या बोळाचें आणि त्यातील लोकाचे वर्णन करण्याचा, त्याच्याबद्दल लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे हे सगळे लोक साधे आहेत आणि साहित्यशास्त्राच्या नियमाप्रमाणें लेखनाचा विषय होण्याला नालायक आहेत, हें मला माहित आहे आणि मान्यहि आहे कसल्याहि कलाकृतीचे नायक व्हायला ते धीरोदात्त पुरुष नाहींत की देवगणातील प्राणी नाहींत त्यांच्या आयु-ष्यात नंदनवन फुलली होतीं की नव्हतीं तें मला माहित नाही काश्मिरी गुलाब त्याच्या कधी दृष्टीलाहि पडले नव्हते चादण्यातील चोरटी कुजबुज, प्रीतीचीं गूढगुंजनें, प्रणयाचा मुक्तछंद, इत्यादि इत्यादि भानगडी त्याच्या आयुष्यांत घडल्या नाहींत त्याच्या हृदयांत कधीं दर्या उफाळला नाहीं, तुफान उठलें नाहीं कीं नहिनीच्या नित्याना हात घालून ते कधीं दिव्य भव्य अतराळात तरगले नाहींत ते कधीं समरप्रसंगांत सांपडले नाहींत कीं पेचप्रसगांत त्यांनीं कधीं रामटेकच्या डाकबगल्यात फाजीलपणा केला नाहीं कीं कधीं तेलखेडीच्या तलावांत गळ्यात गळा घालून जीव दिला नाहीं त्यांनीं दोन महिने तुरुगात काढून चार महिने प्रेम केले नाहीं, आणि शेवटीं प्रेम करायचा कंटाळा आला म्हणून पुन्हां तुरुगात जाण्याचा पराक्रमहि केला नाही असल्या काहीं अद्भुत, अचाट, अतर्क्य गोष्टी आयुष्यांत न केल्यामुळें त्याच्या जीवनात रोमान्स आणि लालित्य कसें येणार आणि ते कथा कादंबऱ्याचे विषय तरी कसे होणार ? कुणी जर अशी तक्रार केली तर ती मला सर्वस्वी मान्य आहे पण हा झाला साहित्यशास्त्राचा आणि साहित्यिकाचा नियम मी साहित्यिक कुठं आहे ? माझ्या

नऊ

जवळ एक चांगला मजबूत टाक आहे, भरपूर शाई आहे आणि अंत करणात नागपूरच्या लोकाबद्दल पुरेसें प्रेम आहे त्यांच्यासाठीं जेवढें काहीं करणें शक्य आहे तेवढें करतो आणि यापेक्षा जास्त कांहीं करणें शक्य होत नाहीं असें वाटू लागतें तेव्हां त्याच्याबद्दल लिहीत बसतों दुसऱ्या कुठल्याहि मार्गानें त्या प्रेमाचा आविष्कार होणें अशक्य झालें म्हणजे शाईच्या सहाय्यानें लेखणीद्वारा तें कागदावर उतरूं लागतें. त्याचाच दृश्य परिणाम म्हणजे या पुस्तकाची निर्मिती होय

साहित्यविषय होण्याला नालायक असलेल्या लोकावर पानची पानें खरडून काढल्याबद्दल साहित्याचे दर्दी माझ्यावर रागावतील याची मला कल्पना आहे परतु हे दर्दीले जीव सोडले तर जे हजारों लोक आहेत ते या लेखनाच्या विषय झालेल्या लोकाप्रमाणेच साधे सरळ, आणि साहित्यिक काविळीनें न पछाडलेले लोक आहेत माझ्याप्रमाणेंच त्यांचेहि या नागपुरी लोकांवर प्रेम आहे याबद्दल मला तिळमात्र सशय नाहीं आणि म्हणूनच त्याच्याबद्दल लिहिलेलीं हीं पानें त्या लोकाना आवडतील अशी माझी खात्री आहे.

—दि. बा फडणवीस

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| ● सहज ! | १ |
| ● सक्करदरा | ६ |
| ● राधा, मी मरणार नाहीं ! | १३ |
| ● भानगडींचा दलाल | २४ |
| ● सरकारी गोदाम | ३१ |
| ● बच्चा, कल बचके रहना ! | ३७ |
| ● विजयी विश्व तिरंगा प्यारा-- | ४२ |
| ● रफीक अहमद | ४८ |
| ● रामशरण भय्या | ५२ |
| ● मला क्षमा करा--! | ६६ |
| ● एक शोकान्तिका | ७१ |
| ● श्रमाच्या अश्रूंचे मोल | ७८ |
| ● केशवची आई | ८३ |
| ● टांगेवाल्याचें राजकारण | ८८ |

३५ ... २३८६

# --सहज !

टप्–टप्–टप्—

पावसाचे थेंब पडू लागताच अनन्त भानावर आला त्यानें खांदे किंचित् उडविल्यासारखे केले, बेंगाल वॉटरप्रूफची पावसापासून रक्षण करण्याचा आव आणणारी पाच रुपयेवाली जुनी बरसाती कशीबशी अंगाभोंवती लपेटून घेतली आणि थकलेल्या शरीरांतलं सारें बळ एकवटून डोक्यावर छत्रीचें छप्पर उभें केलें

टप्–टप्–टप्–टप्—

सतारीच्या वाढत्या लयीप्रमाणें पावसानें आपली गती वाढविण्यास सुरवात केली

परंतु अनन्ताच्या चालण्याच्या गतींत मात्र काहीच फरक पडला नाहीं खांद झटकून हुशारी आणण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी सारखें सात तास राबून थकलेलें शरीर आणि सांसारिक आपत्तींच्या दडपणाखालीं भारावलेलें मन त्याला कितपत दाद देणार ? भरतीच्या गाड्याला जुपलेल्या बैलाला तुतारी टोंचून काय उपयोग ?

अनन्त आस्ते कदम घराच्या रस्त्यानें चालला होता पावलें दिवसभरच्या श्रमानें जड पडलीं होतीं आणि डोकें सारख्या विचारांनीं भारावलेलें होतें.

कुठल्या तरी घरांतून पंकज मलिकच्या गाण्याचे स्वर त्याच्या कानावर पडले.

आई मनवा, हरले मबका भार,

बरखा की रात

पंकज मलिक अनन्ताचा आवडता गायक. त्याच्या आवाजात दुःखी जिवाच्या नाजुक अंतर्भागाला हलवून सोडण्याचें विलक्षण सामर्थ्य आहे असें तो म्हणे पण आज तें गाणें ऐकून आनंद होण्याऐवजी त्याच्या चेहऱ्यावर विषादपूर्ण हास्यरेषा उमटून गेली पंकज मलिक वर्षाऋतूला पृथ्वीचा भार हलका करण्याकरता आळवीत होता आणि अनन्तापुढें त्याच वर्षाकालानें नवीन अडचणी दत्त म्हणून उभ्या केल्या होत्या. घराची मागची भिंत अगदीं मोडकळीस आली होती. तिला पावसाचें पाणी लागताच ती उभी रहाणेंच शक्य नव्हतें—आणि त्याबरोबर घरसुद्धां ! शिवाय घराचें छप्पर सुद्धा दुरुस्त करणें भागच होतें. नाहीं तर सारा पावसाळा गळत्या घरात झोपेविना कंठावा लागला असता तशी अनन्ताला झोंपेशिवाय रात्र काढण्याची संवयच होती म्हणा चिंता आणि परिस्थिति ह्या दोन राक्षसींचा परस्परसहाय्याचा करार झाल्यावर बिचाऱ्या झोंपेचा टिकाव तो किलीसा लागणार ? परंतु घरातलीं इतर माणसें ? पंकज मलिकला पावसाळा म्हणजे पृथ्वीचा भार हलका करणारा देवदूतच वाटतो, पण सत्यसृष्टि किती वेगळी आहे अन्नात पाणी, घरांत जागरण, घराबाहेर मूर्तीमंत नरक, आणि त्याच्या साथीला कॉलऱ्यासारखे यमाचे दूत. एक ना दोन—कित्ती भानगडी अनन्ताला वाटले अडचणींच्या मुद्दलांत चक्रवाढ व्याजानें भर टाकणारा वर्षाऋतु काय पृथ्वीचा भार हलका करणार ? हो, एखादे वेळीं महापूर येऊन माणसांसकट सारीं गावें वाहून गेलीं तर होईल कदाचित् पृथ्वीचा भार हलका—आणि माणसाचा सुद्धा !

इतक्यांत अनन्ताची विचारशृंखला एकदम तुटली पारशी मुलींच्या एका शाळेसमोर खूपशा मोटारी येऊन थांबत होत्या आणि त्यामुळें रहदारींत खंड पडला होता. रस्ता मोकळा होईपर्यंत अनन्ताला थांबणें भाग पडलें.

त्यानें वर पाहिलें दिवाणखाना विजेच्या बत्त्यांनीं लखलखत होता निरनिराळ्या मंजुळ वाद्यांचे संमिश्र सूर ऐकू येत होते. मधूनच बुटाच्या टापांची चट्‌चट् आणि स्त्रियांच्या कोमल कंठातून निघालेले कसले तरी परकी गाण्याचे स्वर कानावर पडत कसला तरी जलसा होता तो आमोद प्रमोदाची तेथें एकच गर्दी उडाली होती हें कॉरिडरमधून ऐकू येणाऱ्या बाटल्यांच्या आणि काटे चमच्यांच्या आवाजावरून सहज लक्षांत येत होतें अनन्ताच्या आशाळभूत मनानें त्याला त्या जागेवर खिळून टाकलें. खरेंच, किती सुख आहे जगांत नाच—गाणें—खाद्य—पेय—नाटक—सिनेमा. चैनच चैन ! पण कुणासाठीं ? आपल्यासाठीं ?

इतक्यात एक मोटार सर्रकन येऊन थबकली, आणि एक लठ्ठ पोटाचा गृहस्थ उतरून त्या इमारतींत शिरला अनन्ताच्या ओळखीचा होता तो त्याचाच सहाध्यायी वर्गातला सर्वांत मठ्ठ विद्यार्थी, परंतु श्रीमंत बापाचा पोर अनन्ताला शाळेंत मास्तरांनीं शिकविलेली ओळ आठवली

'गुणा पूजास्थानं—'

त्यातला फोलपणा पटून त्याच्या मनांतला विषाद अधिकच वाढला आणि तो देखावा दृष्टीआड करावा म्हणून तो पुढें चालूं लागला. तोंच त्याचें लक्ष एका व्यक्तीनें ओढून घेतलें ती लावण्याची खाण नसली तरी तरुण होती यांतच सर्व आलें एका मोटारच्या आडोशाला उभी राहून पावसापासून स्वत:चा आणि पुस्तकाचा बचाव करण्याचा प्रयत्न करीत, कुणी ओळखीचा भेटतो का म्हणून केविलवाण्या नजरेनें येणाऱ्या जाणाऱ्याकडे बघत होती तरुण पोरगी-परक्या पुरुषाकडे मदतीची याचना तरी कशी करणार ? त्यांत प्रत्येकाजवळ असणार एकच छत्री अनन्तानें तिची अडचण ओळखली स्वत:च्या बरसातीची कुवत त्याला माहीत नव्हती असें नव्हे पण आज स्वत:च्या दुःखाच्या जाणिवेनें त्याचें मन फार हळवें झालें होतें तो सरळ तिच्या जवळ गेला आणि आपली छत्री त्यानें तिच्या हातीं दिली त्याच्याकडे एक कृतज्ञतापूर्ण कटाक्ष टाकून तीहि याच्या बाजूनें चालूं लागली

पण ह्या बदललेल्या घटनेनें अनन्ताच्या मन:स्थितींत कसलाच फरक केला नाहीं आज विचारांनीं त्याला सोडायचेंच जणू नाकारलें होतें तो खालीं मान घालून घुम्यासारखा एक अक्षरहि तोंडांतून न काढता चालला होता.

तिनें चालताना पातळ चिखलानें भरूं नये म्हणून ओंचे सावरून किंचित् वर धरले होते त्यातून दृग्गोचर होणाऱ्या तिच्या नाजुक पायाकडे लक्ष जातांच अनन्ताला एकदम जाणीव झाली कीं खरेंच, आपण सुद्धां तरुण आहों, आपलें-सुद्धा लग्नाचें वय आहे त्याची नजर नकळत तिच्या चेहऱ्याकडे वळली. पोर नाकीं डोळीं नीटस होती. तिच्या सावळ्या चेहऱ्यावरचे, पावसानें भिजलेल्या केसातून ओघळलेले पाण्याचे थेंब अळूवाच्या पानावरील जलबिंदूंप्रमाणें शोभत होते मुखावरील भाव, शालीनता आणि धिटाई ह्यांचा गोड मिलाफ दर्शवीत होते. तिचा पोशाख व्यवस्थित आणि टापटिपीचा होता. अनन्ताला वाटलें असली बायको जर आपल्याला मिळाली तर—

पण छे, एखाद्या अनोळखी स्त्रीबद्दल असे विचार मनात आणणें कांहीं

सभ्यपणाचें लक्षण नाही. आणि सभ्यपणाचें असूनसुद्धा काय फायदा ? ज्योतिष्यानें कितीहि सांगितलें तरी आपल्या हातावरची लग्नरेषाच नापत्ता झाली आहे अशी त्याची पूर्ण खात्री होती नाहीं तर देवानें ३५ टिकल्याच्या उत्पन्नामागें चार जिवांचा संसार कशाला लावला असता म्हातारी दुखणाईत आई, इंग्रजी शाळेंत शिकणारा भाऊ आणि लग्नाची बहीण. हे सगळें निस्तरायचा मार्ग म्हणजे ट्रान्सपोर्ट कंपनीच्या ऑफिसांत मिळणारा ३५ रुपयाचा पगार मग स्वतःच्या लग्नाचा विचार करायला फुरसतच कोठें आहे या जन्मीं तरी आपलें लग्न होणें शक्य नाहीं अशी त्याची खात्री होती त्याला कुणी विचारलें, ' कसं काय अनन्त, आतां लाडू कधीं देणार ? ' तर तो रुक्ष स्वरांत उत्तर देई, 'बापाचा संसार करतोय आधीं, मग पाहूं आपल्या संसाराचं '

अनन्त मुखस्तंभासारखा आपल्याच तालात चालला होता, पण तिला ती स्तब्धता चमत्कारिक वाटली त्याला बोलता करण्याच्या विचारानें ती म्हणाली,

आज कॉलेज बरंच उशीरा सुटलंय् ? '

अनन्ताला हसू आलें कॉलेज ! एके काळी ज्याचीं स्वप्नें पडत होतीं तें नंदनवन

' कॉलेजमध्यें नाहीं मी. ट्रान्सपोर्ट कंपनीच्या ऑफिसात, कारकून आहे. त्यानें रुक्ष स्वरात उत्तर दिलें.

अय्या ! ट्रान्सपोर्ट कंपनीच्या ऑफिसात आणि इतक्या लांबन पायीं येता ! तिचे नेत्र किंचित् विस्फारले.

सहानुभूतीच्या त्या शब्दानीं अनन्ताला किती तरी बरें वाटलें. दुर्मिळ वस्तूची किंमत जगात जास्त असते पण आज अनन्तासारख्या दरिद्र्याला ती किती अल्प मोबदल्यात मिळाली ?

तो कांहींच बोलत नाही असें पाहून तीच म्हणाली, ' खरच, आज तुम्हीं भेटला नसता तर कसं झाल असतं ? पावसातनं भिजत जायचीच पाळी आली असती "

छे, मी नसतों तर दुसरा कोणी भेटला असता. '

' हो, भेटतोय दुसरा ! चांगली अर्धा तास उभी होते, पण कुणी ढुंकून सुद्धा बघितलं नाही. तुम्हींच गैरसोय सोसून—,

' त्यात कसली गैरसोय ? ही बरसाती आहे की मला पावसापासून वाचवायला ? ' हें बोलतांना आपण किती खोटें बोलतों ह्याची अनन्ताला जाणीव झाल्याशिवाय राहिली नाहीं.

बोलतां बोलता तिचें घर आलें. तिनें अनन्ताला चहा घेऊन जाण्याचा आग्रह केला. परतु त्यानें मी चहा घेत नसतो अशी थाप मारून तो टाळला. ती घरात शिरली आणि तो पुढें चालूं लागला.

'गोड छोकरी'—जातां जातां त्याच्या तोंडून उद्गार निघाले

ह्या गोष्टीला किती तरी दिवस झाले. अनंत रोज खालीं मान घालून ऑफिसात जातो आणि येतो पण त्या घराजवळ येतांच त्याची नजर दारांतून आतील कुणाला तरी हुडकण्याचा प्रयत्न करते आणि कुणी विचारलेंच तर तो उत्तर देतो—

'कुठ ?—कांहीं नाहीं—सहज !'

# सक्करदरा--

## नागपूरच्या अजबघरांतील एक चीज

संस्कृतीच्या प्रगतीचा ओघ हा नेहमीच असमान असतो, असा इतिहासाचा दाखला आहे जगात यंत्रयुगीन संस्कृतीच्या पराकोटीला पोंचलेले समाज असे आढळतात, तसेच दुसरीकडे अजूनहि पाषाणयुगांत वावरत असलेले मानवसमूहहि आढळतात,

सक्करदऱ्याची आठवण झाली म्हणजे मला नेहमीं इतिहासाच्या या चमत्कारिक नियमाची आठवण होते हजारोबाजारींचा नित्य व्यवहार करणारी महालाची बाजारपेठ, रात्रीच्या वेळीं आपल्या रोषणाईनें दिपवून टाकणारी चित्रपटगृहें, अहोरात्र पाश्चात्य ज्ञानामृताची पाणपोई मांडून बसलेली शाळाकॉलेजें, त्या पलीकडे दिवसरात्र धडधड करणाऱ्या एम्प्रेस मिलच्या भोंग्यातून बाहेर पडणारी धुराची वावटळ, मुंग्याप्रमाणें ये जा करणारे तेथील कामगारांचे थवे, त्याच्याच मागें आधुनिक युद्धतंत्राचें वर्चस्व दिमाखानें मिरवीत, ' तुम्हाला जखडून ठेवणारा मीच ! ' असें त्या कामगाराना बजावून सांगणारा सीताबर्डीचा किल्ला, बाजूला अंत करण पाश्चात्य विचारांनी व शरीर युरोपीय वेषभूषेनें विभूषित करून रस्त्यानें चालणाऱ्या मध्यमवर्गीय धन्तोलीची टुमदार उद्यानें, टेकडीच्या मागें पसरलेले आधुनिक धनकुबेराचे भव्य प्रासाद आणि न्यायालयांतील कज्जेदलालींत फावल्यानें पैसे ओढणाऱ्या नवयुगीन स्मृतिकाराचे

विलोभनीय बंगले आणि या साऱ्यांच्या समूहातून आधुनिक संस्कृतीच्या शेंडीप्रमाणें शोभणारे बिनतारी तारायंत्राचे उंच खांब !—

परंतु सक्करदऱ्याला या नागपूरची खबर नाहीं. ब्रिटिशानीं, स्वतःच्या स्वार्थाकरतां का होईना, नागपूरला मध्ययुगीन भोंगळपणाच्या आवरणातून बाहेर ओढून काढलें. परंतु परकीयांच्या या कृतीशीं जुळतें घ्यायला भोसल्यांचा सक्करदरा स्वाभिमानशून्य थोडाच आहे ? त्यानें त्या दिवसापासून नव्या नागपूरला पाठ फिरविली आणि स्वतःला मध्ययुगाच्या प्राचीन कोंडवाड्यांत कोंडून घेतलें.

इंगलंडचा राजा अजूनहि दरबारी समारंभाच्या वेळीं मध्ययुगाला शोभेल असा चित्रविचित्र विदूषकी पोशाख करतो. अजूनहि जुन्या जमान्यांतील आचरट दरबारी चालीरीती नव्या इंग्लंडात कायम आहेत. पार्लमेंटचें सभागृह वाढत्या सभासदसंख्येला पुरेसें नसतांहि परंपरेचा भंग होऊं नये म्हणून त्यांत कसलाहि फरक करण्यांत येत नाहीं. आजचें इंग्लंड जुन्या परंपरेला वासनात गुंडाळून केव्हाच पुढें निघून गेलें असताहि जुन्या चालीरीतींचीं ही फोलपटें अजून उराशीं कवटाळून ठेवण्यात काय अर्थ ? पुढें पुढें जाऊं पहाणाऱ्या बहुजनसमाजाची दृष्टी शक्य तितकी भविष्यकालावरून खेंचून भूतकालावर केंद्रित करण्याचा हा प्रयत्न हास्यास्पद नव्हे का ?

—पण आमच्या सक्करदऱ्याकरतां भविष्यकाळ मुळीं अस्तित्वातच नाहीं. भूतकालाशीं तो अविच्छिन्नपणें निगडित झाला आहे.

नव्या नागपूरच्या एका टोकाला असलेल्या या पुराणसंस्थेकडे जेव्हा जेव्हा मी पहातो, तेव्हां तेव्हां कोसळून पडलेल्या मध्ययुगाचें तें मूर्तिमंत प्रतीक आहे, असें मला वाटतें. वर असलेल्या उंचवट्यामागे दडलेला तो सक्करदऱ्याचा तलाव, वर्षानुवर्षे त्याची सफाई न झाल्यामुळें शेवाळानें झाकलेलें तें त्याचें हिरवें निळें विषमय पाणी, तसल्या त्या गटारगंगेंत जन्म घेणारीं विक्षिप्त स्वभावाचीं सुंदर कमळें, तलावाच्याच काठावर उभे असलेलें व कालमहात्म्याचा प्रभाव आपल्या काळेपणानें दाखविणारें देवालयाचें प्रचंड धूड, आवाराच्या भिंतींविना पोरकें दिसणारें महाद्वार आणि त्याच्याशींच लागून ठेवलेले वानर, हरिण, व्याघ्रादिकांचे जुनाट लोखंडी पिंजरे. आंत शिरताच आरखा बकरा पोटांत रिचवून मस्तावलेले व भोसल्यांच्या औदार्याचा फाजील फायदा घेणारे गुंड देवडीवर हुंदडतांना आढळतील. पटांगणांत सगळीकडे गुडघा गुडघा गवत वाढलेलें आणि कोंबड्या-बदकांनी घाण करून ठेवलेली राजमहालाला पडलेली

भगदाडें बुजविण्यासाठीं जागोजाग तट्ट्यांचा उपयोग केलेला आणि ते मुद्दा दरिद्री मियाच्या तरटाच्या पडद्याप्रमाणें ठिकठिकाणीं फाटलेले कधीं काळीं राजस्त्रियांच्या जलविलासासाठी बांधलेला एक मोठा हौद दोन महालांच्या मध्यभागीं आहे पण त्यात आता पाण्याचा एक टिपूसहि आढळणार नाही हौदाला ठिकठिकाणीं तडा गेलेल्या आहेत आणि त्याच्या चोहो बाजूला गपड्या पेंटरनें वेडींवाकडीं चित्रें काढली आहेत हौदाच्या दुसऱ्या टोकाला महाराणीसाहेबांचा महाल आहे इथें किंचित् व्यवस्थितपणाचा भास होतो खरा, पण त्यांतहि खानदानी थाट कमी न होण्याची कांटेकोर काळजी घेतलेली आढळते सदरेवरचा व्यवस्थितपणा परसापर्यंत पोंचणें शक्यच नाहीं सदरेच्या भिंतींवर चुना आहे की काचा चिकटविल्या आहेत, असा भ्रम भिंतींवरील आरशांच्या दाटीमुळें पडतो दारावरचे पडदे बाहेरच्या जगाचा वारा आंत शिरूं नये म्हणून सज्ज आहेतच पण सगळ्यांत वैशिष्ट्यपूर्ण चीज कोणती असेल, तर केव्हा तरी शौकांत येऊन राजघराण्यातील कुणा तरी पुरुषानें सर्कसच्या 'रिंग मास्टर' च्या वेषांत काढून घेतलेली आपली तसबीर ' ही तसबीर म्हणजे सक्करदऱ्याच्या स्वभाववैशिष्ट्याचा कळस आहे

सक्करदऱ्याच्या या स्वरूपाचें चित्र डोळ्यापुढे उभें राहिलें म्हणजे मृत झालेल्या भूतकाळाची ही प्रतिमा आहे असें वाटल्याखेरीज रहात नाही या भूतकालाच्या अवशेषांत सक्करदऱ्याची संस्कृति भुताप्रमाणेंच वास्तव्य करीत असते

परंतु या सक्करदऱ्याचा मान आमच्या वर्तमान प्रभूचा प्रतिनिधी गव्हर्नमेंट हाऊसच्या बरोबरीनें राखतो. गव्हर्नरच्या खालोखाल मान सक्करदऱ्याच्या राजेबहादुरांचा त्यांच्या वाहनालासुद्धा स्वतःच्या मोटारीबरोबरीचा मान देण्याचा कटाक्ष गव्हर्नर राखीत असतो सेमिनरी हिलवरील संस्कृति दांभिकतेनें सक्करदऱ्याच्या संस्कृतीच्या गळ्यात पडते सक्करदरा हें भूतकालाचें मढें आहे त्या मढ्याशी जिवंत मनुष्यानें चुंबाचुंबी का करावी ? पण फेडरेशनच्या घटनेत कालानें बाद ठरविलेली मध्ययुगीन संस्थानें व आधुनिक संस्कृतीचा मार्ग चोखाळणारा ब्रिटिश हिंदुस्थान यांचें लग्न लावण्याच्या साम्राज्यवादी धोरणाचाच हाहि एक प्रकार आहे

आपलें गेलेलें वैभव परत मिळेल असली कल्पना सक्करदऱ्यात समाधानानें वावरणारा नृपतीसुद्धां वागवीत नसेल आपल्याला सुखासमाधानानें

आपल्याच स्वप्नरंजनात सरकारने मग्न राहू द्यावें, आहे ही परिस्थिति अशीच कायम रहावी, येवढीच त्याची आकांक्षा परंतु नागपुरात असेहि कांहीं महाभाग आहेत, कीं जे आपल्या दास्यविमोचनाच्या अर्थ सक्करदऱ्याच्या गतवैभवाचें पुनरुज्जीवन असा समजतात. सक्करदऱ्याच्या सेनासाहेबसुभा पुन्हा हनुमान खिडकीच्या महालात विराजमान झाला म्हणजे आपणास स्वातंत्र्य मिळालें, असें त्याना वाटतें आणि म्हणून सक्करदऱ्याच्या ओसाड वनात ते आशेचे फुलबाग फुलवायचा प्रयत्न करीत असतात मृतात पुन्हा चैतन्य निर्माण होत नसतें, हें त्याना कळत नाहीं – नाहीं, मृत हा मृत झाला आहे, हेंच त्याच्या लक्षांत येत नाहीं आमच्या भाग्याचीं सूत्रे आपल्या हातीं धरून बसलेल्याना हेंच पाहिजे असतें लोकाची नजर भूतकाळाच्या मळ्यावरच केंद्रित रहावी, अशी त्याची इच्छा असते आणि म्हणूनच त्यानीं जागोजाग हे मध्ययुगाचे शिलबे उभे केले आहेत. सेमिनरी हिल आणि सक्करदरा याच्या संस्कृतिसंगमाचा अर्थ हा आहे सक्करदऱ्याच्या तलावातील शेवाळ व नळच्या चिखल याना जोडणाऱ्या नाजुक कमलनालाइतकाच हा संबंध नाजुक, सखोल आणि गुह्य आहे

—पण सक्करदऱ्याला त्याचे सोयरसुतक नाहीं त्याचे जग जें १९ व्या शतकाच्या सुरुवातीला संपलं तें संपलें –नव्हे, तेथेंच तें अचल आहे आणि तेथेंच तें अचल रहावें, म्हणून त्याची धडपड आहे पंचगव्यांतल्या किड्याला बाहेरचें जग मिथ्या भासतें, कूपातल्या मंडुकाला बाह्य जग अस्तित्वातच नसतें, तसेंच सक्करदऱ्याच्या परिसरात वावरणाऱ्या या संस्कृतीला बाहेरचें जग आहे. त्यावर आपल्या आशा केंद्रित करणाऱ्याला हें कळत नाहीं, कीं नव्या युगाचा राजमुकुट या भूतकाळाच्या समाधीवर चढणार नसून नागपूरच्या बाहेर असलेल्या बंदिशाळेत वास करणाऱ्या बंदिजनाच्या डोक्यावर तळपणार आहे. नव्या जगाचा राजमुकुट एम्प्रेस मिलच्या कारखान्यांत घामाचे अश्रू ढाळणाऱ्या असंख्य कामकऱ्याच्या शिरावर चढणार आहे नवीन जगाचा राजमुकुट या विशाल भारताच्या असंख्य शेतांतून आपल्या बैलाप्रमाणें नांगराला जुंपलेल्या कोट्यावधी कृषिकाच्या शिरावर शोभून त्यांचें अवनत मस्तक उन्नत करणार आहे

पण सक्करदऱ्याला त्याचें काय होय ? त्याला भविष्यकाळाची पर्वा नाहीं, वर्तमानाची फिकीर नाहीं लहानपणी आम्हीं शाळेंत असतांना गोपाल जिवाजी केळकरांच्या दोन पैशाच्या भूगोलात वाचीत असूं, कीं सक्करदरा यात्रेसाठीं प्रसिद्ध ठिकाण आहे म्हणून ती यात्रा कोणती आणि कधीची तें

आता आठवत नाहीं. पण वसतात भरणाऱ्या बैलाच्या पटाची स्मृति मात्र कधीच नाहींशी होणार नाहीं. भोसल्याचे पूर्वज पूर्वापार बैलाचे पट भरवीत आले म्हणून आजचे राजपुरुषहि तेच करतात तलावानजीकच्या अफाट माळरानावर पटाचा बाजार थाटला जातो जवळच्या पैशाचें काय करावें हें कळत नसल्यामुळें आसपासच्या खेडेगावांतले पाटील मालगुजार जसे तमाशाचे फड जमवण्यांत पैसा खर्च करतात, त्याप्रमाणेंच पैसे खर्च करून आपले छकडे घेऊन ते पटात भाग घ्यायला येतात बैलगाड्यांच्या शर्यतींची एकच गर्दी उडते आणि सक्करदऱ्याचा राजा स्वत एका छकड्यावर बसून या तमाशाकडे निर्विकार मुद्रेनें पहात असतो

तीच गोष्ट रेड्याच्या टकरांची आणि कोंबड्याच्या झुंजींची कोणत्या ना कोणत्या निमित्तानें जुगार खेळायला सोकावलेले नागपुरी सोकाजी येथें गर्दी करून येतात हजारो बाजारींचा जुगार होतो शेंकडो कोंबड्याचा खिमा बनतो आणि भाडणात एखादा मनुष्य सुद्धा हलाल होतो प्राचीन रोमन काळीं मनुष्य आणि वन्य पशू यांची झुंज लावून त्या अघोर तमाशानें आपली करमणूक रोमन सरदार करून घेत असत सक्करदऱ्यावर होणाऱ्या पशुसहाराचें मला कांहीं वाटत नाहीं परंतु ज्या पशूंचा सहार माणसांच्या उपयोगांत येऊं शकेल, त्याचाच संहार इथे शेंकड्यानीं आणि हजारानीं निरर्थक होत असतो सक्करदऱ्याच्या मध्ययुगीन वातावरणाला उपयुक्ततेची भावना मानवत नाहीं कोणत्याहि गोष्टीची उधळपट्टी करणें ही अभिमानाची गोष्ट समजली जाते आणि म्हणूनच माझ्या मनात हा देखावा पाहिला म्हणजे असा विचार नेहमीं येतो, कीं शक्य झालें असतें तर प्राचीन रोमनिवासी सरदारांप्रमाणेंच यांनींसुद्धां आपल्या करमणुकीसाठीं मनुष्यप्राणांची अशीच वारेमाप उधळपट्टी करावयाला कमी केलें नसतें

—सक्करदऱ्याच्या प्रागणात एका टोकाला कोरी करकरीत हडसन कार पडलेली असते, परंतु सणासुदीलासुद्धा ती तबेल्यातून बाहेर पडलेली कुणाला कधीं दिसत नाहीं पेट्रोलपेक्षा बॅटरी पुनरर्जीवित करायचाच खर्च तिला जास्त येत असेल परतु त्याच सक्करदऱ्यात घोड्याच्या गाडीवर हजारों रुपये खर्च होतात चार अश्वाच्या या रथाखेरीज इतर वाहनातून हिंडणें राजेपणाला शोभणारें नाहीं, असा सक्करदऱ्याच्या स्मृतींत अलिखित नियम आहे. घोड्याची गाडी आणि राजेपण हीं जणुं जुळीं भावडेंच आहेत अशी सक्करदऱ्याची कल्पना आहे.

मुंबईच्या राजरस्त्यावरूनच नव्हे, तर गल्याबोळांतून सुद्धा कुणीहि लुंगासुंगा इसम आठ बारा आण्याचे पैसे फेकून घोड्यांच्या गाडींतून सफर करू शकतो हें जर सक्करदऱ्याला कळलें, तर श्रेष्ठांच्या उपमर्द करणाऱ्या या औद्धत्यानें तो चिडून गेल्याशिवाय रहाणार नाहीं

पण असेंहि असले तरी बैलाच्या छकड्यावर आरूढ होऊन जिल्हा कौन्सिलच्या डामरी सडकेवरून भोसल्याच्या वंशजानें दुडकी चाल चालावी हें आपल्या 'शान'च्या विरुद्ध आहे, असें मात्र त्याला वाटत नाहीं

नागपुरातील रस्ते मोटार खटाऱ्यानीं उडविलेल्या गुलाल-बुक्क्यानें सदैव भरलेले असतात, परंतु, नागपूरचा राजा अजूनहि आपल्या चार घोड्याच्या आणि चार चाकांच्या गाडींत बसून हरीपंत पंडिताच्या त्या जुन्या घरावरून जात असतो दोन नोकर घोड्याचा लगाम धरून व दोन गाडीमागून स्टंट पिक्चर-मधील नादियाप्रमाणें 'है-है' करीत ओरडत धावत असतात येणारे जाणारे पदाती घोड्याच्या टापाच्या तालावर मुजऱ्यासाठीं कंबरा वाकवीत असतात

अजूनहि नागपूरात जख्खड म्हाताऱ्या हत्तीवरून राजाची दसऱ्याला मिर-वणूक निघते अजूनहि त्याच्या अंगावर विटलेल्या रंगाची भरजरी झूल असते. त्याच्या अंगावरून सोडलेल्या चांदीच्या घंटिका चिंचेनें घासूनसुद्धा तिळमात्र पाढऱ्या होत नाहींत जुन्या तलवारी जुन्या म्यानात झोंपलेल्या असतात पाठीवर १८५७ सालच्या ढाली लटकतात मिरवणुकीच्या अग्रभागीं चित्रविचित्र पोशाखाचे सैनिक वायबार काढीत असतात त्याच्यापुढें नुकत्याच बंगालमधून आणलेल्या अस्थिपंजर उंटावर पोकळ नगारेवाला शेल्या हांकीत असतो भालदार चोपदार चिरक्या आवाजात ललकाऱ्या देत केस झडलेल्या चवऱ्या ढाळीत असतात. सक्करदऱ्याची वास्तुदेवता वासनांतला दरबारी पोशाख चढवून आत्यंतिक गंभीर मुद्रेनें इतिहासकालीन अंबारींत विराजमान झालेली असते त्याच्या मागें एक पुष्ट आणि मस्त घोडा थयथयाट करीत असतो आणि त्याच्या मागोमाग भाड्यानें आणलेली बरीचशी टांग्याची मरतुकडीं तट्टें चालत असतात नाटकातील राजे-हुजऱ्याकडे पहावें तितक्याच औत्सुक्यानें हा मिरवणुकीचा थाट नागपुरातले शेंकडो लोक पहातात

काळ निघून गेला असला, तरी विजयादशमीला मस्तकीं रक्ताचा टिळा हा लागलाच पाहिजे, असा सक्करदऱ्याच्या रूढींचा दंडक आहे मग तें रक्त रेड्याचें

असलें तरी चालेल, मेंढ्याचें असलें तरी चालेल, किंवा शेळीचें असलें तरी चालेल कुत्र्यामांजराचें चालेल कीं नाहीं ते मला माहित नाहीं अशा रीतीनें हें सक्करदरा विरुद्ध शेळीचें युद्ध मोठ्या नीरश्रीनें पार पडतें व मिरवणूक विजय-डंका पिटीत गावात परत येते

सक्करदरा ही नागपूरच्या विचित्र वस्तुसंग्रहालयांतील एक अजब चीज आहे. मी कधी कधीं सक्करदऱ्याच्या त्या टेकाडावर उभा रहातो माझ्या डाव्या हाताला खोल शात असें तलावाचें हिरवेकंच पाणी असतें. अवतीभवतीं पसरलेलें अफाट मैदान आणि शेतें दूर क्षितिजाला जाऊन भिडलेलीं अगतात भोंवताली लांब अतरावर एक धूसरतेचें कडें पसरलेलें दिसतें त्या अफाट विस्तारातून मनुष्य-हीन असा पाढरा शुभ्र रस्ता वळणें घेत जाताना दिसतो सक्करदऱ्यावर स्मशान कळा पसरलेली दिसते.दुरून घुबडाचें घूत्कारणें ऐकूं येतें देवालयांतील घंटा-नादाला साथ देणारें कोल्ह्याचें विवळणें त्या उदासीनतेंत भयाणता ओतीत असतें. माझी नजर दूर दिसणाऱ्या गिरणीच्या भोंग्याकडे व बिनतारी यन्त्राच्या खाबांकडे जाते टेकडीच्या पायथ्याशीं पसरलेल्या शहरातील लुकलुकणारे विजेचे दिवे सक्करदऱ्याच्या बुरसटपणाला उपहासानें हसताहेतसें वाटतें

---

# राधा, मी मरणार नाहीं!

स्मशानात उभारलेल्या पत्र्याच्या शेडमध्यें एक प्रेत जळत होतें आजूबाजूला आणखी तीन चार चिता पेटलेल्या होत्या आणि स्मशा-नाच्या प्रवेशद्वाराजवळ आणखी दोन प्रेतें आपल्याला केव्हा जागा मिळेल म्हणून वाट पाहत होतीं.

शेडच्या बाजूला एक मोठा ओढा आहे त्यातून गढूळ पाण्याचा प्रवाह वाहत असतो ओढ्यावर बाधलेला बाबूचा पूल ओलाडला तर पलीकडे पसरलेल्या अफाट आणि खाचखळग्यानीं भरलेल्या मैदानात, ओढ्याच्या कांठापासून काहीं पावलाच्या अतरावरच, भूतेश्वराचें देवालय असल्याचें आढळून येईल एक महिन्यापूर्वींच देवालयाचा पुजारी कॉलऱ्यानें त्याच्या कुटुंबासह, कैलासनाथाच्या पायाशीं पोंहोंचविल्यामुळें सध्यां देवळातील पुजाऱ्याची गादी रिकामीच आहे गुरव सुद्धा आपल्या सहकाऱ्याला भेटायला निघून गेला आहे, आणि त्याची बायको, मुलाला टाकून, गावातल्या पैसेवाल्या तेल्याबरोबर जवळच्या शहरांत पळून गेली आहे. त्या मुलाला उपाशी मरायची पाळी आलेली नाहीं, कारण स्मशानांतील गोवऱ्या विकणाऱ्यानें त्याला जवळ बाळगलें आहे हलीं गोवऱ्याचा धदा फार तेजींत आहे

महिनाभर कुणींहि लक्ष न दिल्यामुळें देवालयात धूळ, कचरा, आणि पाचोळा याचें साम्राज्य पसरलेलें आहे. सभामंडपांत कमलावरानें अनंतहस्तानें

अस्थिदान केल्यामुळें पोट तट्ट फुगून पडलेलीं पाच दहा कुत्रीं नेहमीं आढळतात. देवळाच्या शिखरावर गिधाडाचा एक तांडा सतत पख फडफडावीत असतो गेल्या दोन महिन्यात या स्मशानातील गिधाडाची सख्या निदान दसपटीनें तरी वाढली आहे गिधाडांच्या तीक्ष्ण चोचींशीं मुकाबला देण्याची कुवत अगात्त ग्सल्यामुळें कावळ्याचे समूह त्यांच्यापासून एक फर्लांग अतरावर कलकल करीत बसलेले दिसतात

या मैदानांतील जमीन अतिशय भुसभुशीत आणि नुकतीच उकरल्या-सारखी वाटते हें वाटणें गेल्या महिन्यांत कमी होण्याऐवजीं सतत वाढतच गेलें आहे

—वरील प्रेत ज्यावेळीं स्मशानात जळत होतें त्यावेळीं ओढ्याच्या पली-कडच्या बाजूला कुत्र्याचे एक दोन समूह नुकतींच पुरलेलीं प्रेतें उकरून त्यासाठीं आपसांत भाडत होते देवालयाच्या शिखरावरील गिधाडें आणि घारी आकाशा-तून हल्ला करणाऱ्या विमानाप्रमाणें त्याच्यावर झेंप घालून त्याना पळवून लावण्याचा भगीरथ प्रयत्न करीत होत्या आणि देवालयातला महेश्वर डोळे मिटून स्मशानां-तील प्रेताप्रमाणेंच निश्चल बसला होता.

स्मशानांत जळणाऱ्या प्रेताभोंवतीं जे लोक जमले होते त्याचे डोळे मिटलेले नव्हते चितेच्या सहस्र बाहूनीं वेढल्या जाणाऱ्या प्रेतावर ते खिळले होते गेल्या महिन्या दोन महिन्यात त्याचे डोळे अश्रू गाळणें विसरून गेले होते, परंतु आज एकाएकीं त्यांना आपल्या धर्माची आठवण झाल्यासारखी दिसत होती

त्या ज्वालाच्या रूपानें मृत्यु आपल्या शतजिव्हानीं त्याला गिळण्याचा प्रयत्न करीत आहे असें भासत होतें. गेले कित्येक दिवस याच कृष्णमुखी मृत्यूशीं तो सारखा झगडत होता मृत्यूनें आपलीं सारीं शस्त्रास्त्रें आणि सारी शक्ती एक-वटून त्याच्या इष्टमित्रावर, त्याच्या आप्तबाधवांवर, त्याच्या गणगोतावर—साऱ्या गावावर हल्ला चढविला प्रत्यक्ष कृतात तो! त्याच्या आक्रमणाला थोपवून धरण्याची शक्ति मर्त्य मानवात कुठून असणार? सारे जण हवालदिल होऊन आणि कपाळावर हात देऊन स्वस्थ बसले होते. अशा वेळीं हळूच कुणाच्या लक्षातहि न येता हा मृत्यूच्या मार्गात आडवा पडला, आणि इतरानाहि आपल्याबरोबर बोलवु लागला.

कृतांताच्या मार्गांत एका य:कश्चित् मानवानें आडवें यावें! यामुळें कृतांताची आधींच तोळा मासा असलेली प्रकृति एकदम बिघडल्यास नवल नाहीं

क्रुद्ध कृतातानें अधिक जोरानें आणि अधिकच त्वेषानें आपल्या हल्ल्याला सुरवात केली.

त्यानें आणि त्याच्या इतर मदतनिसानीं जिवापाड धडपड केली मृत्यूला तसू तसू मागें रेटत नेलें—आणि शेवटीं तो हतबल झाल्यामुळें मृत्यूनें त्याची शिकार केली

—तो य कश्चित् मानव आज त्या गोवऱ्याच्या शय्येवर नि ष्प्राण होऊन पडला होता आणि खुनशी मृत्यू आपल्या सहस्र जिव्हानीं त्याला पोळून स्वत च्या सूडभावनेचें प्रदर्शन करीत होता.

मृत्यूच्या सूडभावनेचें प्रदर्शन त्या चितेभोवतीं बसलेले लोक मुकाट्यानं बघत होते. त्यांच्या डोळ्यात सांचलेल्या अश्रूंतून पुढची चिता आणि तिच्या वेडेवाकडे नर्तन करणाऱ्या ज्वाला अस्पष्ट होत होत्या आणि निराळींच दृश्यें त्यांच्या डोळ्यापुढें दिसत होतीं.

★

वेणीमाधव एक प्रतिष्ठित शिक्षक होते गावांतले सगळे लोक त्याना मान देत असत त्याची ममताळू वृत्ति, मनमिळाऊ स्वभाव, सचोटीची वागणूक आणि सार्वजनिक कार्यांत सदैव मदत करण्याची तत्परता, यामुळें ते आबालवृद्धाला प्रिय झाले होते. गांवांतील कॉंग्रेसचे ते निष्ठावत कार्यकर्ते होते गेल्या सत्याग्रहाच्या चळवळींत त्याना शिक्षाहि झाली होती.

—परंतु त्यांनासुद्धा त्याच्याबद्दल एक प्रकारचा आदर वाटे तसें पाहिलें तर वयानें तो त्याच्यापेक्षां किती तरी लहान त्यांच्याच हाताखालीं तो शिकलेला जातीनें सुद्धा त्याच्यापेक्षा हलका. परतु वेणीमाधवांना वाटे या पोराच्या मानानें आपण किती हलके ! किती क्षुद्र !

—गावांत अबाबाईची सक्रात आली उपासमार सुरू झाली उपासमारीच्या मागोमाग कॉलऱ्याचें आगमन झाले. किती जलद असतो काळाचा फेरा ! क्षणापूर्वीं भरले वाटणारे संसार क्षणात उजाड झाले थोड्या वेळापूर्वीं फुललेल्या कळ्या डोळ्याचें पातें लवतें न लवतें तों कोमेजून पटापट गळू लागल्या

—पटापट गळूं लागल्या ! एक–दोन--तीन–एकामागून एक, एका मागून एक

मानवी जीविताला लागलेली ही गळती कशी थाबवावी हें वेणीमाधवाना कळेनासें झालें ते भांबावून गेले रात्रीं अथरुणावर तळमळत पडले असतांना मूल मेल्यामुळें मातेनें फोडलेली किंकाळी त्याच्या अं तकरणाला भेदून जाई. आणि

त्या किंकाळीनं हादरलेलें अंतःकरण तें सावरतात न सावरतात, तोंच किंकाळी फोडणारी माता आपल्या लाडक्याच्या मागोमाग गेल्याची वार्ता त्यांच्या मस्तकावर आघात करी

वेणीमाधव गावातील पुढारी होते, प्रतिष्ठित गृहस्थ होते, जाणते पुरुष होते जो तो त्यांच्याकडे येऊन सल्ला विचारी, आपली करुण कहाणी त्यांच्याजवळ कथन करी वेणीमाधव सुद्धा आपल्या विशाल अंतःकरणात आपल्या बांधवाचें सारें दुःख साठवून ठेवीत परंतु त्या दुःखांतून त्यांची कशी सोडवणूक करावी, तें दुःख कसें नाहींसे करावें, ते मात्र त्यांना कळत नव्हतें

अशा वेळी तो पुढे आला एक दिवस कसला तरी कागद घेऊन, तो त्यांच्याकडे आला आणि किंचित् हंसून त्यानें विचारलें "मास्तरसाहेब, या कागदावर जरा आपली सही द्याल ?"

कसला आहे रे तो कागद ?"

"काहीं नाहीं. ही एक अर्जी आहे सरकारात दाखल करायची गावकऱ्यांच्या वतीनं गावात बेसुमार हैजा झाला आहे आणि औषधी तर नाही म्हणून सरकारकडे ही मागणी आहे"

त्याचें उत्तर ऐकून वेणीमाधव खिन्नपणाने उद्गारले, "काय होणार आहे असल्या अर्ज विनंत्यांनीं ? कोण ऐकणार आहे तिथं आपलं ?"

त्यानें अगदीं सहज स्वरात उत्तर दिलें, "मास्तरसाहेब, आपल्यासारख्या सज्जनाचे आशिर्वाद आणि गावकऱ्यांचा पाठिंबा असल्यावर काय होणार नाहीं ?"

त्याच्या सहज स्वरात इतका आत्मविश्वास होता कीं वेणीमाधव त्याच्याकडे आश्चर्यानें पाहतच राहिले त्याच्या बारक्या डोळ्यांत प्रसन्नतेचीं निरांजनें तेवत होतीं. आपल्या समोरची ती वटमूर्ति मास्तरांना एखाद्या विराट पुरुषासारखी भासली.

त्यानें डॉक्टर शिवरामकडे जाऊन जो खटाटोप केला त्याची हकीकत ऐकून तर मास्तरांना विलक्षणच वाटलें सकाळच्या प्रहरी डॉ शिवराम सरकारी दवाखान्यातील मिक्श्चरच्या बाटल्यातील पाण्याकडे शून्य नजरेनें पाहात बसले होते इतक्यात एकादा धूमकेतूप्रमाणें तो त्यांच्या अंगावर येऊन कडाडला

"काय हो, तुम्ही डॉक्टर आहात का ? गावातील लोक पटापट मुंग्यासारखे मरताहेत आणि तुम्ही इथं हातपाय ताणून स्वस्थ बसलां आहांत ! सरकार काय येवढ्यासाठीं तुम्हाला पगार देतं ?"

डॉ शिवरामानीं किलकिल्या डोळ्यांनीं त्याच्याकडे आपादमस्तक न्याहाळून पाहिलं, आणि मग त्याच्या खांद्यावर हात ठेऊन ते शांत स्वरात म्हणाले, " माझ्या जवान दोस्ता, उगाच असा रागावू नकोस. गांवांतले लोक पटापट मरत आहेत हें मला दिसत का नाहीं ? आणि त्याचं वाईट वाटायला मी सुद्धा माणूसच आहें--नुसता माणूस नव्हे एक डॉक्टर आहे त्याना वाचविणं मला शक्य असतांना सुद्धां मी त्याना वांचवूं शकत नाही या जाणिवेन मला तुझ्यापेक्षा सुद्धा जास्त वाईट वाटत पण मी तरी काय करूं ? या बाटल्या बघितल्यास ? यात औषध नाहीत, नळाच पाणी भरलं आहे मग काय पाजूं मी या लोकांना ? "

डॉक्टराच्या या उद्गारानीं या निरपराध माणसावर आपण उगाच आग पाखडली याबद्दल त्याची त्यालाच लाज वाटली. किंचित् ओशाळलेल्या स्वरात तो म्हणाला, ' माफ करा मला डॉक्टर, पण तुम्हीच बघा गावात कसला हाहा:-कार माजला आहे तो कां नाही औषध मागवीत तुम्ही ?"

"सरकारकडे इडेंट पाठवून एक महिना झाला आहे त्यावर चार रिमाइंडर्स पाठविलीं पण अजून उत्तर नाहीं बाबा, हें काम वाटतं तितक सोप नाहीं. वर सोन्या रुप्याचा ठणठणाट चालतो आहे त्यापुढ जित्या जीवाच्या आक्रदनाचा काहीं उपयोग होऊ शकत नाहीं "

डॉक्टरांनीं त्याला निराश करून पाठविलें असले तरी तो निराश झाला नाहीं दोन दिवसांनीं त्यानें गावकऱ्याच्या सह्याचा एक भला मोठा अर्ज आणून डॉक्टराच्या पुढें ठेवला अणि त्यावर शिफारस लिहायला सांगितले. डॉक्टरानीं त्याच्या या प्रयत्नाचें भरपूर कौतुक केलें आणि म्हटलें, "पण यान काय होणार ? अर्ज पोंहोचायलाच मुळीं दहा पधरा दिवस लागतील त्यावर उत्तर प्रत्युत्तर तेवढ्या अवधींत सारा गांव खलास होऊन जायचा लोक थोडीशी काळजी घेतील तर संकटाची तीव्रता बरीच कमी होऊ शकेल. पण कुणीच माझ ऐकत नाहीं सारे त्या भटाभिक्षुकाच्या नादीं लागलेले दिवसरात्र देवाच्या पायाशीं टाळ कुटीत बसतात आणि तीर्थ म्हणून त्याच्या घाणेरड्या मोरींतलं पाणी पितात ज्या तलावाच पाणी प्यायच, तिथंच कपडे धुतात, ढोर धुतात. पाणी उकळून घ्या म्हणावं तर म्हणतात या डॉक्टराला 'येड' लागलं आहे इथं औषधाचा अभाव तिथ ज्ञानाचा आभाव ! काय होणार या गावाच कुणाला ठाऊक ! "

" मी बघतों माझ्याकडून काहीं झालं तर तुम्ही लेवढी शिफारस लिहून द्या त्या कागदावर "

त्यानंतर खरोखरच तो घरोघर हिंडून लोकांना पाणी उकळून पिण्यासाठीं आणि सर्व प्रकारची स्वच्छता बाळगण्यासाठीं विनवूं लागला. पण तो एकटा कुठं कुठें फिरणार ? त्याला एक युक्ति सुचली. त्यानें गावातील लहान लहान मुलें गोळा केलीं, त्याना निरनिराळ्या गोष्टी सांगितल्या. आपल्या गावातील लोक कसे दु खांत आहेत, मुलानी त्याना कशी मदत करायला पाहिजे, हें तो त्याना समजावून देऊ लागला मुलाना तें कितपत समजलें तें माहीत नाहीं परंतु त्याच्या गोड बोलण्यावरच ते इतके खूष झाले कीं तो सांगेल तसें करण्याची त्यानीं तयारी दर्शविली.

दुसऱ्या दिवशीं पांचपचवीस मुलाचा एक तांडा 'पाणी गाळून प्या–उकळून प्या–गावांत घाण करणें म्हणजे आपल्या शेजाऱ्याच्या जिवावर उठणें आहे–भोंदू लोकाचं ऐकू नका' असें मोठमोठ्यानें ओरडत रस्त्यारस्त्यानं हिंडूं लागला त्यांची आरडाओरड ऐकून भोंवतालचे बरेच लोक जमत. अशा रीतीनं लोक जमले की हळूच पुढ येऊन कॉलऱ्यापासून बचावण्यासाठीं काय काय करावें हे तो समजावून सागू लागे.

त्याच्या बोलण्यात विलक्षण कळकळ होती त्या लहान मुलावर सुद्धा त्याचा परिणाम होई ते त्याला विचारीत, "दादा, तुम्हीं कशाला एवढा खटाटोप करता ? त्याच काम ते जाणोत" त्यावर हसून तो त्याना उत्तर देई,

"बाळ, मी याच गावात जन्मलों तुझ्यासारखा लहान असतांना याच गावात बागडलों आता एवढा होईपर्यंतसुद्धां याच गावात वाढलों लहानपणापासून याच गांवातल्या लोकाच्या रागालोभावर मी पोसला गेलों आहें त्याच माझ्यावर ऋण आहे सकटाच्या वेळीं आपल्या गावकऱ्याची सेवा न करणं म्हणजे पाप आहे तुम्हीसुद्धा ही गोष्ट चागली लक्षात ठेवा"

—त्याचा हा उपक्रम सुरू होताच गावातल्या भोंदू बुवाची आणि मांत्रिकाची एकच तारांबळ उडाली गावात महामारीचा फेरा आल्यापासून त्याचें खूपच फावलें होतें. कुणी गडा बाधण्यासाठीं येई तर कुणी ताईत मागे कुणी ग्रहशांतीसाठीं भटजींची मनधरणी करी, तर कुणी अनुष्ठान लावी पुराणाच्या श्रोत्यांत आणि त्याबरोबरच पुराणिकबोवाच्या दक्षिणेंतहि एकदम वाढ झाली होती या ना त्या मार्गानें मांत्रिकांचें व भटाभिक्षुकांचें उत्पन्न वाढले होतें गावावर आलेली सकात त्यांना पर्वणी ठरली होती परतु आता हा काळचा पोर त्याच्या मार्गात आडवा येत होता ज्या दिवशी त्यानें 'पाणी उकळून प्या' आणि 'टाळ

कुढल्यानं काहीं होत नाहीं ' असा उपदेश करण्यास सुरवात केली, त्याच दिवशीं या लोकांना संकटाचा वास आला. आणि त्यानीं गावात एकच आरडाओरडा सुरू केली कीं ' या पोराचं ऐकू नका, हें बहकलेलं पोर आहे, देवाधर्मावर याचा विश्वास नाही—बापजाद्यानीं घालून दिलेल्या मर्यादांचं हा उल्लंघन करायला सांगतो-त्याच ऐकाल तर नरकात जाल—आईचा कोप होईल—गाव तबा होईल ' एक ना दोन ! पूर्वीपासून चालत आलेलीं हीं सनातन्याची रामबाण अस्त्रे त्यानीं एकामागून एक पोतडींतून बाहेर काढायला सुरवात केली

—तरीहि त्याचें काम अव्याहत चालू होतें एका बाजूला लोकांच्या धर्मभावनाच्या बिळावर बसलेले ऐदी, खुशालचेंडू आणि स्वार्थी नागोबा, व दुसऱ्या बाजूला तो, अगा हा अटीतटीचा सामना सुरू झाला. त्याच्या भोंवतालीं गांवातली चार तरुण मंडळी जमू लागलीं बालगोपालाचा तर तो अत्यंत आवडता झाला ते सारे त्याला दादा म्हणूं लागले त्याला सुद्धां या बालसेनेचा मोठा आधार असे आपल्या दादाच्या एका शब्दाखातर ते ज्या उत्साहानें काम करायला तयार होत त्या उत्साहानें त्याचे तरुण मित्रसुद्धा करीत नसत गावातील इतर लोकहि आता हळू हळू त्याचें ऐकून घेऊं लागले तो आपल्या मित्राच्या आणि बालगोपालांच्या सहाय्यानें स्वत जेव्हा गावातील घाण साफ करायला निघाला तेव्हा त्याच्या उदाहरणानें लाजून म्हणा कीं उत्स्फूर्त होऊन म्हणा गाव.तले बरेच लोक निदान सार्वजनिक ठिकाणीं तरी आता घाण करीनासे झाले औषधासाठीं केलेल्या गावकऱ्यांच्या संघटित प्रयत्नाना सुद्धां काहींस यश येऊन जिल्हाधिकाऱ्यांकडून इन्जेक्शनसच्या काहीं ट्यूब्स त्याला काढता आल्या अर्थात् त्यासाठीं त्याला आणि त्याच्या सहकाऱ्याना किती झगडावें लागलं हे त्याचें त्यानाच माहीत

परंतु जसजसे त्याचे प्रयत्न आणि बळ वाढूं लागलें तसतशी भोंदू मांत्रिक आगारेवाल्याच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊं लागली गावांत इंजेक्शनच्या बाटल्या आल्याची बातमी ज्या दिवशीं त्याना कळलीं त्या दिवशी त्यानीं त्याला बोलावणे पाठवून सरळच सांगितलें,

" हे बघ पोरा, तुझे हे चाळे यापुढं चालायचे नाहींत तू आमच्या पोटावर पाय आणतो आहेत आधींच आजकाल लोकाचा धर्मावरील विश्वास उडत चालल्यामुळें आमच्या धंद्याला मंदी आली आहे आज चार पैसे मिळवायची संधी आहे, तीहि आम्ही गमावली तर उद्या आमची पोरंबाळं उपाशी मरतील.

तेव्हा तू आपले हे उपद्व्याप बंद कर. नाहीं तर आम्ही तुझा बंदोबस्त केल्याशिवाय राहणार नाहीं."

त्याच्या बायकोला ही हकीकत जेव्हा कळली तेव्हा तिची तर पाचावर धारण बसली तो सन्ध्याकाळीं घरीं आला तेव्हा ती त्याला म्हणाली, "हं बघा, आता पुरे झालं हें उद्यापासून अगदी घराबाहेर सुद्धां पडायचं नाहीं बर का ?"

त्यानें हसून विचारलें, "का बुवा ? असं काय झालं हें नवीन फर्मान सुटायला ?"

"काय म्हणजे ? ते मेले टपून बसले आहेत ना काहीं बर वाईट झालं म्हणजे ? नाहीं ग बाई, मी नाही जाऊं द्यायची तुम्हाला"

"राधा," तो तिच्याकडे पाहत स्निग्ध स्वरांत म्हणाला, "तुझा सगळा जन्म याच गांवात गेला याच गावकऱ्यांच्या अंगाखांद्यावर तू वाढलीस काय त्यांच्यासाठीं आपल्या पतीच्या प्राणावर पाणी सोडायला तयार नाहींस तू ?"

तिनें एकदम त्याच्या तोंडावर हात ठेवला आणि ती म्हणाली—
"छी–छी—काय अभद्र बोलता या तिन्ही सांजेच्या वेळेला माझी शपथ, पुन्हां असे शब्द तोंडावाटे बाहेर काढायचे नाहींत"

तिचा हात आपल्या हातात धरून तो म्हणाला 'माझा प्राण जर माझ्या गावकऱ्यांच्या हितासाठीं खर्चा पडला नाहीं, तर माझ्या जगण्याचा तरी अर्थ काय ? राधे, आजकालचे दिवस असे आले आहेत की आम्ही एकमेकाला हात देऊन जर चाललों नाहीं तर एकाचा देखील टिकाव लागायचा नाहीं अशा वेळीं आपल्या एकट्याच्या जीवाकडे पाहून कसं चालेल ?"

"मला नाहीं समजत तुम्ही काय म्हणता तें जें काय करायचं तें विचार करून करा म्हणजे झालं मी सांगितल्यानं थोडीच तुम्ही ऐकणार आहात पण आपल्या जिवाला जपा एवढंच माझं सांगणं आहे"

तिच्या आसवांनीं भरलेल्या डोळ्याकडे पाहून त्याला हसूं आलें मान्त्रिक अगारेवाल्यांच्या धमकीचें त्याला कांहींच वाटत नव्हतें.

—सकाळीं डॉक्टर आले त्यांनीं सांगितलेल्या बातमीनें मात्र त्याची काळजी वाढली. गांवातले लोक टोंचून घ्यायला तयार नव्हते मान्त्रिकांनीं आणि भोंदू लोकांनीं त्याना बहकावलें होतें. किरिस्तावानं केलेलीं हीं विलायती औषधं घ्याल

तर मरीआईचा कोप होईल, एकाचाहि वंश शिल्लक रहाणार नाहीं अशी त्यानी धास्ती घातली होती या बातमीनें त्याचें मन उद्विग्न झालें. ज्या लोकाच्या ताव-डीतून गावकऱ्याची सुटका करण्यासाठीं तो धडपडत होता, ते मान्त्रिक तान्त्रिक लोकाच्या मनावरील आपली पकड जास्त जास्तच घट्ट करीत होते. त्यानें खुंटीवरची टोपी डोक्यावर ठेवली आणि तो घराबाहेर पडला

दिवसभर तो वणवण भटकत होता त्याच्याबरोबर त्याचे मित्र होते त्याचें बालगोपाळांचें सैन्य त्याच्या मागोमाग होतेंच दिवसभर त्याच्या पोटांत अन्न गेलें नाहीं कीं पाणी घरोघर हिंडून तो टोंचून घ्या म्हणून प्रत्येकाला विनवीत होता मान्त्रिक त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्याना कसे फसवीत आहेत तें त्याना समजावून देण्याचा तो प्रयत्न करीत होता आपला झगडा किती कठीण आहे याचा त्याला क्षणाक्षणाला प्रत्यय येत होता वर्षानुवर्षे रुजलेल्या धर्मश्रद्धेच्या कठीण पहाडाशी तो टक्कर घेत होता

सन्ध्याकाळच्या सुमारास घरीं आला तेव्हां तो अगदीं थकून गेला होता त्याची सारीं गात्रें गळून गेलीं होतीं दिवसभरच्या श्रमानीं त्याच्या शरीराला हतबल करून टाकलें होतें त्याचाच परिणाम म्हणून कीं काय त्याच्या मनावरहि निराशेनें पगडा बसविला होता घरात येऊन त्यानें वळकटी पसरली आणि आढ्याकडे शून्य नजरेनें पहात तो स्वस्थ पडून राहिला.

त्याला तसा पडलेला पाहून राधा त्याच्याजवळ आली आणि म्हणाली, “ का ? आज फार त्रास झाला का ? डोकं बिक दुखतं ? ”

“ राधा, आज माझं मन अगदी उद्विग्न झाल आहे इतके दिवस आम्ही सारे धडपडतों आहोंत, पण लोकाच्या मनावर असलेला देवभोळेपणाचा पगडा काहीं केल्या जात नाहीं ”

“ असं निराश होऊं नका बाई, ” त्याला धीर देण्याच्या स्वरात ती म्हणाली, “ वर्षानुवर्षे आमच्या बापजाद्यानीं जें आम्हाला शिकवल तें अस तुमच्या एक दोन दिवसांच्या सांगीन का विसरल जाणार ? ”

“ खर आहे ग तुझ म्हणण, पण त्याच्या पायीं किती जीवाचा संहार होतो आहे तो बघवत नाही म्हणून तर ही सारी धडपड ”

“ पण काय करायच त्याला आपल्याकडून होईल तेवढ आपण करावं. आता चला बघू जेवायला दिवसभर पोटात अन्नाचा कण सुद्धां नाही. काळजी करून का कुठ गोष्टी होतात ? ”

त्याची ही काळजी दुसऱ्याच दिवशीं नाहींशी झाली पण त्यासाठीं त्याला किंमतहि केवढी जबर द्यावी लागली होती ? राधा म्हणाली होती तेंच खरें पिढ्यान्‌पिढ्या मनात ठसलेल्या समजुती त्याच्या चारदोन दिवसाच्या तोंडच्या वाफेनें थोड्याच जाणार होत्या ? त्यासाठीं तसलंच काहीं तरी दिव्य करायला पाहिजे होतें

आदल्या दिवशीं दिवसभर हिंडून कॉलऱ्याची इजेक्शन्स टोंचून घेण्यासाठीं त्यानें गावकऱ्यात प्रचार केला ही गोष्ट त्याच्या शत्रूंना कळायला वेळ लागला नाहीं. त्या दिवशी त्याला फारसें यश आले नसलें तरी त्याचें गावकऱ्यावर असलेलें वजन त्याना माहित होतें गावावर कॉलऱ्याचा प्रकोप झाल्यापासून तोच नव्हता का प्रथम गांवकऱ्यांच्या सकटाला धावून आला ? त्यानेंच नाहीं का धडपड करून गावकऱ्याना औषधें मिळवून दिलीं ? त्यानेच नाहीं का वेणी-माधव आणि शिवराम यांच्यासारख्या म्हाताऱ्यातहि चेतना निर्माण केली ? त्यानेंच नव्हती का गावांतील तरुणाना त्यांच्या तारुण्याची जाणीव करून दिली ? त्यानेंच नव्हतें का गावातील बालकाना उडाणटप्पूपणाखेरीज इतरहि काहीं करण्यासारखें असतें हें दाखवून दिलें ?

रात्रीं बेरात्रीं तो कुणाच्याहि हाकेला धावून जाई स्वत च्या प्राणांची पर्वा न करता कॉलऱ्याच्या रोग्याची शुश्रूषा करी पोर मेलेल्या म्हाताऱ्यांना तो मुलाच्या ठायीं होई बाळ गमावलेल्या मातेचें तो बाळ होई आईबाप गमावले-ल्याचा तो वडील बधू होई. त्याचें सुख तें आपलें सुख मानून तो वागत असे त्याच्या लढाया आपल्या समजून तो लढत असे

त्याच्या या तेजस्वी पुण्याईला पुरातन धर्मश्रद्धेच्या दालेआड सरक्षण घेऊं पहाणारे घाबरले असले तर त्यात नवल कसलें ? शेवटीं त्यानीं धर्मयुद्धाचें पवित्र सोडून कपटनीतीचा अवलब केला

तो सकाळीं घराबाहेर पडताच चार गुंडानीं त्याची वाट अडवली आणि त्याचें डोकें सडकून काढले त्यानीं आपल्या मार्गांतला काटा काढून फेकून दिला

पण त्यांची ही समजूत चुकीची ठरली, फोल ठरली चितेवर जळत होतें तें प्रेत त्याचें नव्हतें मृत्यू ज्याच्यावर आपल्या सहस्र जिव्हांनीं हल्ला चढवीत होता तो, तो नव्हता चितेवर होतें तें जुन्या-पुराण्या अध रूढींचें आणि समजु-तींचें मढें होतें चितेवर ज्याची राख होत होती तीं मान्त्रिक आणि धर्ममार्तंड यांचीं स्वार्थी काळीं कृत्यें होतीं

त्याला कोणी मारला ही गोष्ट गावकऱ्याना कळून त्याला मारणाराचें खरें स्वार्थी स्वरूप उघडें नागडें दिसायला वेळ लागला नाहीं त्याबरोबर त्याच्या प्रचाराच्या फुग्यांतील हवाहि निघून गेली

त्याला ज्या वेळीं त्याच्या मित्रानी घरीं आणलें तेव्हा त्याचें डोकें रक्तबं-बाळ झाले होतें सर्वांग रक्तानें भरलें होतें शरीराची संवेदनाशक्ति नष्ट झाल्या-सारखी झाली होती त्याच्या बायकोनें त्याला पाहिलें तेव्हा तिची शुद्धबुद्ध हर-पल्यासारखी झाली तिनें एक किंकाळी फोडली आणि त्याच्या अंगावर आपलें अंग टाकलें त्याला त्याची जाणीव झाली अजून त्याची शुद्ध पूर्णपणें नष्ट झालेली नव्हती तो अस्पष्ट स्वरात उद्गारला–" रडू नको राधा, मी मेलो नाही– मी मरणार नाहीं– मी जिवंत आहें. "

---

# भानगडींचा दलाल

कॉलेजच्या चार भिंतींच्या आंतील जगात जितक्या भानगडी घडतात तितक्या खऱ्याखुऱ्या जगात तरी घडत असतील किंवा नाही अशी कुणी शंका घ्यावी इतकी त्याची प्रसिद्धी पण आमच्या बिन्याच्या डोक्यांत जितक्या भानगडींचा उगम होई तितका आमच्या नागपुरातील कॉलेजात होत नसेल. प्रो काळयांनीं आपल्या 'पेट' विद्यार्थ्यांकरतां आणलेला तिळाच्या लाडवाचा नजराणा लांबवून, परत तो त्याचा त्यानाच पेश करण्याची कारवाई त्यानेंच करावी. रामभ्याच्या सूटाला डांबराचा पेन्ट देण्याची सफाई त्याच्याशिवाय दुसऱ्याला साधायची नाहीं इतकेंच काय पण प्रो दात्याना अक्षरशः कॉलेज सोडून पळायला लावलें होतें त्यानें

एकूण काय कीं बिन्या चव्हाण हा एक प्रतिभासपन्न असा भानगडींचा दलाल होता आणि तसें म्हणवून घेण्यांत त्याला भूषणहि वाटे आपण हातीं घेऊन काम फत्ते होणार नाहीं असें घडणेंच शक्य नाहीं असा त्याचा दावा होता कॉलेजची सारी मुलें मुलींच काय पण प्रोफेसर्स सुद्धा त्याला वचकून होते अर्थातच एवंगुणविशिष्ट अशा या माझ्या जानी दोस्ताचें हे पत्र पहाताच आतां नागपुरांत कोणती नवी भानगड उपस्थित होणार म्हणून मी उत्सुक झालो असल्यास नवल नाहीं वाचकाच्या सोयीसाठीं तें पत्रच खालीं देत आहे

" प्रिय बापू,

तूं गेल्यापासून माझें मन मोकळें करायला कुणीच जीवाभावाचा दोस्त

राहिला नाहीं कधीं कधीं मला असें भडभडून येतें रे, कीं काहीं विचारूं नकोस आणि मग केव्हां एकदा तुझ्यासारख्या दोस्ताजवळ तें ओकून टाकतो असें होऊन जातें बघ आजचाहि प्रसग तसाच आहे बापू, आज माझ्या हृदयात तुफान माजून राहिलें आहे बघ (हें पत्र लिहिण्यापूर्वी विन्या नुकताच न्यू थिएटर्सचें एखादें पिक्चर पाहून आला असला पाहिजे ) अरे, हा आपला समाज आहे की आहे तरी काय ? रूढीच्या पायी किती निष्पाप जीवाचे बळी घेणार आहे हा बापू ? हरिभाऊंनी ह्या रूढीला करालादेवीचा नवा अवतार म्हटलें तें अगदीं खोटें नाहीं उलट मला तर वाटतें कीं त्यांनी फारच सौम्य शब्द वापरले अरेरे, गरिब बिचाऱ्या विधवा ! काय शोचनीय अवस्था आहे त्याची आमच्या समाजात बापू, मला तर विधवेचं तें पाढरें फटफटीत कपाळ पाहिलें कीं अगदीं रडू आवरत नाहीं. आणि म्हणूनच मी आजकाल हात-रुमालांचा एक जादा जोड नेहमी खिशात बाळगीत असतो तू म्हणशील कीं अशा काय जगातल्या साऱ्या विधवा दिवसभर आपले पाढरे कपाळ घेऊन तुझ्या समोर नाचत असतात पण माझ्या प्रिय बापू, मला खात्री आहे कीं तूं सहृदय आहेस आणि अशी खवचट शका घेणार नाहींस कारण परिस्थीति तशीच गभीर आहे आमच्या वर्गांत एक नवीनच मुलगी आली आहे ( ह्या ठिकाणीं मी एक सुस्कारा टाकला विन्या एकदाचा मुद्यावर आला होता ) पण हाय ! बापू, काय सांगू तुला ? अरे, ती विधवा आहे आणि सारखी दहा ते पाच माझ्या डोळयापुढे असल्यामुळें कारुण्याच्या अगडबंब पूरानें माझ्या ह्या नाजुक हृदयाचा बाधारा फाटून जायच्या बेताला आला आहे वरस बापू, आपण तर अगदीं प्रतिज्ञा करून टाकली आहे, कीं एखाद्या तरी विधवेचा उद्धार करून आपले आयुष्य सार्थकीं लावायचेंच बस्स ! भारतके शेर जागो——

तुझाच

——विनू ”

हें पत्र म्हणजे विन्याच्या मेहनतीचा—( कुणी त्याला खटाटोपो भयंकर ’ असं म्हणतात पण लोकाच्या तोडाला तें काय लागायचे ?) पुरावा नाहीं असें कोण म्हणेल ? हें पत्र लिहिण्यापूर्वीं त्यानें निदान दहा पांच तरी कादबऱ्या आणि नाटकें उलथीपालथीं केली असतील मला वाटतें कीं मला आलेलें हे पत्र कदाचित् एखाद्या रंगीत तालमीचा प्रकार असावा. अर्थातच मूळचा इरसाल

विन्या मधून मधून त्यात डोकावलाच तर त्याला माझा आणि त्याचा, दोघांचाहि नाइलाज आहे

पण माझी उत्सुकता मात्र त्या पत्रानें भलतीच वाढली आणि शेवटीं मी श्रीपादला नागपूरला पत्र टाकून काय भानगड आहे त्याचा पत्ता काढायला सांगितलें माझ्या पत्राला आलेल्या श्रीपादच्या उत्तरानें आपल्या डोक्यात कांहीं प्रकाश पडला तर पहा

' प्रिय बापू

तुझें पत्र मिळालें ही बातमी तुझ्यापर्यंत पोंहचली–आणि तीहि खुद्द विन्याकडून–हें पाहून जरा नवलच वाटलें काय भानगड आहे, तें कळविण्याबद्दल तू लिहिलेंस पण ही भानगड काहीं नेहमींसारखी दिसत नाहीं त्यांचें असें आहे ह्या वर्षी मीरा उपाध्ये म्हणून एक नवीनच मुलगी आमच्या कॉलेजात आली आहे ती कशी आहे हें आपल्याला वर्णन करून सांगता येणार नाहीं हा विन्या तिच्यावर अगदीं लट्टू झाला आहे आता तू म्हणशील कीं तुझ्या काय काकाचें गेलें आहे त्यात पण तसें काहीं नाहीं. विन्या हुरळल्याचें नाहीं मला फारसें वाटत, पण ज्या घमेंडीनें तो तिला बनवायच्या गोष्टी करतो त्यात मात्र मला काहींच अर्थ दिसत नाहीं आपल्या नेहमींच्या ढकेलबाजपणानें त्यानें ह्या कामाला हात घातला आहे पण तू काही म्हण बापू, ह्या कामात ह्या भानगडीचा दलाल सपशेल तोंडघुचक्या पडणार अणि त्याचेंच मला वाईट वाटतें अरे, किती झालें तरी तो आपला मित्र आहे

आतां ही समाजसुधारणेची भानगड अशी आहे कीं मीरा आहे विधवा त्यामुळें तिच्यावर इंप्रेशन मारायला विधवाबद्दलच्या कळकळीशिवाय दुसरा कोणता रामबाण इलाज असणार ? आजकाल विन्या विधवाविवाहाशिवाय दुसरी बात करीत नाहीं आगरकर मरून आज पंचवीस वर्षे झालीत हेहि तो विसरलेला दिसतो वेळीं अवेळीं विधवांच्या करुण स्थितीवर व्याख्यान झोडीत असतो अर्थात अशा वेळीं मीरा कुठे जवळपास असेल अशी खबरदारी बाळगायला तो विसरत नाहीं ती दिसली कीं नाकाला रुमाल लावून सुस्कारे सोडीत असतो हातात आपट्यांच्या कादंबरीशिवाय दुसरें पुस्तक ठेवीत नाहीं. तेव्हा आता त्याचा रोग कोणत्या थरावर गेला आहे हे तुझ्या लक्षात आलेंच असेल. एकदरीत काय कीं हल्लीं आमच्या कॉलेजमध्यें अगदीं टेन्स सिच्युएशन

आहे ह्या दलालाची पूर्व कर्तबगारी माहीत असल्यामुळें ह्या नव्या भानगडीच्या निकालाकडे साऱ्या कॉलेजचे डोळे लागले आहेत आमच्यासारखे दोस्त आहेतच म्हणा त्याचा पाठपुरावा करायला पण आपल्याला कांहीं आशा वाटत नाहीं बुवा

तुझा मित्र
श्रीपाद ”

—श्रीपादचें वरील पत्र वाचून माझी उत्कंठा जास्तच वाढ. कारण विन्याचें खरें कसब मला माहीत होतें श्रीपादला जरी मोठीशी खात्री नसली तरी माझा विन्याच्या कर्तृत्वावर विश्वास होता आणि म्हणून ह्या भानगडींतून कसलें पिल्लू बाहेर पडतें ह्याचीच मी एकसारखी वाट पहात होतों इतक्यात एक दिवस श्रीपादचें पत्र येऊन टपकल

“ प्रिय मित्र बापू,

होणार, होणार, ह्मणून गाजलेले नाटक एकदाचें झाले,–पार पडलें. विन्याच्या भानगडीचा एकदाचा निकाल लागला आणि–पण तसें कशाला मी सारी हकीकत सगतवारच लिहितों

तुझें पत्र आले त्यानंतर एक पधरा दिवसाची गोष्ट मी आपल्या खोलीत आळ्याच्या बाबूशीं गूढगुजन करीत पडलों होतों इतक्यात धाडदिशीं दार ढकलून विन्या वावटळीसारखा माझ्या खोलींत शिरला आणि “ पहा लेका शिरप्या” असें ह्मणत माझ्या डोळ्यांपुढें कागदाचें एक चिटोरें नाचवीत स्वत हि नाचू लागला. मला वाटलें कीं ह्याला वायु बियु तर नाहीं झाला ! पण तसें काहीं दिसेना शेवटी चिडूनच मी म्हणालो,

“ लेका, अस झालं तरी काय विंचू चावल्यासारखा नाचतो आहेस ते ? ”

“ काय, व्हायचं काय ! लेका जिंकली–शकर टक्के जिंकली अरे, ह्या भानगडीच्या दलालान हात घातला अन् काम यशस्वी झाल नाहीं अस कधी झालंय ? ” असें म्हणून त्यानें तें चिटोरें माझ्या अगावर फेकलें त्यावर खालील मजकूर लिहिला होता

“ श्री विनायकराव चव्हाण ”

आपलें पत्र पावले आभारी आहें आपण उद्या संध्याकाळीं पांच वाजता घरीं भेटाल तर उपकार होतील त्यावेळीं घरीं कुणींच नसतें

आपली
मीरा

" बघ लेका खालीं काय लिहिलं आहे तें. आपली मीरा–आपली " असें म्हणून विन्या माझ्या तोंडासमोर हात बोटें नाचवू लागला मी मुकाट्यानें तें पत्र त्याच्या हवालीं केलें

आता पुढची हकीकत सांगण्यापूर्वी विन्यानें मीराला पाठविलेलें पत्र तुला वाचायला मिळेल तर चांगले होईल सोबत त्या पत्राची एक नकल पाठवीत आहे. ह्याचेंच वरील उत्तर आहे हे पत्र कुठें मिळालें तें मात्र मला विचारू नकोस.

( विन्याच्या पत्राची नकल )

"मीराबाई,

कसा मायना लिहावा ह्याची मला पंचाईत पडली असल्यामुळें नुसतें मीराबाईच लिहिलें आहे. पण त्यामागें असलेल्या माझ्या प्रामाणिक भावनाचा विचार करून तुम्ही रागावणार नाहीं अशी मला आशा आहे मी आपल्याला हें पत्र पाठविण्याचें धाडस करीत आहें तें केवळ आपल्या सौजन्याच्याच भरव-शावर मीराबाई, तुम्हाला कल्पना नसेल पण तुम्ही ह्या कॉलेजात पाऊल टाकल्यापासून माझ्या आयुष्यात एक अजब क्रांति घडून आली आहे तुम्ही कॉलेजात पाऊल टाकलं आणि तुमचें तें पांढरें फटफटीत कपाळ पाहून माझें हृदय कसें भडभडून आलें तुमचे निस्तेज भाल म्हणजे आमच्या समाजाच्या हृदयशून्यतेची बिनअक्षरीं जाहिरातच आहे. खरोखर अशा किती निष्पाप बालिका आमच्या समाजाच्या निष्ठुर रूढीच्या वणव्यात बळी जात असतील मीराबाई, जगात येऊन सुखी होण्याचा प्रत्येक प्राण्याला हक्क आहे असें असतांना समाजानें तुमच्यासारख्याचा हा हक्क हिरावून घ्यावा हा निव्वळ जुलम आहे. त्यात, मीराबाई, तुमच्यासारखें कोमल फूल निष्कारण ह्या जुलमानें चिरडलें जावें हे पाहून माझ्या जिवाचें पाणी पाणी होत आहे काय बरें असा अपराध केला आहे ह्या नाजुक फुलानें ? विधात्याच्या घटीतावर कुणाचा बरें ताबा आहे मग त्याबद्दल मनुष्याला शिक्षा देणें हा निर्दयपणा नव्हे का ? मीराबाई, तुम्हीं समाजाच्या ह्या अन्यायाविरुद्ध बंड करायला पाहिजे नाजुक फुलानें सुद्धा वेळी वज्राचा कठोरपणा स्वीकारायला पाहिजे माझा तर निश्चयच झाला आहे कीं आपलें आयुष्य निदान एका तरी विधवेचा उद्धार करण्यात खर्ची घालायचें

मीराबाई, मी आपल्या सहकार्याची अपेक्षा करीत आहे मला खात्री आहे कीं आपण मला निराश करणार नाहीं

सर्वस्वीं तुमचाच
विनायक चव्हाण

बापू, विन्यानें हें पत्र कोणतें नाटक पुढें ठेवून लिहिलें हे मला माहीत नाहीं पण अगदीं नमुना आहे खास असें कळकळीचें हृदयाविष्करण पाहून बिचारी मीरा अगदीं चाट झाली असली तर नवल नाहीं मला सुद्धा मनांतल्या मनात विन्याच्या बहादूरीचा हेवा वाटायला लागला.

तिचें उत्तर आल्यावर विन्याची खूपच धादल उडून गेली तिच्याकडे जायचें तर कोणता सूट घालायचा हे ठरविण्यासाठी डोकें खाजवता खाजवता त्याचे हात दुखू लागल जवळच्या स्टॉकपैकीं एकहि त्याच्या पसतीला येइना शेवटीं स्वारींनीं आमच्याच सर्जवर धाड मारली बेहरामखानाकडून नवा कर-करीत टाय् आणि फ्लेक्सचा बूट खरेदी केला त्या दिवशी त्यानें दिवसातून तीनदा दाढी खरडली, आणि तीन वाजल्यापासूनच स्वारी खोगीर चढवून अगदीं तय्यार होऊन बसली अर्थातच त्याच्याबरोबर मलाहि नाचावें लागलें. त्याच्या सूटावर ब्रश मारता मारता माझे हात दुखून गेले. त्यामुळें त्याच्याप्रमाणेंच मला सुद्धा पाच केव्हा वाजतात असें होऊन गेलं

एकदाचें साडे चारचे ठोके पडले आणि विन्यानें सायकल बाहेर काढलीच विन्या तिच्या घरीं पोंहचला तेव्हा ती त्याची वाट पहातच बसली होती. तो येताच तिनें त्याच्याकडे पाहून असें कांहीं मोहक हास्य केलें—निदान विन्याला असें वाटलें—कीं विन्या अगदीं गारच झाला. त्याला खुर्चीवर बसवून " चहा आणते हं ! " असें म्हणून ती हसतच आत गेली पण विन्याला एक शब्द ऐकूं आला असेल तर शपथ त्याचे सारें लक्ष तिच्या हालचालीवर खिळून गेलें होतें. थोड्याच वेळात तिनें चहाचे दोन कप आणले आणि एक त्याच्या हातीं देऊन एक स्वत. घेतला.

किती तरी वेळ दोघेहि तसेच स्तब्ध होते शेवटीं तिनेंच सुरवात केली.

" आपलं पत्र वाचून मला खरोखरच फार आनंद झाला. आपल्या सारख्यानीं जर असं धैर्य दाखविलं नाहीं तर आमच्यासारख्या गाईंची कशी सुटका होणार ? " तिच्या स्वरांत कृतज्ञता असावी असें विन्याला वाटलें

" कसचं–कसच–" विन्या जिभल्या चाटूं लागला.

" खरंच, आपण फार उदार आहात " विन्या घायाळ झाला

" मीराबाई, केवळ आपल्या आधारावर ह्या माझ्या उड्या आपणच माझ्या स्फूर्तीदेवता आहात. आपलं सहकार्य मला मिळाल तर मीं कळीकाळालाहि भिणार नाहीं " विन्याला पाठ केलेलीं वाक्यें आठवूं लागलीं

" अवश्य, मीं अगदीं मनापासून मदत करीन आपल्या ह्या उदात्त कार्याला. माझी एक मैत्रिण आहे "

" म्हणजे ' " विन्या बुचकळ्यात पडला.

" ती सुद्धा विधवाच आहे आणि तिला आपल्यासारख्याच्या मदतीची फार आवश्यकता आहे मनूताई, जरा इकडे ये बघूं "

मीरानें हांक मारताच एका तिशी उलटलेल्या जाडजूड रमेनें जवळचा दरवाजा उघडून खोलींत प्रवेश केला

बस्स. मला वाटतें आतां जास्त विस्तार करण्यांत काहींच अर्थ नाहीं एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं विन्याला टांग्यांत घालून खोलीवर आणावें लागलें आणि रात्रीं झोपेंत सुद्धां तो दचकून उठत होता

तुझा मित्र
श्रीपाद "

ता क.—विन्या हल्लीं समाजसुधारणेचें व्याख्यान विसरलेला दिसतो.
—श्रीपाद.

* * *

—ह्यानतर एक महिन्यानें जेव्हां श्रीपाद–मीरा ह्याच्या शुभमंगलाची पत्रिका माझ्या हातीं पडली तेव्हा बूट आणि टायसाठीं श्रीपादजवळून घेतलेले पैसे विन्यानें परत केले नसावे अशी माझी बालंबाल खात्री पटली

# सरकारी गोदाम

तोंडातील विडीचा एक लांबलचक झुरका मी मारला, तोंच बोटांना असा कांहीं झणझणीत चटका बसला की हातातील विडीचें थोटुक फेकून मी धडपडतच उठलो

तोंडात बोट घालीत समोर नसलेल्या कुणाला तरी एक इरसाल शिवी हासडून मी पुढें निघालों महालाच्या टांगा-स्टँडजवळ खूप गर्दी जमलेली होती नाकातोंडात सहज छटाक दोन छटाक धूळ जात होती 'चालयच महाराज !' टेसन-एक सवारी' म्हणत टांगेवाले गिऱ्हाइकांना गठवायचा प्रयत्न करीत होते 'चालो ना बाबू, टेसन—आपलाच टांगा आहे'—एकाने मला हटकलें परंतु माझ्या फाटक्या कोटाकडे आणि मळक्या धोतराकडे लक्ष जाताच त्याचें सरळ नाक वाकडे झालें आणि तो दुसऱ्या एका बूट-हॅटवाल्या साहेबामागे धावला

मीहि वेडेंवाकडें तोंड करीत पुढें निघालों पाताळेश्वराचा पुजारी जोरा-जोरानें घंटा बडवीत होता. 'कोईभी चीज दो दो आना' म्हणून फेरीवाले तालासुरात ओरडत होते जवळच्याच नरसिंग टॉकीजमधून 'तुम्हींने मुझको प्रेम सिखाया—' म्हणून कुणी तरी आपल्या फेरीवाल्यालाहि लाजविणाऱ्या आवाजांत स्वत:ची प्रेमकथा सुनवीत होता. आणि त्या कोलाहलानें उबूनच की काय मोरू-भाऊ अभ्यंकराचा पुतळा पांढराफट्ट पडला होता.

इतक्यात जवळच्या पानाच्या दुकानासमोर पट्टी चघळत असलेल्या सोका-जीनं मारलेली पानाची पिचकारी नेमकी माझ्या पायावर पडली

"तेरी मा–" मी तोंडातल्या तोंडात पुटपुटलों आणि नरसिंग सिनेमाच्या प्रवेशद्वारावरून माझ्याकडे पाहात डोळे मोडणाऱ्या स्वरूपसुदर वनबालेला आपली फाटकी पाठ दाखवून जो पुढं निघालों तो थेट बळवंतराव टिळकाच्या पायाशी येऊन उभा राहिलो. बळवतरावांचा चेहरा काळाठिक्कर पडला होता

"कस काय मि बळवतराव, जगाची हालत तुम्हालाहि नाहीं वाटत पसत? अहो, पण त्यात एवढं चेहरा मारण्यासारखं काय झाल? मी बघा, चार महिने झाले कंट्रोलच्या दुकानातील मातीच्या रोट्या खातों आहें. गेल्या दोन महिन्यात तादूळ पाहिला नाहीं. पंधरवडा झाला घरात दिवा लागत नाहीं, कारण देशातील मातीच्या तेलाच्या टाक्याच साऱ्या आटल्या आहेत विजेच्या कारखान्यांतील यंत्रात उंदीर अटकल्यामुळें गल्लीतला दिवा सुद्धा लागत नाहीं हा बघा, म्युनिसिपाल्टीच्या खड्ड्यात अडखळून पडल्यामुळे पाय कसा सुजला आहे तो. तीनदा झोपेंत विंचू चावला बोला, आणखी काय पाहिजे? इतकहि असून झाली आहे मला कांहीं धाड? आणि तुम्ही इथ नुसत फत्तरासारख उभ राहव लागत म्हणून रडता—" कुणीं तरी मुक्तात्मा लोकमान्याना हितो-पदेश करीत होता

त्या महात्म्याला मनांतल्या मनात नमन करून मी निंडहॅम पार्कात दाखल झालो शुक्रवार तलावाला एकलेपणाची आग लागली नसताहि निव्वळ काठावर बसलेल्या लोकाचा सूड घेण्यासाठीं तो एखाद्या कवीप्रमाणें उष्ण निःश्वास टाकीत होता पार्कातल्या खोडाना उगवलेल्या काटक्यांवर वटवाघळे, योगाच्या नादानें पछाडलेल्या उल्लू प्रोफेसराप्रमाणें, वर पाय आणि खालीं डोकें करून लोंबत होतीं उद्यानांत गुलाबच काय पण कोरांटीचेंहि फूल नसल्यामुळें भ्रमराची वानवाच होती. त्यांची उणीव भासूं नये म्हणूनच कीं काय मच्छराचे थवे डोक्यावर घोंगावत होते.

मी त्यांतल्या त्यात चागलीशी जागा पाहून फतकल मारली तलावाच्या पाण्यावर पाणकोंबड्या फडफड करीत होत्या दोन चार उघडीं नागडीं कारटीं त्यात डुंबत होतीं. दूरून एक पतंग येऊन पाण्यावर पडला, आणि तीं पोरें त्या पतंगा-साठीं आपसांत भाडूं लागलीं.

माझ्याजवळचं एक पेन्शनर असोसिएशनचं टोळकें टकलावरून उपरणीं फिरवीत बसलें होतें

" काय दिवस आले आहेत कुणाला ठाऊक कलियुग आलं हेंच खरं ! " एक तपकीर नाकांत कोंबीत उद्‌गारला.

" अहो, कसलं कलियुग घेऊन बसलात ही सगळी सरकारची कारवाई आहे आपल्या लढाईसाठीं हे आम्हाला बळी देत आहेत. तुम्हीच सांगा, धान्य गेलं कुठे ? कुठे दुष्काळ पडल्याची बातमी नाहीं, की कुठे अवर्षण नाहीं सैन्यासाठी आमचं सारं धान्य लुटून नेलं आणि आम्हांला उपाशी मारताहेत. पण आमचे लोकहि त्याच योग्यतेचे आहेत. उपाशी मरताहेत पण एक लेकाचा कांहीं करेल तर शपथ ! पाणीच नाहीं आमच्या लोकात— "

पंचवीस वर्षें सरकारी पेन्शन खात असलेला एक म्हातारा नाकानें फुर्रर असा आवाज करीत म्हणाला

माझ्या छातींत धडकी भरली आता आपल्याला एखादें वीररसप्रचुर देशभक्तीवरील व्याख्यान ऐकायला मिळणार असें वाटून मी उठलों आणि जो धूम पळत सुटलों तो एकदम टाउन हॉलजवळच धापा टाकीत उभा राहिलो. नगरभवानीचें तें पुरातन वसतिस्थान पाहून मला काहींसें हायसें वाटतें न वाटतें तोंच फाटकाच्या दारावर एक भलें जंगी पोस्टर माझ्या दृष्टीस पडलें त्यावर लिहिलें होतें,—

**" दुष्काळाच्या पार्श्वभूमींत**
**अनुस्युत असलेल्या आर्थिक**
**अंतरंगाची विचिकित्सा "**

अरे बापरे ! काय हें अगडबंब नाव ! असल्या अफाट विषयावर बोलणारा वक्ता केवढा विद्वान असला पाहिजे ? माझ्या टाळक्यात मात्र त्या पोस्टरवरचें एक अक्षरहि शिरलें नाहीं कसला अर्थ व त्याचा कसला विचका हें जरी मला समजलें नाहीं तरी व्याख्यात्याच्या विद्वत्तेनें माझी छाती दडपून गेली, आणि महाऽ चौकांतील, पूर्वी देशभक्त पूनमचंदजींचें कापडाचें दुकान असलेल्या परंतु हल्लीं सोडा लेमन—एक आणा ' मध्यें पर्यावर्तित झालेल्या, दुकानांत मी शिरलों

' एक थंडा सोडा— ' कोटाचे खिसे चाचपीत मी ऑर्डर दिली.

थंडा सोडा घशाखालीं उतरत असताच जवळच्या राऊंड टेबलाभोंवती जमलेल्या कॉन्फरन्समधील वादविवाद माझ्या कानावर आदळत होता. त्यात

आमच्या घरामागें किल्ल्यासारखें भक्कम मकाण बांधून राहात असलेले शेठ पानमल लल्लूमलहि होते. शेठजी म्हणत होते, " इस साले शैतानी अंग्रेज सरकारनें सब अनाज फौजके लिये दबा रखा है, और हम लोक भूखे मरतें है "

शेठजींच्या पूर्णवर्तुळाकार पोटावरून मला त्यांचे बोलणें खरें वाटेना, पण एवढ्या मोठ्या माणसाच्या बोलण्यावर अविश्वास दाखवायची माझी हिंमत नव्हती शेठजी तसे मातबर देशभक्त होते डोक्यावर गांधीची चार आणेवाली टोपी घालीत नसले तरी कस्तुरबा फंडाला त्यांनीं चांगली घसघशीत देणगी दिली होती. चरखा फंड, ग्रामोद्योग फंड, हरिजन फंड, वगैरेंतहि त्यांच्या गंगाजळीचा हिस्सा असेच निवडणुकींचा बराचसा खर्च त्यांच्या तिजोरीतूनच होई अर्थातच निवडणुकींत कोणता उमेदवार उभा करावा हें ठरविण्यात सुद्धा त्यांचा बराच हात असे शिवाय सरकार दरबारींहि शेठजींचें चांगलेंच वजन होतें कारण देशभक्त असले तरी वॉर फंडाला त्यांच्याकडून नेमाने देणग्या जात गव्हर्नरच्या पार्टीलाहि त्यांना आमन्त्रण असें व तें न चुकविण्याची ते खबरदारी घेत मधून-मधून ' राष्ट्रीय युद्ध आघाडी ' च्या सभांचेंहि ते अध्यक्ष असत.

अशा सर्व दृष्टींनीं वजनदार असलेल्या माणसाच्या बोलण्यावर म्या पामरें काय अविश्वास दर्शवावा ? मी तिथून मुकाट्यानं उठलों आणि घरचा रस्ता धरला

घरीं येताच कोट कोपऱ्यात फेंकून पाटावर जाऊन बसलों आईच्या शिव्या आणि कंट्रोलच्या दुकानातल्या ज्वारीच्या भाकरीचे तुकडे पाण्याच्या घोटाबरोबर पोटांत ढकलीत होतो

" मेल्यानों, रात्र रात्र हिंडता. इथं तुमची वाट पहात बसायला मी काय तुमची मोलकरीण आहें ? "

मी दांत विचकले आणि पाण्याचा घोट घेऊन पाटावरून उठलो

खिशातील विडीचा अर्धा तुकडा शिलगावून मी त्याचे झुरके मारीत अंथरूणावर पडलों होतों. माझ्या मनांत सारखे तेच विचार घोळत होते सरकारनें अनाज दबाया ! पण कुठे ? डी सी. च्या बंगल्यावर कीं गव्हर्नरच्या कोठींत ? मी या कुशीवरून त्या कुशीवर लोळत होतो, पण झोप काहीं येईना. आकाशातल्या तारा माझ्या या अवस्थेकडे पाहून इब्लीसपणानें हंसत होत्या माझ्या तोंडानून एक इरसाल शिवी बाहेर पडली आणि तोंडांतलें विडीचें थोटूक मी दूर भिरकावून दिलें.

★

आकाशातील गडगडाटानें माझी झोंप मोडली, माझ्या दैन्याची दया येऊनच कीं काय आकाशातील मेघानी मघा मला वेडावणाऱ्या ताऱ्यावर सूड घ्यायला सुरवात केली होती साऱ्याच्या चेहऱ्यावर ते काजळ फासून मोकळे झाले होते पण मला कृतघ्नाला कांहीं त्याचे आभार मानायची बुद्धि झाली नाहीं उलट झोंप मोडल्याबद्दल त्याना शिव्या देतच मी वाकळ गुडाळली आणि घरांत गेलों.

—इतक्यात 'चोर–चोर' अशा आरोळ्या ऐकूं आल्या. आता मात्र इलाजच नव्हता. बाळपणापासून रक्तांत मुरलेला शेजारधर्म तिकडे कानाडोळा करून झोंप घेऊ द्यायला तयार नव्हता मी कोपऱ्यातला सोटा उचलून सरळ त्या अंधाऱ्या गल्लींत शिरलों

गल्लीच्या टोकाशीं आपल्या घराच्या मागल्या दारात उभे राहून शेठजी उर बडवीत होते याच्या घरीं चोरी झाली का ? मनांतल्या मनात वाईट वाटण्याऐवजीं थोडेसें बरेंच वाटलें इथूनच परत जावे असाहि दुष्ट विचार मनात येऊन गेला परतु स्वत चाच त्याबद्दल निषेध करून मी पुढें सरसावलो

"काय, झालं काय शेठजी ? कसली चोरी ? कुणी केली ? "

"मेरे अनाजके बोरे–हाय मै लूट गया साले, मेरा अनाज ले गये."

"कहां ? किधर भागे ? "

"इस बाजू–लॉरीमे भागे –"—

लॉरींतून पळाले हें ऐकून त्यांचा पाठलाग करण्याचा मूर्खपणा करणें मला शक्यच नव्हतें. शेठजी अगदीं भांबावून गेले होते. त्याना कसलीच शुद्ध राहिली नव्हती

"कुठून शिरले ? कुठून नेल धान्य ? " असें म्हणत मी घरांत शिरलों. शेठजी पुढें होऊन वाट दाखवूं लागले. परतु कोठीच्या दाराशीं येतांच शेठजी एकाएकीं थाबले. त्यांच्या मनांत कसला विचार आला कुणाला ठाऊक, ते एकदम थबकले आणि म्हणाले,

"रहने दो जी, अब माल तो गयाहि है फिर किस लिये आप तकलीफ उठाते हो ? "

पण मी तसाच पुढें शिरलों. "नाहीं नाहीं शेठजी, तकलीफ कसली !

कोर्टात साक्षनिक्ष द्यायला बरं पडेल." कोर्टात मिळणारा दीड रुपया माझ्या डोळ्यांपुढें दिसत होता.

मी आंत शिरलों आणि धान्याचीं पोतीं बघू लागलों

एक–दोन–पाच–पन्नास–सत्तर–पंचाण्णव––

मी आ वासून शेटजींकडे पाहूं लागलों शेटजी लाचार मुद्रेनें माझ्याकडे बघूं लागले

"शेटजी, सरकारनं तुमचं तळघर धान्याची गोदाम बनविण्यासाठीं भाड्यानं घेतलेलं दिसतं!" मी उद्गारलों.

शेटजींनीं दांत विचकले आणि शंभर रुपयाची एक नोट घाईघाईनें माझ्या हातात कोंबली.

# बच्चा, कल बचके रहना !

शेख अबदुल्ला हमीदभाई, खास दिल्लीवाला पान बनवणार, आपल्या ठेल्यावर बसून, छचोर गझलाच्या तालावर पितळी दांड्यानें मिठा पानाच्या पाठीवर काथ फाशीत होता. खास दिल्लीचें मसालेदार पान घेऊनच अबदुल्ला हमीदभाई नागपुरांत उतरला होता असें नाही, तर थेट अकबर बादशहापर्यंत भिडवलेली आपली वंशावळहि काखोटीला मारून तो अवतरला होता. त्याचा अगदी सख्खा पूर्वज अकबर बादशहासाठीं खास ताबूल बनवण्याकरता बेगम जोधपुरीच्या तैनातीला होता असें तो आपल्या गिऱ्हाईकाना ठासून सांगत असे. अर्थात् अकबरशहासाठीं बनविलेल्या पानात जें कौशल्य तेंच कौशल्य आपल्या पूर्वजाचा सख्खा वारस म्हणून अबदुल्ल्या-पाशी आलें होतें. आणि तेंच सव्वा लक्ष गुणी पान शेख अबदुल्ला हमीदभाई आपल्या गिऱ्हाईकाना मोठ्या उदारतेनें ढब्बूला दोन या भावानें देत असे !

अर्थात्च असल्या गुणी माणसाला घाणेरड्या बोळात खोक्याच्या ठेल्या-वर बसायचा प्रसंग कां आला असें विचारणें सभ्यतेला धरून नव्हतें आणि एखाद्या असभ्य गिऱ्हाईकानें असला खवचट प्रश्न केलाच तर त्याचें तोंड बंद करण्याची तरकीबहि अबदुल्ल्याजवळ 'नमक सुलेमानी' इतकीच परिणामकारक होती. " अजी, आज कल कदर क्या है किसकू इलमकी ? आजच्या आबदशौकी इस्तरीवाल्या साहेबांना मिजासच कुठं आहे पानाची ? अरे, हे लोक काय पान खातील ?—कचरा ! कडबा चबानेवाले बैल है साले सब "

बोला, यावर उत्तर देऊन अबदुल्ल्याशीं वाद घालायची तयारी आहे तुमची ? असा हा महापुरुष, शेख अबदुल्ला बिन हमीदभाई, धंदा पानवाला, आपल्या ठेवल्यावर बसून गिन्हाईकांना निरोप देण्याच्या फिकीरींत होता. बारा वाजताची वेळ टळून गेली होती सकाळचा नाश्ता कुठल्या कुठे गडप होऊन पोटात तयार झालेला निर्वात प्रदेश घराचा रस्ता सुधारण्यासाठीं त्याला सारखा टोंचीत होता परंतु समोरच्या साडेतीन पैशाच्या गिन्हाईकाचा मोह न आवरल्यामुळे तसाच उठलेला खाली बसून त्यानें विल्सच्या गोल्ड फ्लेकच्या पाकिटातून दोन धेलेवाल्या ‘गोल्ड फ्लेक’ काढून आपल्या आश्रयदात्याच्या हातावर ठेवल्या व बाकीच्या पैशाचें पान लावण्यासाठीं तो सरसावून बसला

परंतु यंत्राप्रमाणें त्याचे हात पान लावण्याचें कार्य करीत असले तरी मन मात्र इतवारी पोस्टामागील अंधाऱ्या गल्लींत असलेल्या, चार गंजलेल्या टिनपाटाचे पत्रे, सहा फाटके तट्टे आणि दोन असंख्यात खिडक्यानीं विभूषित अशा तरटाचे तुकडे, इतक्या साहित्यानें बनलेल्या खुराड्यात घोटाळत होतें

पोटात कोकलणारे कावळे तर घराची याद देतच होते, पण कोंबड्या आणि बदकाच्या परिवारात चुलीसमोर बसलेली त्याच्या रंगमहालाची बेगम त्याच्या डोळ्यापुढें उभी राहून त्याचा जीव हैराण करीत होती तेलानें थुतलेल्या ओढणीच्या पदरात लपेटलेली, बेडकीसारख्या बटबटीत डोळ्याची मालकीण आपल्यासाठीं दाराकडे पहात तिष्ठत बसली असेल ह्या विचारानें तो सारखा चुळबुळ करीत होता शिवाय सकाळींच पाठीवर दोन वळ उठवून तिला आपल्या पौरुषाची खात्री त्यानें पटवून दिली असल्यामुळें दुपारीं होणारें स्वागत काहीं औरच राहील अशी त्याची खात्री होती त्यामुळें शेवटलें पान गिन्हाइकाच्या हातीं टाकून साडेतीन पैशाचें भांडवल त्यानें खिशात टाकलें तेव्हा त्याला जन्नतचा मार्ग काटल्याइतका आनंद झाला काथाचें हात आणि ओलीं पानें पुसूनपुसुन तुळतुळीत बनलेलें मांडीवरचं मेणकापड कोपऱ्यात भिरकावून दुकान बंद करण्यासाठीं तो सामान आवरू लागला

इतक्यात त्याच्या कानांवर आवाज आदळला—“ इन्किलाब ’ जिंदाबाद ! ”

समोरच्या कोपऱ्यावरून सैरावैरा धावणाऱ्या लोकांची एक झुंडच्या झुंड त्याच्या दुकानाकडे वळली

“ इन्किलाब, जिंदाबाद ! ”

आपल्या लाडक्या पुढाऱ्याच्या अटकेमुळे क्षुब्ध झालेले ते लोक कसली तरी नशा चढल्यासारखे वागत होते आपण काय करतों ह्याची त्याना कल्पना नव्हती, कुठे जातों आहों हें माहीत नव्हतें क्रोधामुळें तापलेलें रक्त मस्तकात चढून त्याना कांहीं दिसेनासें झालें होतें

" ए, पानवाल्या– " त्यांच्यापैकीं बाकड्या नाकाच्या एका काळ्याकभिन्न पोरानें दरडावले त्या साऱ्या भाऊगर्दीचा तो सेनापति दिसत होता.

" क्या कहता है बे ! " पिढीजाद मुसलमानींत अबदुल्यानें साद घातली.

" दुकान का नाही बंद करीत ? माहित नाही आज हरताळ आहे तें ? "

" हडताल !–कायचा हडताल ? "

" कशाचा हरताळ ? अरं, आज महात्मा गांधींना पकडल. आजपासून आजादीची जंग सुरू झाली आहे. तुला माहीत नाही ? किती रे तूं अज्ञानी ! "– गर्दींतला एक स्वच्छ पायजम्याचा नाजुक कॉलेजी युवक.

"देख साला. सब दुनियांमे हलचल मच गई है, और ये लगाता है पानको चुना ! चल, कर बंद दुकान "—म्होरक्या गुरगुरला

" ए, देख भाई, तुझा गांधी अन् तुझी आजादीची जंग तूं आपली पाहून घे हमारे जिन्नासाहबनें हमे कुछ नहीं बताया जिन्नासाहेबाचा फर्मान येत नाहीं तोंपर्यंत मी नाही दुकान बंद करणार " अबदुल्ल्यानें शेवटला निर्णय दिला त्याची भक्तिभावपूर्ण नजर आरशाच्या शेजारींच टांगलेल्या कॅलेंडरवरील जिनासाहेबाच्या फोटोवर क्षणभर स्थिर झाली

" काय ? नाही बंद करीत ? देशद्रोही, देशद्रोही "—एकच गलका

" हे साले मुसंडे असेच " –एक हिंदुत्वनिष्ठ

" बदमाश ! देखते क्या ? जलादो सालेका दुकान " गर्दींतल्या कुणीतरी ओरडून जमावातल्या माकडाच्या हातीं कोलीत दिलं पाहता पाहता अबदुल्लाच्या इवल्याशा ठेल्याला अग्निज्वालांनीं चहूकडून वेढून टाकलं

एक तासानंतर अबदुल्ला, कपडे फाटलेले व दोन दात कमी अशा अवस्थेंत, एका छोट्याशा राखेच्या ढिगाशेजारी उभा राहून पोलिसच्या आगमनामुळें जवळच्याच गल्लींतून पसार होणाऱ्या बाकड्या नाकाच्या म्होरक्याला मुठी वळून धमक्या देत होता

★

त्या दिवशीं संध्याकाळी शेख अबदुल्ला जेव्हा इतवारी पोस्टाजवळच्या गल्लींत शिरला तेव्हा मनांतल्या मनात साऱ्या जगाला शिव्या देत तो चालला होता. दुकान जाळणाऱ्यांना, त्याच्या म्होरक्याला, गांधीला, कॉंग्रेसला—इतकेंच काय, पोलिसालादेखील आज त्याच्या शेलक्या इरसाल शिव्यांचा आहेर मिळत होता आज त्याच्या साऱ्या जिंदगीवर धाड आली होती. स्वातंत्र्य मिळालें कीं नाही हा विचार एक क्षणभर देखील त्याच्या मनांत आला नव्हता पण आपल्या आयुष्याचें न भरून येणारें नुकसान झालें आहे हें मात्र त्याच्या डोळ्यासमोर दिसत होतें. आणि म्हणूनच तो इतका चिडला होता.

त्या दुकानावर त्याचें आणि त्याच्या बिबीचें पोट अक्षरश अवलंबून होतें. कारण लवकरच तो बाप होणार होता अशा परिस्थितींत त्याच्या उत्पन्नाचा एकमात्र मार्ग एकाएकी बंद झाला उद्याची वाट काय हा प्रश्न दत्त म्हणून त्याच्यासमोर उभा राहिला आयुष्यात हजारो धंदे हाताळून आणि त्यात ठोकरा खाऊन सेवटीं तो ह्या ठेल्यावर स्थिर झाला होता पण तो आधारहि आज त्याच्या डोळ्यादेखत खाक झाला. नवें दुकान लावायचें म्हणजे पांच पन्नासांचा तरी सवाल होता आणि त्याच्या खिशांतले शेवटले दोन आणे तर कालच ‘ हंटरवाली ’ च्या दुसऱ्या खेळात खलास झाले होते. शिवाय दिवस असे ’

आणि झालेला तो प्रकारच इतका अनत्याचारी होता, कीं त्यानें त्याचें डोकें तापून गेलें होतें.

—एका झटक्यासरशी तरटाच्या दोन खिडक्यांतील आपपरभाव नाहीसा करीत त्यानें आपल्या घरट्यात पाऊल टाकले पण दरवाजातच तो थबकला घरात जाऊन बिबीला काय सांगायचें ? बराच वेळच सुन्न चित्तानें तो दरवाजांतच बसून राहिला.

फट्-फट्-फट् !

इतक्यांत बंदुकींच्या फैरींचा आवाज आला अबदुल्ल्याची उत्सुकता जागृत होऊन त्यानें तरटातून डोकावून बघितलें बाजूच्या इतवारी पोस्टाच्या इमारतीवरून धुराचे आणि ज्वालांचे झोत पसरत होते हजारो लोक अमलल्या-प्रमाणें मोठा कोल्हाहल चालू होता लोक पागल झाल्याप्रमाणें एकसारखे त्या जळत्या इमारतीवर धोंडे फेकीत होते पाच सात पोलिसचे शिपाई जीव वांचवायला जागा बघत होते.

इतक्यात लष्कर आलें ! बंदुकींच्या फैरी झाडू लागल्या एका क्षणात लोकाचीं डोकीं ठिकाणावर आलीं ज्या तीव्रतेनें ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध

ते आपला असंतोष प्रदर्शित करीत होते, त्याच तीव्रतेनें त्याना भीतीनें घेरलें जो तो जीव वांचवायसाठीं सैरावैरा पळूं लागला क्षणार्धात अबदुल्ल्याचें चित्त ह्या नवीन प्रकारानें वेधून घेतलें थोड्या वेळापूर्वी डोक्यात गर्दी करणारे विचार कुठल्या कुठे पळून गेले.

असहाय जीवाची प्राण वाचविण्यासाठीं चाललेली धडपड ! आणि शिपायांनीं थंड्या निर्दयतेनं चालवलेली त्यांची शिकार ! अबदुल्ल्याचें रक्त तापून गेलें. पण तो बलहीनाचा राग काय करणार ? बंदुकीपुढें धोंड्याचें चालत नाही हें त्याला माहित होतें दाराआड राहून स्वत च्या प्राण वाचवण्यापलीकडे तो कांहीच करूं शकत नव्हता

इतक्यात एक इसम धावत धावत त्याच गल्लींत शिरला. पोलिसांच्या सपाट्यातून वांचण्यासाठीं तो जीव घेऊन पळत होता कुठे अडोशासाठीं जागा मिळेल म्हणून तो क्षणभर थबकून इकडे तिकडे बघूं लागला

सूं सूं ऽऽऽ

त्याच्या पायजम्याला भोक पाडून एक गोळी आरपार निघून गेली अबदुल्ल्याच्या तोंडून उद्गार निघाले, "मर गया साला !"

पण तो मेला नव्हता. गोळी पायजम्यांतून निघून गेली; ती पायाला स्पर्श करूं शकली नाही. पुन्हा तो जीव घेऊन पळत सुटला. अबदुल्ल्याच्या हाडाहाडात भिनलेला सरकारद्वेष उसळी मारून वर आला. पण उंबरठ्याच्या पलीकडे जाणें म्हणजे निव्वळ मूर्खपणा होय हें तशातहि तो विसरूं शकला नाहीं

धावतां धावतां तो इसम अबदुल्ल्याच्या दरवाजाजवळ आला पण त्या वेळी अबदुल्ल्याच्या डोक्यात बिबीच्या गोषाचा विचार आला नाही सकाळीं याच पागल लोकांनीं आपलें दुकान जाळलें होतें हेंहि त्याला आठवलें नाही. पटकन् एक पाउल पुढें टाकून त्यानें त्याला घरांत खेचलें, त्याचा जीव वाचवला

त्या इसमानें अबदुल्ल्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें अबदुल्ल्यानें त्याच्याकडे पाहिलें.

"अच्छा तो बेटा तुम हो."—तो सकाळचाच वाकड्या नाकाचा पोरगा होता

"तू. तुम तूं" तो आश्चर्यानें उद्गारला

"नही तो क्या बेटा ? वो पोलीसको मारने दूं ? अरे वारे साले ! वो क्या मेरा बाबा है ? लेकीन हा बेटा, अभी बचाया तो ये मत समझना की सुबहकी बात मै भूल गया हू. आज बच गये हो, लेकिन बच्चा, कल बचके रहना !"

---

# विजयी विश्व तिरंगा प्यारा--

विश्वनाथला मुकर्जीचा भयंकर राग आला होता म्हणे आम्ही पैशासाठीं ब्रिटिशाच्या राज्याचें रक्षण करीत आहोत ! आम्ही देशद्रोही आहोत ! विश्वनाथनें त्याला सांगितलं, "मुकर्जी, लेका, तूं मूर्ख आहेस, गद्धा आहेस. अरे कुठला देश आणि कुठलं राष्ट्र घेऊन बसला आहेस आजपर्यंत या राष्ट्रानं कधी आपल बर केल आहे आन माझच बघ कुठल्या तरी एका लहानशा गावातल्या शाळेत मास्तरकी करीत पडलों होतों पिचत जीव नकोसा झाला होता त्या कंटाळवाण्या आयुष्यान पण त्यावेळीं आलं का हे तुझ राष्ट्र माझ्या मदतीला धावून ? नाहीं ना ? झाल तर मग आपण तरी कां या राष्ट्राची पर्वा करावी ? तुला अगदीं इमानान सांगतों बघ मुकर्जी, मला या राष्ट्राची मोठी चीड येते ती भिकार मास्तरकी गेली आणि हें लढाईच काम मिळाल किती मजा आहे इथ. धाडसाला वाव भरपूर आणि खाण्यापिण्याची चैन अस असताना ह्या तुझ्या राष्ट्रानं का मध्यें धाड मारावी जाऊ दे दोस्त, तू या राष्ट्राची मुळींच पर्वा करू नकोस. आपल्याला राष्ट्रद्रोही म्हणणारे लोक गाढव आहेत सारं जग गाढव आहे

अशा रीतींन विश्वनाथानें मुकर्जीला हडसून खडसून बजावले कीं तो गद्धा आहे, जग गाढव आहे, लोक सुद्धां गाढव आहेत आणि राष्ट्र म्हणजे दुसऱ्याच्या

कारभारात उगाच लुडबुड करणारी एक बाह्यात चीज आहे त्यावेळीं विश्वनाथला वाटलें की आपण मुकर्जीला काय झक उत्तर दिलें क्षणभर तर त्याला असेंहि वाटलें कीं विमान चालविण्यात आपला हात धरणारा जसा या पथकात कुणी नाहीं, तसाच वादविवादातहि कुणी आपली बरोबरी करणार नाही. पण आता बिछान्यावर पडल्या पडल्या जेव्हा तो विचार करू लागला तेव्हा त्याला वाटलें कीं—काय वाटले तें त्याला सागता आलें नसतें मघाचा तो हडसून खडसून आणलेला आवेश कुठल्या कुठें पळाला होता. त्याच्या स्वत:च्या मनाचें समाधान काहीं त्या उत्तरानें होत नव्हतें

दुनिया त्याला म्हणत होती, "तू राष्ट्रद्रोही आहेस, तू परक्यासाठीं लढतो आहेस" तो दुनियेला उत्तर देत होता, "राष्ट्र गेल उडत राष्ट्रानं माझ्यासाठीं काय केल आहे ? मग मी त्याची कां पर्वा करूं ?"

राष्ट्रानें माझ्यासाठीं काय केलें ? छे, हें उत्तर काहीं मोठेंसें समाधान-कारक नाहीं जे राष्ट्र विचारें स्वत:च बंधनात आहे तें माझ्यासाठीं काय करूं शकणार ? त्याला बंधनातून सोडविण्यासाठीं मी काय केलं ? मग राष्ट्रानें माझ्यासाठीं काहीं तरी करावें अशी अपेक्षा बाळगण्याचा मला काय अधिकार ? मी तरी माझें कर्तव्य कुठें पार पाडलें आहे ?

मग मी काय करूं ? सोडून देऊं ही नोकरी ? करूं लढायचें बंद ? पण त्यानें काय होईल ? माझ्याप्रमाणेंच साऱ्यानी लढायचें बंद केलें तर काय होईल ? राष्ट्राचें कल्याण होईल ? शत्रूला मार्ग मोकळा करून दिला तर शत्रू सरळे सगळ्या देशावर कब्जा करील त्यात कसें कल्याण आहे माझ्या देशाचें ?

यावेळीं विश्वनाथला आठवलं कीं कित्येकाचा जपान हिंदुस्थानला स्वतंत्र करील असा दृढ विश्वास होता. त्याचा मित्र भार्गव यांचपैकीं एक होता पण त्यावर विश्वास ठेवण्याइतका विश्वनाथ गाढव नव्हता. मग मग करायचें काय ? लढत रहायचें ? कुणासाठीं ? कशासाठीं ? कुणाच्या रक्षणासाठीं ?

—उलटसुलट विचारांनीं त्याच्या मनात गोंधळ उडवून दिला होता, आणि त्यामुळें त्याचं मस्तक अधिकच भडकून गेलं आपल्याशींच एक शिवी हंसडून तो म्हणाला, 'कशाला ही राष्ट्राची पीडा जगांत निर्माण झाली कुणाला ठाऊक ?"

परंतु विश्वनाथच्या चडफडण्याच्या आता काहीं उपयोग नव्हता राष्ट्राची पीडा एकदाची निर्माण झाली होती, आणि विश्वनाथच्या सद्‌सद्‌विवेक बुद्धीच्या

मानगुटीला ती बसली होती. त्याच्यापासून स्वतःची सुटका करून घेणें विश्वनाथला जमलें नाहीं.

पहाटेच्या सुमारास विश्वनाथचा जरासा डोळा लागला. त्याच्या डोळ्यापुढें एक दृश्य दिसूं लागलें. त्याच्या कॅंपच्याजवळ असलेल्या गावात एक प्रायमरी शाळा होती. एक दिवस संध्याकाळीं विश्वनाथ गांवात फिरता फिरता त्या शाळेजवळ आला होता शाळेसमोरच्या पटांगणांत पुष्कळशीं छोटी छोटी मुलें जमली होती पटांगणाच्या मध्यभागीं तिरंगीं निशाण रोवलें होतें विश्वनाथानें त्या निशाणाकडे नजर टाकली उंच बांबूला बांधलेलें तें निशाण आकाशात मोठ्या डौलानें फडकत होतें आणि तीं बालकें आपल्या मंजुळ आवाजात गात होतीं—

विजयी विश्व तिरंगा प्यारा। झेंडा उंचा रहे हमारा।

—तिरंगा प्यारा आकाशांत डौलानें फडकत होता

वातावरणातील त्याच्या लहरींबरोबर आपल्याहि अंतःकरणात कसल्या तरी विचित्र लहरी उठत आहेत असें विश्वनाथला वाटलें आपल्याला वाटलें तितकें आपण राष्ट्राबद्दल बेफिकीर नाहीं असें त्याला आढळून आलें आणि आजच्या परिस्थितींत हा विचार त्याला फारसा सुखदायक वाटला नाहीं

—झोपेंत त्यानें कड बदलला

१९२० चा स्वातंत्र्यसंग्राम आज त्या गोष्टीला तेरा वर्षे झालीं पण त्या दृश्याची रेषान् रेषा आजहि त्याच्या डोळ्यापुढें उभी होती.

त्याच्या शहरातून प्रभातफेरी निघालेली होती पंच पंच प्रात काळीं आजीच्या गोड गोड भूपाळ्या तो झोपेंत ऐकत असे परंतु आज कित्येक दिवसात आजी सुद्धां घन श्याम सुंदराला आळवण्याचें विसरून रोज पहाटे ऐकूं येणारी 'तिरंगा प्यारा'चीं गाणीं लक्ष देऊन ऐकत असे विश्वनाथहि त्याच स्फूर्तीदायक स्वरानी जागा होई आजहि तो असाच प्रभातफेरीच्या गाण्यामुळें जागा झाला त्यानें खिडकीतून डोकावून बाहेर रस्त्यावर पाहिलें आपल्याचसारखी लहान लहान मुलें आज प्रभातफेरींत आहेत असें त्याला आढळून आलें. त्याच्या चिमुकल्या अंगावर शुभ्र खादीचे पोशाख होते आणि तोंडानें ते 'तिरंगा प्यारा' आळवीत होते. समोरच्या मुलाच्या हातांत त्याच्या गाण्याचा विषय मोठ्या डौलानें फडफडत होता

विश्वनाथला क्षणभर वाटलें आपणहि या प्रभातफेरींत सामील व्हावें. पण तें क्षणभरच त्यानें आपल्या काकाच्या भीतीनें तो विचार तसाच दाबून टाकला.

समोरच्या चौकात पोलिस हातात वेताच्या काठ्या घेऊन प्रभातफेरीचें स्वागत करायला तयार होते प्रभातफेरी त्याच्याजवळ येऊन पोहचली आणि त्यांनीं सपासप छड्या ओढायला सुरवात केली. निशाण घेऊन समोर चालणाऱ्या इवल्याशा मुलाच्या अंगावरच पहिला वळ उठला. विश्वनाथच्या दृष्टीला रक्ताची एक चिळकांडी उडालेली दिसली त्याच्या मागोमागच हलकीशी किंकाळी अंत - करणाला भेदून गेली विश्वनाथनें डोळे घट्ट मिटून घेतले

त्यानें डोळे उघडले तेव्हां चौकातील गर्दीचा मागमूसहि नव्हता. ठिक-ठिकाणीं रक्ताचे डाग पडलेले होते विश्वनाथ मोठा धीर करून घराबाहेर पडला आणि त्याच्या जवळ आला. हातात निशाण धरलेला मुलगा तिथेंच पडला होता त्याचा चेहरा रक्तानें भरलेला होता आणि आपला तिरंगा प्यारा त्यानें आपल्या चिमुकल्या हातात गच्च धरून ठेवला होता.

विश्वनाथचे डोळे अश्रूंनीं भरून आले आणि तो त्या मुलाजवळ गेला इतक्यात त्यानें डोळे उघडले आणि अशा कांहीं तिरस्काराच्या नजरेनें विश्व-नाथाकडे बघितलें कीं—

विश्वनाथ धडपडून जागा झाला. त्याच्या मनात विचार आला बहुतेक मुकर्जींचेंच म्हणणें बरोबर असावें. त्याचा चेहरा एकदम पडला

★

दिवसभर विश्वनाथचा चेहरा अगदी दुर्मुखलेलाच होता. संध्याकाळी तो गावांत फिरायला म्हणून गेला तेव्हा देखील त्याचा चेहरा फारस प्रसन्न नव्हता रात्रीच्या जागरणामुळें डोळे लालसर दिसत होते. ज्यावेळी जीं स्वप्नें पडूं नयेत त्यावेळीं तींच नेमकीं का पडतात याचा तो चालता चालता विचार करीत होता.

नकळत त्याचे पाय प्रायमरी शाळेच्या बाजूला वळले तेंच पटांगण आणि तींच मुलें. आणि तो झेंडाहि तसाच त्या वातावरणांत मोठ्या डौलानें फडकत होता.

विश्वनाथला आपल्या रात्रीच्या स्वप्नाची आठवण झाली

विजयी विश्व तिरंगा प्यारा—

१३ वर्षांपूर्वी हाच झेंडा फडकविल्याबद्दल त्याच्या गावातल्या कोंवळ्या बालकाना पोलिसानीं छड्यानीं फोडून काढलें होतें आणि आज तींच बालकें उजळ माथ्यानें त्याच झेंड्याचें गीत गात होतीं

तेरा वर्षे

आपल्यासाठी आपल्या राष्ट्रानें काय केलं त्याचं हें प्रतीकच नव्हतें का? विश्वनाथच्या डोळ्यापुढून त्या तेरा वर्षांचा इतिहास जाऊं लागला. आज मुंबईंत गोळीबार झाला, उद्या कानपुरात घोडे चालविले, परवा कलकत्त्यात लाठीमार झाला तुरुंग खचाखच भरून गेले गिरण्या बंद पडल्या

तोहि काळ लोटला आणि तुरुंगांतील फकीर लंडनच्या राजवाड्याच्या पायऱ्या चढूं लागला तुरुंगाच्या कोठड्यात बंद होते तेच मंत्रीपदावर जाऊन बसले. आणि पोलीस तिरंगी झेंड्याला सलाम करूं लागले

हा सगळा इतिहास घडत असताना आपण केवळ ड्याक्ू लॉर्ड वुईल्यम बेंटिंगच्या सुधारणा पोराना शिकविण्यातच गढून गेलों होतों असें विश्वनाथ आजपर्यंत समजत होता आपल्याला त्या इतिहासाचें सोयरसुतक नाही कीं आपल्यावर त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं असें त्याला वाटत होतें पण तो भ्रम होता हें त्याला आता कळून आलं

आज त्या झेंड्याकडे पहाताना त्याच्या फडफडण्यात गेल्या तेरा वर्षांची—नव्हे गेल्या अर्ध शतकाची तपश्चर्या साठविली आहे असें त्याला वाटलें.

तपश्चर्या ! एका सबंध राष्ट्राची अर्ध शतकाची तपश्चर्या !

तिरंगा प्यारा वातावरणात डौलानं फडकत होता

—इतक्यात विश्वनाथ अपल्या तंद्रींतून जागा झाला वर विमानाची घरघर ऐकूं येऊं लागली

एक–दोन तीन–तीन विमानें होतीं आपल्या वयांत वाकबगार असलेल्या विश्वनाथाला तीं शत्रूचीं आहेत हें ओळखायला फारसा वेळ लागला नाहीं

‘ ए मुलानों, पळा–पळा–घरात जा ’ तो आपल्या जागेवरून ओरडला परंतु मुलं पळण्याऐवजीं त्याच्याकडे पाहूं लागलीं

“ पळा–पळा–विमानं आलीं–पळा ” तो पुन्हां ओरडला. पण मुलें त्याचें न ऐकतां विमानांचीच गमत बघूं लागलीं

वरून बॉंब खालीं येत असल्याचा आवाज झाला. विश्वनाथनें जवळच्या एका खळग्यांत उडी मारली

धाड-धाड-धाड—

त्यानंतर लागोपाठ तीनचार मिनिटें बॉबचे आवाज होत होते विश्वनाथ जमिनीला घट्ट चिकटून पडला होता

विमानें निघून गेलीं आणि विश्वनाथ धुळीनें भरलेलें अंग झटकीत बाहेर आला वातावरणात धूळ पसरली होती डोळे चोळीत चोळीत तो मुलें खेळत होतीं त्या जागेकडे गेला

शाळा उध्वस्त झाली होती. पटांगणात खेळणारी मुलें जखमी होऊन विवळत पडली होतीं विश्वनाथ त्यांच्याजवळ गेला निशाणाची काठी मोडून पडली होती काठीचें निशाण एका मृत मुलाच्या अंगावर पडलें होतें आणि त्याचा चेहरा जखमानीं व रक्तानें माखून विद्रूप दिसत होता

विश्वनाथच्या डोळ्यासमोर १२ वर्षांपूर्वीचा प्रसंग उभा राहिला.

प्रभातफेरी-चौक-पोलीस.

-विजयी विश्व तिरंगा प्यारा

छड्यांचा सपासप आवाज--रक्तानें माखलेला चेहरा--त्यानें झेंडा हातात घट्ट धरून ठेवला होता

--तिरंगा प्यारा-वातावरणात फडकत होता.

तेरा वर्षें--तेरा वर्षांनंतर--तपश्चर्या ! सबंध राष्ट्राची अर्ध शतकाची तपश्चर्या-राष्ट्रद्रोही-परक्यासाठीं लढणारा--जपानी विमानें-रक्तानें माखलेला चेहरा-

तेरा वर्षांनंतर ! धुळीनें भरलेलें निशाण प्रेताच्या अंगावर पडलें होतें.

विजयी विश्व तिरंगा-विजयी विश्व तिरंगा—

सत्याच्या जाणीवेचे क्षण विद्युल्लतेप्रमाणें येऊन जातात.

विश्वनाथनें खालीं वांकून त्या मुलाच्या अंगावरचें निशाण उचललें, हळुवार हातानें त्यावरील धूळ झटकली आणि तें आपल्या लष्करी कोटाच्या खिशांत ठेवतां ठेवता तो हळूंच उद्गारला,

" तिरंगा प्यारा, मुकर्जी अगदीं गाढव आहे !"

---

# रफीक अहमद

रफीक अहमद रिझवीच्या प्रेताकडे मी अनिमिष नेत्रांनी पहात होतो मस्तकावरच्या प्राणघातक जखमेंतून वाहिलेलें रक्त वाळून चेहरा काळवडला होता एरवी सौम्य उदास दिसणाऱ्या त्या सुंदर चेहऱ्यावर विद्रूप, भेसूर कळा पसरली होती

रफीकच्या खुनाबद्दल दादा दंडिगेला पोलिसनें अटक केल्याचें वृत्त कोणीतरी माझ्या कानात ओतलें

माझ्या एका जिवलग मित्राचा वध दुसऱ्या प्रिय मित्रानें केला. माझ्य साऱ्या वृत्ति बधिर झाल्या. क्षणभर भोंवतालच्या जगाचा विसर पडला मला

प्रेताचा पंचनामा होईपर्यंत मी कसाबसा स्वतःला सावरून उभा होतों. तो आटोपतांच कसा तरी शरीर ढकलीत ढकलीत एकदाचा घरीं येऊन आदळलों

मस्तकात विकार–विचाराचें प्रचंड तुफान चालू होतें.

रफीक आणि दादा, दोघेहि माझे जिवलग मित्र होते दोघांवरहि माझें निरतिशय प्रेम होतें.

पण आज—— !

आदल्याच दिवशीं सकाळीं वामनरावाकडे चहाच्या घुटक्याबरोबर मी दादाला त्याच्या आडदांडपणाबद्दल आणि अभ्यासाच्या बेफिकिरीबद्दल उपदेशाचे डोस पाजीत होतों

आणि रात्रीं एका मजलशींत रफीकबरोबर संगीताचा आनंद अनुभवीत होतों

रफीक हाडाचा कलावंत होता नुसत्या संगीताच्या लकेरींनेंच तो बेभान होई असें नाहीं, तर कोणत्याहि कलेंतील सौंदर्याचा आस्वाद तो अतिशय मार्मिक बुद्धीनें आणि हळुवार अंतःकरणानें घेई परंतु संगीतावर त्याची अनन्यसाधारण भक्ति होती रफीक आणि त्याची सारंगी ह्या दोन अविभाज्य चिजा होत्या आपलें हें प्रिय आयुध सज्ज करून एकदा का रफीक आपल्या आवडीच्या उर्दू आणि पर्शियन कवींच्या कविता आपल्या किंचित् कापऱ्या आवाजात म्हणायला लागला, कीं ऐकणारा क्षणमात्र आपलें देहभान विसरून जाई त्याच्या ह्या कला-सक्तिमुळेच त्याचा माझा परिचय झाला मी काम केलेल्या एका नाटकात तो सारंगीची साथ करायला आला होता थत्तेबाईकालाहि लाजवील असें त्याच्या हौशी हाताचें कसब पाहून माझें कुतूहल जागृत झालें आणि मी मुद्दामहून त्याचा परिचय करून घेतला व त्याची वाढ आमुच्या दृढ मैत्रींत झाली

वाढत्या परिचयानं मला आढळून आलें, कीं तो परिस्थितीमुळें गांजलेला एक प्रामाणिक आणि निष्ठावंत जीव आहे त्याची कला हीच काय ती त्याच्या कष्टी जीवनात एक विरंगुळ्याची गोष्ट होती आणि त्याच्यामुळें तो कमालीचा छांदिष्ट आणि नादी बनला होता काहीं कारणामुळें त्याची वृत्ति अतिशय खिन्न झाली म्हणजे तो आपली सारंगीची गवसणी खांद्यावर टाकून राजाखेतावरून चिटणीसपुऱ्यापर्यंतची वाट तुडवीत माझ्याकडे येई आणि मला खिसकाटीत शुक्रवार तलावाच्या चौथऱ्यावर घेऊन जाई आणि मग सारंगीच्या नाजुक तारांवर गझलाचे करुणरसपूर्ण स्वर आळविता आळविता रात्र किती होऊन जाई ह्याचें भान उरत नसे

ह्या निराशावादी जीवाला जर परिस्थितीच्या सत्यस्वरूपाची जाणीव झाली तर त्यांच्यांतून एक निष्ठावंत कार्यकर्ता निर्माण होईल असें मला नेहमी वाटे. आणि घडूनहि आलें तसेंच. माझ्या सहवासामुळें त्याला राजकीय वाङ्मय वाचण्याचा नाद लागला आणि शेवटीं शेवटीं तर त्याचीं मतें माझ्याहिपेक्षा जहाल बनलीं. हिंदुस्थानच्या आजच्या आणीबाणीच्या प्रसंगीं जर कॉंग्रेसनें संरक्षक-दलें निर्माण केलीं तर त्याला जाऊन मिळण्याचा आपला विचार नुकताच त्यानें मला बोलून दाखविला होता

पण ह्या साऱ्या गोष्टी मनातल्या मनोऱ्याप्रमाणें बोलल्या जागीच राहून गेल्या होत्या

त्याच्या उलट होता दादा दडिगेचा स्वभाव डोक्याचा मठ्ठ आणि विचार-शक्तीला अजिबात फाटा दिलेला हा प्राणी केवळ त्याच्या आडदांड निष्पाप सरलतेमुळेंच मला प्रिय होता कोणतीहि राजकीय विचारप्रणाली समजायची कवडीची अक्कल त्याच्यात नव्हती परंतु एकदा त्याच्या माथेफिरू डोक्यात शिरलेलें वेड काढून टाकणेंहि तितकच कठिण होतें

दुर्दैवाच्या कसल्या करामतीन कोण जाणे पण नागपुरच्या एका सभेतील भाषण ऐकायला मी त्याला आपल्याबरोबर घेऊन गेलों निरनिराळ्या वक्त्याचा तो नाटकी आवेश आणि कांहीं भावनाप्रधान तरुणाचे तें रक्तलेखाचें दृदय पाहून दादाचे माथें फिरलें आणि दुसऱ्या दिवसापासून तो हिंदुधर्म आणि संस्कृतीचा एकनिष्ठ सेवक बनला

आणि त्याचा परिणाम, रफीक मृत्यूशय्येवर आणि दादा बंदिशय्येवर विराजमान होण्यात झाला

अंत करणातल्या तगमगीनं माझ्या डोळ्यातील झोंप अजीबात नाहींशी झाली होती

दोष कुणाचा ? रफीकनें दादाचा काय अपराध केला होता ? हिंदुस्था-नच्या एका कोपऱ्यांत कुठेसा दंगा झाला होता दंग्याचें स्वरूप खरोखरच जातीय होतें किंवा काय ह्याबद्दल सर्वांनाच जबरदस्त शंका होती तरी देखील नागपुरच्या उत्साही हिंदु पुढाऱ्यानी ताबडतोब टाऊन हॉलच्या पटांगणात जमून मुसलमानाचा जोरदार शब्दांत निषेध करून टाकला आणि तिथल्या हिंदूच्या मृत्यूचा सूड नागपुरात घेण्याचा आदेश हिंदु जनतेला देत हे तुंदिलतनू पुढारी आपल्या घराची वाट चालते झाले.

दुसऱ्याच दिवशीं गाजाखेतावर हिंदु मुसलमानांची छोटीशी लढाई झाली आणि निरपराध रफीकचा त्यांत बळी पडला.

नागपूरच्या हिंदूनीं सूड घेतला

“ नागपूरच्या हिंदूनीं सूड घेतला ” रफीकचें विद्रूप प्रेत तेच शब्द उच्चारीत माझ्याकडे पहात उपरोधानें हंसतें आहेसें भासलें

मनाच्या अस्वस्थतेंत अंथरुणावरून उठून मी मागच्या गॅलरीत येऊन उभा राहिलों.

घरामागच्या छोट्याशा मैदानात उकीरड्याशेजारच्या म्युनिसिपालिटीच्या कंदिलाला एक महादेवाचें देऊळ सोबत करीत होतें शेजारींच दोन संडास होते. दिव्याखालीं एक खरजुटले कुलगी कुत्रें गुरगुर आवाज काढून जणूं साऱ्या जगाविरुद्ध तक्रार करीत होतें निवडुंगानीं झाकलेल्या नाल्यापलीकडील पडका तुळशीबाग आणि त्या पलीकडे रेशीमबागचें अफाट मैदान मधूनच कुठून तरी येणारी कोल्ह्याची कट्ट आरोळी त्या भयाण स्तब्धतेचा भंग करी आणि पुन्हा नि स्तब्धता पसरे

जणू अथांग जलाशयांत लहानशा माशानें मारलेली सुळकीच.

नाल्यांत वाढलेल्या निवडुंगाकडे मी किती तरी वेळ विषण्ण नजरेनें पहात होतों.

इतक्यात दुरून कुठूनसें एक कुत्रें भुंकलें दिव्याखालच्या कुत्र्यानें तितक्याच तडफेनें त्याला जबाब दिला पोलीसची शिटी नाहीं रात्रीं एकामागून दुसरी वाजत ?—तसेंच

मला एकाएकीं टाईम्समधल्या वाग्युद्धाची आठवण झाली. एकानें पाकिस्तानसाठी यादवी माजविण्याची धमकी दिली होती दुसऱ्यानें लागलीच त्याला प्रत्युतर दिलें, “आमचे हात कांहीं केळीं खाण्यात गुंतले नाहींत ”

रस्त्यावरचें कुत्रे भुंकताच दिव्याखालचें भुंकलें

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. २८९१८ नों. दि. ........
वि. ......

# रामशरण भय्या

बराकीच्या छताला लटकणाऱ्या दिव्याकडे पाहात मी पडलों होतों दिव्याच्या काचावर काजळी चढल्यामुळें प्रकाश अगदी अंधुक पडला होता उंच आणि लांबच लांब पसरलेल्या दगडी भिंती त्या अंधुक प्रकाशात काळसर दिसत होत्या मच्छरदाणीच्या चौकटीच्या सावल्या भिंतीवर पडल्या होत्या आणि बाहेरून घोंगावत आत शिरणाऱ्या वाऱ्यात त्यांचें वेडेवाकडें नर्तन चालू होतें बराकींत सर्वत्र शांतताच होती फक्त एका कोंपऱ्यात सेवाग्रामच्या आश्रमातले कांहीं कैदी भगवद्गीतेच्या एका श्लोकावर चर्चा करीत होते, त्यांचा आवाज मधूनमधून ऐकूं येई बाहेर मजबूत कुलपानें बंद केलेल्या दाराजवळ पहारेकरी पहारा देत होता त्याच्या बुटाची खाडखाड ऐकूं येई तुरुंगाच्या मागच्या बाजूला असलेल्या रेल्वेलाईनवरून एखादी गाडी खाडखाड करीत जाई, किंवा कुठून तरी कोल्ह्यांचें विवळणें ऐकूं येई कृष्णपक्षाच्या अंधाऱ्या रात्रीच्या भेसूरतेंत त्या ओरडण्यानें अधिकच भर पडे.

मी या तुरुंगात बंद होऊन पडलों होतों भोंवतालीं पसरलेल्या अक्राळ-विक्राळ अफाट भिंतींच्या पलीकडे माझी नजर जात नव्हती त्याच्या पलीकडे अफाट जग पसरलें होतें आणि तिथें काय चाललें होतें ते मला कळत नव्हतें

—खिडक्यांतून दृग्गोचर होणाऱ्या आकाशावर उदासीनतेची काळी छाया पसरली होती.

मी कड बदलला माझ्या बाजूलाच एक उत्तर हिंदुस्थानी भय्या स्वस्थपणें झोंपेची वाट पाहात पसरला होता तुरुंगात आणि आपल्या घरात काहीं फरक आहे असें त्याला लवमात्र वाटत नसावें मी त्याला पडल्या पडल्याच विचारलें, " क्यौ भय्या, कहांके रहनेवाले हो ? "

" यहींका ! पानका ठेला है अपना महेलपर "

" फिर यहा कैसे आना हुआ ? "

" ऐसाहि सौराज मिलना है ना ' "

" तो तुम सौराज मिलाने गये थे, इस लिये यहा आगये हो ! " असें म्हणून मी स्वत:शींच हंसलों किंचित् दुखावलेल्या स्वरात त्यानें मला विचारलें, " क्यौं बाबू , हसते क्यौं हो ? "

" कुछ नही–कुछ नही– " असें म्हणून मी तोंड वळविलें

आज संध्याकाळीं जेलरनें जेव्हां त्याला बराकींत आणून सोडलें तेव्हा तो उत्साहानें नुसता फुलला होता. अर्थातच माझ्या निर्दय हंसण्यानें त्याच्या भावना दुखावल्या तर नवल नाहीं. तो आला तेव्हां बराकींत एकच गडबड उडून गेली चार दिवसापासून आम्ही या चार भिंतींआड बद होतों बाहेरच्या जगात काय चाललें आहे याचा आम्हाला मुळींच पत्ता लागत नव्हता बाहेरच्या बातमीबद्दलची आमची उत्सुकता सदैव ताणलेली असायची अशा वेळी बाहेरून कुणी नवा कैदी आला कीं आम्ही बातमी-साठी त्याच्यावर अगदीं तुटून पडत असूं तो आला तेव्हाहि असेंच झालें प्रत्येकजण त्याच्यावर प्रश्नाचा भडिमार करीत होता बाहेर काय चाललें आहे ? चळवळीचा जोर कितपत आहे ? तोहि तितक्याच उत्साहानें सांगू लागला पर-वाच्या दिवशीं रामटेकचें स्टेशन लोकानीं जाळून टाकलें. दोन दिवसपर्यंत राम-टेकची वाहतुक बद होती सावनेरात कचेऱ्याला आगी लावण्यात आल्या नागपुरात एकहि पोलीसचौकी शिल्लक नाही इतवारीत गोळीबार झाला--- आणखी किती तरी गोष्टी तो सारखा आवेशानें सागत होता त्यावेळची त्याची मुद्रा मला याचेळीं आठवली आणि एक प्रकारच्या अभिमानमिश्रित करुणेनें माझें मन भरून आलें एक गरीब पानवाला–राजकारणाशीं त्याचा कधींच सबंध नाही बिऱ्हाडासमोर चारचौघे जातवाले जमवून तुलसीरामायणातील दोहे आणि चौपाया

म्हणणें हाच त्याचा फावल्या वेळेचा उद्योग पण त्याच्याहि अगांत आज आवेश संचारला होता त्याच्याहिपर्यंत देशभक्तीची लाट येऊन पोंहचली होती

सकाळीं बराकीचा दरवाजा उघडला थंडी असल्यामुळें मी बाहेर येऊन उन्ह खात बसलों होतों रामशरण भय्याजवळ चंची असल्यामुळें मी त्याला हांक मारली त्यानेंहि मोठ्या उदारपणानें ती माझ्यापुढं केली पान तोंडात कोंबून तंबाखू हातावर चोळीत मी त्याला म्हटलें, "तो तुम सौराज लाने गये थे भय्या ?"

"क्यों बाबू, गरीबकी मजाक करते हो ? तुमच्यासारखं मला लिहितां-वाचतां येत नाहीं म्हणून ? आखिर तुम्ही तरी तेंच केलंत"

"नाहीं बाबा, नाहीं मी काहीं स्वराज्य आणायला गेलों नव्हतों"

"मग तुम्ही इथं कसे ?"

"कसे ? तें मला काय माहीत ? पोलीसन आणलं, मी आलों. बर भय्या, स्वराज्य मिळविण्यासाठीं तूं काय काय केलंस ?"

"वैसा तो मैने खुद कुछ नही किया पण जिल्ह्यावर निघालेल्या जुलुसात सामील होऊन मी 'इन्किलाब जिंदाबाद' म्हणून ओरडत होतों त्यामुळे त्यानीं मला पकडलं"

"अच्छा, भय्या, ही जाळपोळ केल्यानं स्वराज्य मिळेल असं तुला कुणी सांगितलं ?"

"कुणी म्हणजे ! कॉंग्रेसनं--गांधीजींनीं !"

"मला तर नाहीं माहीत गांधीजींनीं केव्हा सांगितलं तें"

"पण लोक तर तसंच म्हणत होते"

"कोण लोक ?"

"कोण लोक ? तें नाहीं मला माहीत" तो गोंधळलेल्या नजरेनें माझ्या-कडे पाहूं लागला "क्या बाबूजी, आपका इसपर बिश्वास नही ? क्या ऐसेसे सौराज नही मिलेगा ?"

मी काहींच उत्तर न देता हसलों

"नही-नही बाबूजी, ऐसा नही हो सकता जब इतना बडा हमला हो रहा है, जब हर जगह लोक उठकर खडे हो रहे है, तो सौराज कैसा नही मिलेगा ?"

त्याच्या या दुर्दमनीय आशावादाचें मला कौतुक वाटलें. 'ठीक-ठीक' असें म्हणून मी तो विषय बंद केला

—आणि त्यानंतर रामशरण भय्याचा सौराज मिळणार या गोष्टीवरचा विश्वास आठवडाभर सारखा वाढतच गेला रोज कुणी ना कुणी नवीन कैदी येई आणि बाहेर चालू असलेल्या मोडतोडीच्या बातम्या देई आणि त्या ऐकून आतील कैद्यांचा उत्साह अधिकच वाढे गरीब बिचारे ' हा स्वातंत्र्याचा लढा आहे असा कुणी तरी त्यांना समज करून दिला होता तुरुंगात जीं शहाणीं माणसें होतीं,—विशेषत वर्ध्याच्या आश्रमांतील माणसं—तीं त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत कीं ही कॉंग्रेसची आणि गांधीजींची चळवळ असणें शक्य नाहीं पण त्यांच्यावर कुणाचा विश्वास बसेना चळवळ सुरू होण्यापूर्वींच त्यांना इथें आणून ठेवलें होतें त्यावेळी गांधीजी मुंबईला होते. आणि त्यांनी काय सांगितलें हें कुणालाच माहित नव्हतें शिवाय आमच्याच बराकींत वर्ध्याचीं काहीं तरुण मुलें होतीं तीं त्यांची ' हे आता म्हातारे झाले ' म्हणून हेटाळणी करीत रामशरण भय्यासारख्या इतर कैद्यांवर याचाच विशेष परिणाम होई ही कॉंग्रेसनें सुरू केलेली चळवळ असून यानेंच स्वराज्य मिळेल अशी त्यांची समजूत होती शिवाय रोज बाहेरून येणाऱ्या बातम्या त्यांची ही समजूत अधिकच बळकट करीत

परंतु काहीं दिवसांनीं आंत येणाऱ्या या उत्साहवर्धक बातम्या कमी होऊं लागल्या मधूनच कुठे एखादी जाळपोळीची बातमी येई, पण तीहि क्वचितच त्याऐवजीं शहरातील कडक लष्करी बंदोबस्ताच्या, पोलिसांच्या क्रूर दमनाच्या, दंडाच्या, शिक्षेच्या, अशा बातम्या मात्र भरपूर येत हळू हळू बराकींत नवीन कैदी येणें बंद झालें चळवळ थंडावली हें आतील प्रत्येकाला पूर्णपणें कळून चुकलें

पण या सर्व काळांत माझी आणि रामशरण भय्याची मात्र चांगलीच दोस्ती जमली सुरवातीला पकडलेल्या आम्हा सर्व लोकांना ' बी ' क्लासांतच आणून टाकल्यामुळें आम्हाला बाहेरून तंबाखू मागवणें शक्य होतें रामशरण आणि मी यांच्यांतील या समानव्यसनीपणामुळें आमचें जुळायला फारसा वेळ लागला नाहीं रामशरण भय्याचा आवाज त्याच्या शरीराप्रमाणेंच दांडगा असला तरी कर्कश नव्हता तो रामायणातील दोहे, चौपाया वगैरे फारच चांगल्या रीतीनें म्हणत असे पुष्कळदा दुपारच्या वेळीं बराकीच्या आवारातील एका कोपऱ्यात असलेल्या लिंबाच्या झाडाखालीं आम्ही बसत असूं आणि त्यावेळी

रामशरण तुलसीच्या रामचरितमानसातील दोहे किंवा आपल्या जन्मग्रामात प्रचलित असलेलीं लोकगीतें म्हणून दाखवावयाचा रामशरणचें आपल्या प्राता-वर फार प्रेम तो त्याला देश म्हणायचा 'बाबूजी, हमारे देस जैसा बढिया देस इस दुनियामें नहीं मिलेगा, असें त्यानें मला किती तरी वेळ बजावून सांगितलें होतें आपलं छोटेंसं गाव, त्यातील छोटेसें घर, गोठ्यातील 'गौवें', गावाभोवतीचें घनदाट जंगल, 'हिमाचलके समान पहाडी', इत्यादींचे तो मोठें रसभरीत वर्णन करीत असे एकदां मी त्याला विचारलं, 'रामशरण भय्या, इतकं जर तुझं तुझ्या देशावर प्रेम होत, तर देश सोडलास तरी कशाला ?"

"काय करावं बाबूजी, पोटासाठीं सगळं काहीं करावं लागतं"

"मग आता कां पोटाचा धंदा सोडून इथं आलास ?"

"पोट तर इथं सुद्धा भरत आहे" त्यानं हंसून उत्तर दिलं, "वहांरसे भी अच्छा ' "

'अस्स ! बाहेरच्यापेक्षा इथं खायला चांगलं मिळत म्हणून तुरुंगात आलास वाटतं ?" माझ्या आवाजातली तीव्रता त्याला जाणवलेली दिसली तो एकदम म्हणाला,

"नहीं–नहीं बाबूजी, वो तो एक मजाककी बात थी. यहां आया हूं देसके वास्ते"

"क्या अजिब आदमी हो तुम भय्या ! पेटके लिये देस छोडा और देसके लिये पेट छोडा"

यावर भय्या मन पूर्वक हंसला आणि म्हणाला, "यह तो मुझे कुछ नहीं समझता बाबू मैं हूं अनपढ गवाँर"

मी सुद्धा तो विषय तेवढाच सोडून त्याला विचारलं,

"बरं भय्या, तुझी देशाची आजादी कुठपर्यंत आली ?"

"देखो बाबूजी, असली थट्टा मला नाहीं पसंत" तो चिडून म्हणाला "आजादी काय उगाच मिळते ? जंग चालू आहे शेवटी स्वराज्य मिळेलच"

परंतु आतां त्याच्या स्वरात पूर्वीचा जोर आणि आत्मविश्वास उरलेला नव्हता ओढून ताणून आणलेलें चंद्रबळ होतें तें मी त्याची अवस्था ओळखली हें त्याच्याहि लक्षात आलेलें असावें तो किंचित् लज्जित अंतःकरणानें तिथून उठून गेला

रामशरण ज्या दिवशी तुरुंगात आला तो दिवस मला आठवला तो आनंद, तो उत्साह, ती श्रद्धा, तो आत्मविश्वास ! आज त्याचें टरफल तेवढ उरलें होतें आणि त्याला तो चिकटून राहू पाहात होता आशाभंगाचा कठोर आघात टाळण्यासाठी त्या टरफलाआड दडण्याचा दुबळा प्रयत्न तो करीत होता पण कोंड्यावर का कुठें फार दिवस जीव जगविता येतो ? परिस्थितीच्या झपाट्यानं तें फुसकट धीरे धीरे उडून जायला लागलें चळवळ थंडावली, आपण सपशेल पराभूत झालों हें इतके दिवस मनांतल्या मनात वाटत होतें, तें आता हळू हळू ओटाबाहेर पडू लागलें त्यातहि जे धीराचे होते ते, 'पराभव झाला तर काय झाल ? पुन्हा प्रयत्न करू' असें म्हणून स्वत ला धीर देत होते परतु रामशरणसारख्या साध्या माणसाला तें कसें साधणार ? तो एक दिवस माझ्याजवळ येऊन मुकाट बसून राहिला बोलावें कीं न बोलावें असें त्याच्या मनात द्वद्व चालू होतें शेवटीं मोठा हिय्या करून तो हळूच मला म्हणाला,

" बाबूजी, एका प्रश्नाच उत्तर द्याल ? मी अडाणी आहे म्हणून विचारतों सच सच बताना "

" काय ? ' मी त्याला विचारलें

" क्या सचमुच आजादीके जगमे हमारी हार हो गई ? क्या सौराज अब नही मिलेगा ? "

मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलें आशाभंगाच्या वेदना त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या मी त्याला म्हटले, " रामशरण भय्या, आजपर्यंत तर तू म्हणत होतास कीं हार कधींच होणार नाहीं म्हणून आजच तुझा धीर का बरं सुटावा ? "

" त्या गोष्टी जाऊं द्या " तो अगदी काकुळतीला येऊन म्हणाला " त्या अडाणी गावढळांच्या गोष्टी होत्या तुम्ही शिकलेले आहात खरं सागा आमची हार झाली ? "

तो ज्या काकुळतीनें विचारीत होता, ती पाहून माझ्या मनांत एकदम विचार आला, 'खरच या चळवळींत आमचा पराभव झाला ? रामशरणसारखा कधी राजकारणाचा वारा न लागलेला मनुष्य एकाएकी चळवळीत येतो, देशाच्या स्वातन्त्र्यासाठी तुरुगात जातो, आणि—आणि सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे स्वराज्य मिळणार नाहीं या कल्पनेनें इतका व्याकुळ होतो मग आमची सर्वस्वी हार

झाली असें कसं म्हणावं ? रामशरणसारखे असंख्य लोक हिंदुस्थानात असताना हिंदुस्थान अयशस्वी होईल कसा ?"

"रामशरण भय्या, एवढं वाईट वाटून घ्यायचं काहीं कारण नाहीं या चळवळीत तुझी मुळींच हार झाली नाहीं " मी त्याला सांगितलें

"पण बाकीचे सारे लोक तर हार झाली असच म्हणतात "

"रामशरण, तू आलास त्या दिवशी मी काय म्हणालो होतो तें तुला आठवत ? त्यावेळी मी म्हटलं होत कीं ही स्वातंत्र्याची लढाई नाहीं ही कॉंग्रेसची चळवळ नाहीं. जिथ लढाई नाहीं तिथ हार कसली होणार ? अरे, स्वातंत्र्याची लढाई अजून सुरू व्हायची आहे आणि त्या लढाईत सौराज मिळल्याशिवाय मुळींच रहाणार नाहीं "

रामशरण मुकाट्यानं ऐकत राहिला त्याचें समाधान झालं कीं नाहीं तें मला माहित नाहीं, परंतु त्यानंतर तो जास्त जास्त उदास दिसूं लागला अजून तो स्वत तंबाखू खाई आणि चची माझ्यापुढें करी, पण लिंबाच्या झाडाखालील आमच्या मैफली दिवसेंदिवस कमी होऊं लागल्या. कधीं कचित्‌काळीं घडल्याच तर त्याला पूर्वीचा रंग भरत नसे. पूर्वीसारखा तो आता गप्पा सुद्धां मारीना

एक दिवस संध्याकाळीं मी त्याच्याकडे चची मागितली तंबाखू तोंडात टाकून मी म्हणालों, "कैसे क्या भय्या, मिजाज कैसी है ?"

त्यावर एक भला मोठा उसासा टाकून तो म्हणाला, "अरे बाबू, क्या कहे ? बडी आफतमे आके फसे है अब क्या उसका !"

"क्यों, पस्ता रहे हो, रामशरण ?"

"अरे, पस्ताये नही तो क्या करे बाबू ?"

"याचा तर अगोदरच विचार करायला पाहिजे होता चळवळ म्हणजे सोपी गोष्ट नाहीं भय्या ! जेल म्हणजे चळवळीच्या मार्गावरील नेहमीचा टप्पा आहे जेलला डरून जग कशी होईल ?"

"जेलला डरत कोण नाहीं बाबू ? जेल म्हणजे मोठी आनंदाची गोष्ट थोडीच आहे ? परंतु देशाला स्वातंत्र्य मिळेल म्हणून तेंहि सहन करायची माझी तयारी होती पण आता पाहतों तो स्वराज्यहि नाहीं आणि मी मात्र इथें जेलात अडकलों आहे "

रामशरणची मला कीव आली. मी उद्गारलो, "खरं आहे भय्या या चळवळीत आमची हार झाली कीं जीत, हा प्रश्न मला फारसा त्राम देत नाही.

पण तुझ्यासारखीं हजारों प्रामाणिक माणसं–ज्याची आज देशाला अत्यंत निकडीची जरूर आहे–या तुरुंगात अडकून पडलीं आहेत याचंच मला वाईट वाटतं आमच्या चळवळीचं हेंच मोठं नुकसान झालं."

"अरे, हमारी बात छोड़ो क्या बाबू हम तो गरीब आदमी है मी इथ अडकून पडल्यानं राष्ट्राचं असं काय नुकसान होणार आहे ?"

"गरीब झालास म्हणून काय झालं ? प्रत्येक माणसाची आज देशाला जरूर आहे शेवटीं एक एक माणूस मिळूनच ना देश होतो ? आता हेंच बघ आपण इथं चार भिंतींच्या आड ऐकतो कीं तिकडे बाहेर दुष्काळ माजला आहे लाखों लोक मरत आहेत. इथं सरकार त्याचा आपल्याला पत्ता लागूं देत नसलं तरी आपल्यापासून काहीं तें लपून राहिलं नाहीं. आता या लाखों माणसांना वाचविणं काय एकट्या दुकट्याचं काम आहे ? त्यासाठी प्रत्येक माणसानं प्रयत्न केला पाहिजे तेव्हांच तें शक्य होईल. अशा वेळी आपण इथं अडकून पडलों हें नुकसान नव्हे का ?"

"हां ! तें खरं आहे, पण आपण सुटून तरी काय करणार ? आता या चळवळीचंच नाहीं ? इतकी धडपड केली, इतके लोक मेले, इतके तुरुंगांत गेले, पण काय फायदा झाला त्याचा ?

'क्यों भय्या, हिंमत हार गये हो ?" मी थट्टेच्या स्वरात विचारलें "अच्छा, मला हें तर सांग भय्या, कीं जाळपोळ करून अणि मोडतोड करून स्वराज्य मिळेल असं तुला कुणी सांगितलं होतं ?

'वो तो मुझे मालुम नही"

"देखा ! मोडतोड करायला कुणी सांगितलं तें सुद्धा तुला माहित नाहीं कुणी तरी रस्त्यावर एक माणूस ओरडला आणि तूं बत्त्या फोडायला निघालास तुझ्यासारखे असे माणखी किती तरी असतील—शेंकडों, हजारो ! आणि त्याचा परिणाम काय झाला ? तुझ्यासारखे लोक हिंमत हारून बसले म्हणे आपण काय करणार ? अरे, तुझी बायको सुद्धां असं म्हणत नसेल !"

माझें बोलणें ऐकून तो एकदम हंसला आणि म्हणाला, 'हां बाबू, ठीक कहते हो. जरूर मैं हिंमतपस्तीकी बातें कर रहा था पण त्याला माझा इलाज नाहीं म्हणून मधून तसं वाटल्याशिवाय राहात नाहीं पण एक सांगतो बाबूजी, काम दिसलं तर कसलीहि का कुरकुर न करतां मी तें करायला तयार होईन मनात असलं तरी काय होईल आणि काय नाहीं असले प्रश्न विचारीत बसणार नाहीं."

"मनुष्याकडून हीच उम्मीद असते, रामशरण" असें म्हणून मी रामशरणची चर्चा आपल्याकडे ओढली त्यानें माझ्याकडे निरखून पाहिलें आणि एकदम हसला कित्येक दिवसात प्रथमच रामशरण इतक्या मोकळेपणानें हसला होता माझ्या बोलण्यामुळें त्याची उदासीन झालेली वृत्ती कांहींशी तरी उत्तेजित झालेली असावी त्याच्या अंतःकरणाची पकड घेत असलेल्या निराशेशीं झगडा करायला त्याला थोडीशी तरी शक्ति आली असावी निदान तशी त्याची कल्पना तरी झाली असावी कारण त्याच्या या हसण्यात एक प्रकारची कृतज्ञतेची छटा मला भासली

दिवसांमागून दिवस जात होते घड्याळाप्रमाणें चालणारें चार भिंतीआडचें कंटाळवाणें आयुष्य जीव कसा अगदी उबून गेला होता रोज रोज तोच कार्यक्रम, तींच क्षुल्लक भांडणें, वेळ जाण्यासाठीं उकरून काढलेले तेच नीरस वादविवाद काहीं दिवसांपूर्वी मला एक मोठे कादंबरीकार भेटले होते ते म्हणाले कीं जगात कंटाळवाणें काहींच नाहीं अगदी साधी क्षुल्लक गोष्ट सुद्धां अत्यंत मनोवेधक असू शकते आता तुरुंगाबाहेर आल्यावर मलासुद्धां त्याच्या या विधानांत बरेंच तथ्य वाटतें त्या बंदीवासाच्या कालांत मी किती तरी नवीन गोष्टी शिकलों, मनुष्यस्वभावाच्या किती तरी विलक्षण अशा छटा पाहिल्या परंतु तुरुंगात असताना या गोष्टी मनाला पटत नाहींत तुरुंग ही जगातली अत्यंत कंटाळवाणी जागा आहे असें वाटतें विशेषत बाहेर एवढ्या घडामोडी चालू असताना, सारें जग एका मोठ्या भयानक इतिहासखंडांतून जात असताना, आपण चार भिंतींच्या आत स्वस्थ पडून राहावें याचें मनाला काय वाटत असेल याची कल्पनाच केलेली बरी यावेळीं आपण बाहेर असायला पाहिजे, त्या घडामोडींच्या जागीं आपण असायला पाहिजे, अशा वेळी स्वस्थ न बसता काही तरी करायला पाहिजे, अशी सारखी मनाची तडफड चालू होती

रामशरण भय्याच्या जीवाचीहि अशीच तगमग होत असावी. पूर्वीची त्याची वृत्ती आतां दिसेना 'बडी आफतमे फस गये है बाबू' असले उद्गार आता त्याच्या तोंडून ऐकूं येत नसत पण आजकाल तो मला वारंवार विचारूं लागला, "क्यों बाबू, हम कब छुटेंगे?" कधीं कधी तो अगदीं हातघाईवर आल्यासारखा होई आणि म्हणे, "हम कभी इसमेसे छुटेंगे बाबू?"

मी त्याला थट्टेनें विचारलें, "क्यों भय्या, इतनेमेंहि तंग हो गये? कीं घरची आठवण होत आहे?"

" आपणाला जशी काहीं कधी होतच नाहीं ! " त्यानें उत्तर दिलें

" पण मी तर कधीं असं बोललों नाहीं "

" नहीं बाबूजी, घरची याद येण्याचा मोठा सवाल नाहीं. घरची याद सर्वांनाच येते पण मला कांही ती नवी गोष्ट नाही. तुरुंगाबाहेरहि हेच हाल होते पोटासाठी घर सोडून किती तरी वर्षं झालीत आता मला त्याच मोठंस वाटत नाहीं. पण इथं माशा मारीत बसायचा कंटाळा आला आहे मला बाहेर जाऊन कांही तरी काम करावस वाटतं इथ पडून का देशाच भल होणार आहे ?

" अस्स ! तर सुटल्यावर पुन्हा दुकानावर बसणार नाहीं म्हणतोस ? "

" नाहीं कसा बसणार ? पोटासाठीं काहीं तरी धंदा हा लागणारच. पण तेवढ्यान आतां समाधान लाभायच नाहीं माझ्या आयुष्यात हा प्रसग आला नसता तर मी असाच पानाच्या दुकानावर बसून राहिलो असतों. पण आता या लोंढ्यांत सापडलों आहें नुसता पोट भरण्याचा धदा करून जगण्यात आता नाहीं राम वाटणार "

" ठीक आहे फार चांगला आहे निश्चय "

" निश्चय चागला आहे पण तो अमलात येणार कसा ? आम्ही इथे असे जखडून पडलेले " पुन्हा त्याच्या चेहऱ्यावर चिडखोरपणाची छटा दिसूं लागली

" अस चिडून काय होणार भय्या ? " मी म्हणालों, " जेव्हा सुटायच तेव्हाच सुटका होईल अस हातपाय आदळून काय होणार ? एकंदरींत तुम्हां लोकाची जातच मोठी उतावळी दिसते "

" अच्छा ! जसे काहीं तुम्ही अगदीं महात्म्यासारखे थडच आहात " त्यानेंहि टोमणा मारला

आणि खरोखरच माझीहि अशीच अवस्था झाली होती रामशरणपेक्षा मी जास्त तडफडत होतों. माझ्या मनाची ही तडफड कुणाला दिसू नये म्हणून मी खूप प्रयत्न करीत असें, पण रामशरणच्या काकदृष्टींतून काहीं ती सुटूं शकली नाहीं पण खरोखरच का रामशरण काकदृष्टी होता ? कीं त्याच्या माझ्यामध्यें निर्माण झालेल्या अकृत्रिम स्नेहामुळें त्यानें ही गोष्ट ताडली ? तुरुंगात किती तरी राजकीय कैदी होते कित्येकांचीं आयुष्यें सार्वजनिक कार्यांत गेलीं होतीं मनुष्यस्वभावाची त्याना पारख होती. पण त्यांना माझी मन स्थिति कधीहि कळून आली नाही

रामशरण हा एक भोळाभाबडा अडाणी भय्या होता, पण त्याला मात्र माझी नाडी अचूक समजली.

दिवसेंदिवस माझ्या मनाची ही तडफड वाढत होती तुरुंगातील यान्त्रिक जीवन या अवस्थेंत भर घालीत होतें एक दिवस मी माझ्या नेहमीच्या जागेवर लिंबाच्या झाडाखालीं बसलों होतों आकाश अगदी निरभ्र होतें. फिक्कट निळसर रंगाचें अफाट छत कुणी तरी तुरुगाच्या इमारतीवर पसरलें आहे असें वाटत होतें बाहेरच्या आवाजाला आत येण्याची बंदी होती मी शून्य दृष्टीनें आकाशाकडे पाहात होतों बाहेर काय चाललें असेल ? माझे सहकारी काय करीत असतील या वेळीं ? माझी छोटी बहीण शाळेंत गेली असेल का आता ? आज दिवस कोणता बरं ? छे,–तुरुगात दिवस लक्षात राहायलाहि कांहीं साधन नाहीं तुरुगातील काळाला मुळीं मापच नाहीं

माझ्या मनात अशा तऱ्हेचे विचार चालू असतानाच रामशरण माझ्याजवळ येऊन बसला. चंचींतून तंबाखू काढून हातावर चोळता चोळता तो म्हणाला, " क्या सोच रहे हो बाबू ? "

त्याच्या हातातील तंबाखू घेऊन तोंडात टाकीत मी उत्तर दिलें, " कांहीं नाहीं. असाच बसलो होतो "

काळजीपूर्ण मुद्रेनें माझ्याकडे पाहात तो म्हणाला, " बाबूजी, तुम बहोत सोचते हो अशानं तुम्ही दिमाख खराब करून घ्याल "

मी हंसून त्याला म्हणालों, " तूं असल्यावर कुठ माझा दिमाख खराब होणार आहे ? तुला पाहताच तो मिनिटात सरळ येईल "

" वा बाबू–" असें म्हणून रामशरण खूप मोठ्यानें हसला.

बोलता बोलतां रामशरणनें मला विचारलें, " क्यों बाबू, ही जर आजादीची जग नव्हती तर सरकारनं आम्हांला जेलांत कां कोंडलं ? "

त्याच्या प्रश्नाचें उत्तर न देता मी त्यालाच प्रश्न केला, " भय्या, मला एक गोष्ट साग तूं मोकळा असतास तर स्वराज्याच्या लढाईत भाग घेतल्याशिवाय राहिला असतास ? "

" कधींहि नाहीं " त्यानें जोरानें उत्तर दिलें

" झालं तर मग एवढं कारण पुरेसं आहे कीं तुला कोंडून ठेवायला ! "

क्षणभर तो माझ्या चेहऱ्याकडे पाहातच राहिला पण नंतर माझ्या म्हणण्याचा अर्थ त्याच्या लक्षात आला आणि किंचित् मान हलवीत तो म्हणाला, "ठीक आहे आहे बाबू तुमच म्हणणं सरकारभी साला बहोत दूरकी सोचता है !" त्याचे उद्गार ऐकून मला हसू आलें.

" अच्छा बाबू, मग आता काय आपण इथून कधींच सुटू शकणार नाहीं ? " त्यानें विचारलें

" का सुटू शकणार नाही ? रामशरण, हे तुरुगाचे दरवाजे लोखडाचे बनले आहेत आपण जग जंग पछाडले तरी त्याचा एक गजसुद्धा वाकू शकणार नाहीं. या तुरुगाच्या भिंती भक्कम दगडाच्या बांधल्या आहेत.. आपल्यान त्याचा एक चिरासुद्धा ढिला व्हायचा नाहीं पण म्हणून या काहीं जगातल्या सर्वांत बलवान वस्तु नव्हेत लोकाची शक्ति याहिपेक्षा जास्त मोठी आहे त्याच्या शक्तीन हीं दार एका क्षणात उघडीं होतील "

" मग कां नाही होत उघडीं ? आपण सुटू नये अशी का लोकाची इच्छा आहे ? "

" तसं नव्हे रामशरण, अजून लोकाना आपल्या या शक्तीची जाणीव नाहीं. "

रामशरण आता भलतासाच हातघाईवर आला होता असें त्याच्या बोलण्यावरून वाटत होतें. त्याची ही अवस्था पाहून मला वाईट वाटे, पण मी तरी काय करणार ? शब्दानी जर समाधान होतें तर शब्दानीं स्वराज्यसुद्धा का मिळाले नसतें ? शिवाय माझी सुद्धा त्याच्याचसारखी स्थिती झालेली तो पाहात होता मग माझ्या शब्दानीं त्याचं समाधान कसें व्हावें ?

दिवसामागून आम्ही दिवस काढीत होतों चार भिंतींच्या आत ! जगापासून दूर ! तुरुंगाच्या भिंतीपलीकडे केवळ काहीं पावलांच्या अंतरावरच बाहेरचें जग होतें. आम्ही ज्यांत भाग घेण्यासाठीं धडपडत होतो ते सारे व्यापार तिथे चालू होते परंतु तें शेंकडो, हजारों मैल दूर--नव्हे दुसऱ्याच कुठल्या तरी एखाद्या जगांत असावे त्याप्रमाणें वाटत होतें. त्या जगाशीं आमचा काही संबंध नव्हता. तें जग आमच्या डोळ्यांना दिसत नव्हतें, कानाना त्याचा आवाज ऐकू येत नव्हता फक्त एवढेंच माहीत होतें कीं तें इथेच अगदी जवळ आहे आणि त्यामुळें मनाची अवस्था अधिकच विचित्र होत होती

--आणि अशा अवस्थेंत असतांनाच एक दिवस अचानक जेल

माझ्यापुढ उभा राहिला आणि म्हणाला, "सब तय्यारी रखना कल सुबह तुम छुट जाओगे"

त्याचे ते शब्द ऐकून मला काय वाटलें तें सांगता येणार नाहीं तुरुगातून सुटण्याची माझी ही पहिलीच वेळ नव्हती, पण तो सबंध दिवस मी सारखा बराकींत येरझारा घालीत होतो रात्रभर माझ्या डोळ्याला डोळा लागला नाहीं

मी उद्या सुटणार ही बातमी हा हां म्हणता साऱ्या वार्डभर पसरली प्रत्येकजण माझ्याजवळ येऊन माझें अभिनंदन करू लागला प्रत्येकानें मला त्याच्या घरी जाऊन चौकशी करण्याची आणि खुशाली कळविण्याची विनंती केली. कुणाच्या बायकोला भेटायचें होतें, तर कुणाच्या भावाच्या फीची व्यवस्था करावयाची होती कुणाच्या आईला खुशाली कळवायची होती, तर कुणाच्या घरून पैसे पाठविण्याचा निरोप होता प्रत्येकाच्या बोलण्याला मी मान हलवीत होतो परंतु ते काय म्हणत होते यातील एक शब्द तरी माझ्या कानात शिरला किंवा नाही कुणास ठाऊक निरनिराळ्या विचारात मी गढून गेलों होतों ते कसले विचार होते तें मला स्वत लाच आता आठवत नाहीं पण मला वाटते मी दिवसाढवळ्या, जागेपणीं कसलीं तरी स्वप्नें पहात होतों मी त्या दिवशी जणू तुरुंगात नव्हतोच त्या चार भिंतींपलीकडे माझें मन वावरत होतें कुठें तें त्याचे त्यालाच ठाऊक.

रात्र संपतां संपत नव्हती आजची रात्र एकाएकी खूप मोठी झाली आहे असें मला वाटू लागलें इतक्यांत बाजूला झोंपलेल्या रामशरणची मला आठवण झाली माझ्या विचारचक्राच्या गतीत त्याची आठवण मी पार विसरून गेलों होतो आणि तो सुद्धा सबध दिवसात एका अक्षरानें सुद्धां बोलला नाही प्रत्येकजण मला बाहेर कळविण्यासाठीं काहींना काहीं निरोप सागत होता, परंतु रामशरण मात्र अगदी स्वस्थ होता मला कसें अपराध्यासारखें वाटू लागलें मी त्याला हळूच हाक मारली. मला वाटलें तो झोंपला असेल, पण तो जागाच होता मी हाक मारतांच तो चटकन् उठून बसला आणि म्हणाला, "काय बाबू ?"
त्याच्या डोळ्याला डोळा भिडविण्याची मला हिंमत आली नाहीं मी खालीं पहात स्तब्ध राहिलो बाहेर काळोखात पहारा देणाऱ्या शिपायाच्या बुटाचा खाडखाड आवाज ऐकू येत होता बराकीच्या कोपऱ्यात काहीं पाकोळ्या फडफडत होत्या

रामशरण माझ्याजवळ येऊन बसला आणि म्हणाला, "अरे, उसमे क्या है बाबू ? असं तर प्रत्येक मनुष्याचच होतं."

" पण तूं स्वत होऊन एक शब्द सुद्धा बोलला नाहींस प्रत्येकजण काहीं ना काही निरोप सागत होता, पण तूं बाहेर कळवायला काहीं निरोपसुद्धां दिला नाहींस ? "

" कसला निरोप देऊ ? कोण आहे माझ बाहेर ? आणि मी मुद्दामच बोललों नाहीं म्हटल जाऊ द्यावा हा दिवस असाच. उद्या तुम्ही जायच्या वेळीं मी कुठं पळून जाणार नव्हतों "

आम्ही दोघेहि बराच वेळ स्तब्ध होतों कुणाच्याच तोंडून शब्द बाहेर पडेना बाहेर तासाचा ठोका पडला बाजूच्या बराकींतील शिपायानें ' ऑल वेल ' ची आरोळी ठोकली, तिला आमच्या बराकीतील पहारेवानान प्रत्युत्तर दिलें. काहीं वेळानें पहारा बदलायला आलेला शिपाई आणि पूर्वींचा शिपाई याच्यां-तील सभाषण कानावर पडलें पूर्वींच्या पहारेवानानें खिशातून चिलीम काढून पेटविली दोघांनीं मिळून चार झुरके मारले आणि पूर्वींचा पहारेवान निघून गेला पुन्हा जिकडे तिकडे सामसूम झालें.

मी आणि रामशरण तसेच बसलों होतों. बऱ्याच वेळानें रामशरण मला म्हणाला, " बाबू, कल तुम छुटोगे तो मैं एक बात कहूं ? "

" जरूर " मी म्हटलें.

" बाहेर जाऊन लोकाना सांगा, कीं तुम्ही मनात आणलं तर तुरुगाचीं दारं सुद्धा खाडकन् उघडू शकतात. "

---

# ‘ मला क्षमा करा—!’

[ बंगालचे सुप्रसिद्ध कलाकार
कॉ चित्तप्रसाद ह्यांच्या
कवितेच्या आधारावर रचलेली
एका वंग युवतीची सत्यकथा ]

आज मी इथ पडल्यें आहे माझ्या भोंवतीं माझ्या सारखेच आणखी किती तरी लोक इथ पडले आहेत स्त्रिया आणि पुरुष कुणाचे प्राण निघून गेले आहेत, कुणाचे जाण्याच्या बेतात आहेत भोवतालीं सर्वत्र अधुक छाया पसरलेली दिसते काय ही माझी अवस्था? माझ्या सर्वांगावर हे कसले घाणेरडे फोड आले आहेत? शरीराच्या रध्रारध्रातून घाणेरडा पू वाहतो आहे सगळीकडे असह्य दुर्गंध सुटला आहे कुणीहि माझ्याजवळ फटकायला तयार नाहीं

—शेजारच्या खिडकींतून सायंकाळच्या उन्हाची तिरीप जवळच्या भिंतीवर पडली आहे उन्हात इवल्याशा सावल्या इकडून तिकडे नाचत आहेत

*　　　　*　　　　*

नकळत माझी दृष्टी त्या खिडकी बाहेरच्या सोनेरी प्रकाशाकडे वळली माझ्या अंतश्चक्षूंसमोर माझ्या पूर्वायुष्याचा चित्रपट उभा राहिला किती रम्य होते ते दिवस!

आमचें गाव छोटेसेंच होतें पण तितकें सुंदर गांव साऱ्या दुनियेंत दुसरें नसेल तीं इवलालीं टुमदार घरें आणि पश्चिमेच्या बाजूला पसरलेलें अफाट माळरान रात्रीच्या शीतल स्निग्ध चंद्रप्रकाशांत सारी दुनिया कशी रुपेरी रसानें न्हाऊन निघाल्यासारखी चमके

माझा नवरा दिवसभर शेतात काम करी माथ्यावर सूर्य आला कीं मी न्याहरी घेऊन शेतावर जाई वाट केव्हा संपेल असे मला होऊन जाई माझी चाहूल त्याला पटकन कळायची आणि मग तो बैलाना सोडायच्या उद्योगाला लागे मी नदीकाठीं माडांच्या सावलींत जागा साफसूफ करुन त्याची वाट पाहात बसे. भोवतालीं मद वारा वहात असे. माडाच्या पानाचें गोड सगीत चालू असे. मधूनच नागर हाकताना आपल्या कठोर आवाजांत मारलेली एकाद्या शेतकऱ्याच्या गाण्याची लकेर कानावर येई नदीच्या स्वच्छ पात्रात माझें प्रतिबिंब पडलेलें दिसे पाण्यात प्रतिबिंबित झालेल्या माझ्या आकृतीच्या त्या ठसठशीत रेषा पाहून माझे मन अभिमानानें भरुन येई आणि नकळत माझी दृष्टी शेताच्या बाजूला जाई सूर्याच्या उन्हात उजळून निघालेल्या त्या पिवळ्या धमक पिकांत शोभुन दिसणारी माझ्या नवऱ्याची काळीभोर आणि तुकतुकीत अशी पिळलेली शरीरयष्टी बघून माझें भान हरपून जाई. आणि मग—

'काय बघती आहेस ग एवढ टक लावून ?' ह्या त्याच्या खडखडीत प्रश्नानें मी भानावर येऊन लाजेनें चूर होऊन जाई

* * *

—पण आज ते दिवस कुठें आहेत ? एकाएकीं काळ फिरला आणि आमच्या गोजिरवाण्या संसारावर आकाशाची कुऱ्हाड कोसळली भराभर धान्याच्या किंमती वाढूं लागल्या आणि घरात खायला मिळणें अशक्य झालें.

चागल्या किमतीच्या मोहानें आम्ही आपल्या जवळचा सारा तांदुळ विकून टाकला होता आणि जेव्हा आम्हाला बाजारात तांदूळ घ्यायची वेळ आली तेव्हा आम्ही ज्या भावाला तो विकला त्याच्या तिपटीनें भाव वाढले होते

ज्या वेगानें आले त्याच वेगानें सारे पैसे सपून गेले बैलाची जोडी विकणें भाग पडलें इतके दिवस ज्याच्या जिवावर शेती केली ते धडधाकट बैल विकून टाकताना माझ्या नवऱ्याचें काळीज फाटून गेलें त्यानतर माझ्या दागि-न्यांची पाळी आली केवळ तीन रुपयाला ते आम्हाला विकावे लागले पण ते पैसे सपायला किती दिवस लागणार ? पुन्हा उपासमारीचा प्रसग आला पोराना

कोरभर अन्न मिळेनास झाल चार दिवस आम्ही अन्नाशिवाय काढले. शेवटीं तो मला म्हणाला,

" मी आता शहरात कुठं काम मिळाल तर बघतो इथ राहून आता निभाव लागणार नाहीं ' बोलता बोलता त्याचे डोळे आसवांनी भरून आले. माझ्याहि डोळ्याला टचकन् पाणी आलें

तो निघून गेला जातांना त्यानें पैसे पाठविण्याचें आश्वासन दिलें होतें पण पैसे आले नाहींत चार दिवस झाले, आठ दिवस झाले, पधरा दिवस झाले, परंतु पैसे आले नाहीत घरांत अन्नाचा दाणा नव्हता मुलं भुकेनं तडफडत होतीं तान्ह्या मुलाचा जीव दुधाविना कासावीस होत होता पण माझ्याच पोटात अन्नाचा कण नव्हता तर त्याला पाजणार तरी कुठून ? आज पैसे येतील, उद्या येतील, ह्या आशेवर मी कशी बशी जगत होत्यें रोज तिन्ही साजच्या करकरीत वेळीं दूरवर कुठे कुणी येते कां म्हणून मी डोळे फाडफाडून बघत असे डोळे शिणून जात, पण कुणीसुद्धा दृष्टीस पडत नसे

—आणि एक दिवस एका गाववाल्यानें बातमी आणली की तो शहरांत पटकीनें मेला माझा नवरा मेला !

माझा साराच आशातंतू जळून खाक झाला आता मी काय करूं ? कुठें जाऊं ? पोराची दैना डोळ्यानें बघवेना, पण पाहणें भाग पडत होतें कांहीं तरी करावें–शक्य असल्यास ही झोपडी कुणी विकत घेईल तर पाहावें असें मी मनाशीं ठरविलें

—पण दुर्दैव माझ्या पाठीशीं हात धुवून लागलें होतें दुसरा दिवस उजाडतो न उजाडतो तोंच जोतेदारानें थकलेल्या वसुलासाठीं जप्ती आणली घराचा आधारहि नाहींसा झाला दोन्ही नि ष्पाप पोराना घेऊन मला रस्त्यावर आपलें बिऱ्हाड थाटावें लागलें.

पोटात अन्नाचा कण नाहीं. थंडीचा कडाका पडायला सुरवात झालेली. खाण्यासाठीं मुलें सारखी तोडत होतीं वाटे तीं मरून जातील तरी बरें होईल. आपला सुद्धां जीव निघून जाईल तर ह्या यातना तरी डोळ्यानें पाहाव्या लागणार नाहींत पण नाहीं माझी जीविताची आशा अजून सुटली नव्हती. एखादा कृप-णानें आपल्या धनाला चिकटून रहावें तशी मी आपल्या जिवाला चिकटून होत्यें, काहीं तरी उपाय निघेल म्हणून धडपडत होत्यें.

——आशा सुटत नव्हती आणि उपाय सापडत नव्हता माझी स्थिती

एखाद्या वेड्यासारखी झाली पोराच्या त्या यातना माझ्या डोळ्यानीं बघवेनात. माझा जीव कासावीस होऊं लागला आणि–

––आणि शेवटी मी स्वत ला विकायचें ठरविलें मी माझ्या शरीराचा विक्रय करायचे ठरविलें पोराना घोटभर दूध मिळावे म्हणून मी माझे शील विकलं मला घासभर अन्न मिळावें म्हणून मी माझ्या अब्रूचा बाजार मांडला ज्याचा वारा सुद्धां पूर्वी सहन करणें मला शक्य झालें नसतें अशा घाणेरड्या लोकाशीं––

पण नको तो विचार मनात आला कीं हृदयाची कशी आग होते लज्जेनं शरीर जळून खाक होतें आहेसें वाटतें मी पोटाच्या आगीनं असहाय होऊन, माझ्या बाळाच्या वेदनानीं वेडी होऊन आपल्या शरिराचा बळी दिला

––आणि तरीहि मी माझें पोट भरू शकल्यें का ? माझ्या बाळांना मी वाचवूं शकल्ये का ? शीलाचा बळी देऊनहि मी माझ्या बाळाचा प्राण वाचवू शकल्यें नाहीं त्याना पोटभर अन्न देऊ शकल्यें नाहीं शेवटीं अन्नासाठी कंठशोष करीत त्यानीं प्राण सोडले त्याच्या त्या चेहऱ्याकडे मला पाहवेना किती तरी वेळ मी डोळे गच्च मिटून त्या प्रेतांजवळच बसून होते पण डोळ्यासमोरून ते भेसूर चेहरे हलेनात त्यांच्या किंकाळ्या माझ्या कानांचे पडदे फाडून सळयाप्रमाणें कानांत घुसू लागल्या कशी तरी सारी शक्ति एकवटून मी उठल्यें आणि दोघानाहि नदीच्या त्या अथांग पाण्यात फेकून दिलें

––आणि मी ?–माझी काय अवस्था ?

* * *

मी आज इथे घाणेरड्या रोगानं आसन्नमरण होऊन ह्या रिलीफ हॉस्पिटलमध्यें पडल्यें आहे कुणी सुद्धा माझ्याजवळ फिरकत नाहीं बाहेरचे ऊन सौम्य सौम्य होत आहे झवलाल्या सावल्या लांब लाब होत आहेत अगदीं अदृश्य होण्याच्या बेतांत आहेत

मातानों, भगिनींनो,–चितगावच्या साऱ्या महिलानों, मला क्षमा करा मी माझ्या अब्रूला आचवल्ये आहे आणि त्याच प्रायश्चित्तहि भोगल्यें आहे. पण कां ? मीहि तुमच्यासारखीच एक स्त्री आहे मीहि तुमच्यासारखीच एक माता होत्यें, कुलवंताची कन्या होत्यें, अब्रूदाराची अब्रू होत्यें मग माझी अशी दशा का झाली ? मी जगातून का उठल्यें ? चितगावच्या मातानो, चितगावच्या भगिनींनो, तुम्हीं कुठ होता ? तुम्हीं कुठ आहांत ? तुम्हीं आहात–आपल्याच

ठिकाणीं आहात पण मला त्याचा आतां उपयोग नाहीं. येर्थे मी मला क्षमा करा–मला क्षमा करा–मला क्षमा करा—

* * *

लांब लांब सावल्या अदृश्य झाल्या सायंकाळच्या अंधुक प्रकाशात त्या विलीन झाल्या

---

# एक शोकान्तिका

बॅडमिंटनची रॅकेट, गणिताची पुस्तकें, आणि फडक्यांच्या कादंबऱ्या यांशिवाय कुठलीहि गोष्ट तिच्या हातीं आढळत नसे फर्स्ट क्लास, रीजंटमधील फक्कड पिक्चर, साड्यांची नवी डिझाईन्स, इत्यादि ठराविक विषयांखेरीज इतर कुठल्याहि गोष्टींत ती उगाच लक्ष घालीत नसे नाहीं म्हणायला कुठें एखादी गाण्याची चांगल्यापैकी बैठक असली तर मात्र अभ्यासाचीं पुस्तकें गुंडाळून ठेवून ती सारी रात्र जागवून काढी

आमच्यासारख्या माफक अभ्यास आणि भरपूर इतर धंदे करणाऱ्या लोकांपासून ती नेहमींच फटकून वागत असल्यामुळें तिनें आमचा रोष ओढवून घेतलेला होता कॉलेजमध्यें विद्यार्थ्यांसाठी 'कॉमन रूम' असता, ती सोडून कॉलेज समोरच्या देवळाच्या पारावर आम्ही अड्डा ठोकत असू. कारण आरडाओरडीचें स्वरूप धारण करणारे आमचे वादविवाद सहन करण्याइतकी आमच्या प्रिन्सिपलची प्रकृति कणखर नव्हती प्रोफेसर ज्या वेळीं टेनिसनच्या काव्याचें माधुर्य विद्यार्थ्यांच्या डोक्यांत भरविण्याचा प्रयत्न करीत असत त्यावेळीं आम्ही शेवटच्या बांकावर बसून कॉलेजच्या दुकानातील स्टेशनरीचे भाव कमी करण्यासाठीं प्रिन्सिपलकडे करावयाच्या अर्जांचे मसुदे तयार करीत असू. प्रोफेसर्स ज्या वेळीं राज्यशास्त्राचे धडे आमच्या गळीं उतरवण्याचा प्रयत्न करीत त्या वेळीं नोटस् लिहून घेण्याऐवजी येत्या युनियनच्या निवडणुकींत आपले उमेदवार कसे निवडून येतील याचे बेत

आश्चर्यात आम्ही गुंग असूं. या उलट ती प्रोफेसर्सचा प्रत्येक शब्द अगदीं लक्षपूर्वक ऐकून घेत असे आणि प्रत्येक मुद्दा काळजीपूर्वक टिपून घेत असे प्रत्येक परीक्षेत तिला हटकून वरचा नंबर मिळायचा, तर आमचे पेपर्स प्रोफेसर्सच्या हातीं लागण्याऐवजीं परीक्षेच्या वेळीं आमच्या नावाचें मेडिकल सर्टिफिकेट मात्र प्रिन्सिपलच्या टेबलावर पडायचें वार्षिक परीक्षेची वेळ आली म्हणजे आम्ही कसे तरी धावपळ करून आपले जेमतेम पास व्हायचे त्यावेळी तिच्याच नोट्स् आमच्या उपयोगी पडायच्या ही गोष्ट वेगळी अशा परिस्थितीत तिचें आमचें कस बनावें ? ती आम्हाला टवाळ म्हणत नसली तरी आम्ही तिच्या लेखीं फारसे चांगले लोक नव्हतो

आणि आम्ही सुद्धां तिची फारशी तारीफ करणारांपैकीं नव्हतो आपल्या स्कॉलर्सबद्दल कॉलेजला फार अभिमान वाटतो असें कॉलेज मॅगेझिनमध्यें जरी छापून येत असलें तरी ती काहीं खरी गोष्ट नसते स्कॉलरची टवाळी आणि कुचेष्टा करण्यातच इतर विद्यार्थ्यांना मौज वाटत असते

रोज बदलणारीं तिचीं पातळें आणि एकदर ठाकठीक वेषभूषा सुद्धा आमच्या डोळ्यांना जरा खुपतच असे सदा फाटक्या विजारी आणि तुटक्या पट्ट्यांच्या वहाणा घालून मिरवणारे आम्ही आम्हाला त्याचा मत्सर वाटला तर नवल नाहीं तसे आम्ही भिकारी होतों असें नव्हे, परंतु आमच्या खिशांतील बहुतेक पैसे सिगारेटची, छापखान्याचीं आणि पोस्टर्सचीं बिलें भरण्यात खर्च होत असल्यामुळें आपल्या कपड्यांची दिवसें दिवस होणारी अधोगती आम्हांला उघड्या डोळ्यानीं पाहाणें भाग पडे अर्थातच आमच्याप्रमाणें नसत्या उठाठेवींत एक कवडीहि न खर्च करणाऱ्या तिचा आम्हाला राग येई

आमच्या इतर भानगडीहि तिला मुळीच मान्य नव्हत्या. मिलच्या गेटावर पोस्टर्स चिकटवण्यासाठी हातात चिक्कीचें भांडें आणि चिक्की पोतण्यासाठी बनविलेला जुन्या झाडूचा कामचलाऊ ब्रश घेऊन आम्ही जेव्हां रस्त्यातून हिंडत असू, तेव्हा आमचा अवतार पाहून ती नाक मुरडी एका हातात झेंडा आणि दुसऱ्या हातात पत्र्याचा भोंगा घेऊन जेव्हा आम्ही कोपऱ्या कोपऱ्यावर दवंडी पिटत असू तेव्हां ती आमच्याकडे पाहून हंसत असे चिटणीसपार्कात आमच्या जाहिर सभा होत. लाऊड स्पीकर भाड्यानें घेण्याइतका पैसा आमच्याजवळ नव्हता त्यामुळें आम्ही घसा फोडून ओरडत असूं. त्याची ती आपल्या मैत्रिणींजवळ नक्कल करून दाखवीत असे.

बग्याला या सगळ्या प्रकाराची मोठी चीड येई मी त्याला सांगत असे, " जाऊ दे रे, बापाचा पैसा आहे, करते आहे मजा जरा गिरणींत राबाव लागलं असतं म्हणजे समजलं असतं "

याचा अर्थ असा नव्हे कीं मी रोज सकाळी भोंगा वाजताच हातात शिदोरीची गाठोडी घेऊन गिरणीच्या बाजून पळत असे रागाच्या भरात आपलें बोलत असू कांहीं तरी

—असे दिवसामागून दिवस जात होते आम्ही नाकासमोर दृष्टी ठेऊन आपल्या रस्त्यानें जात होतों तिचाहि कार्यक्रम अव्याहत चालू होता आमचा मार्ग वेगळा, तिचा मार्ग वेगळा आमच्या सभा संमेलनाच्या वाटेला ती फिरकत नसे तिचीं पुस्तकें, क्लास आणि कादंबऱ्या यांच्या आड आम्हीं येत नव्हतों. आमचें सभेतील गाणें तिच्या लालित्यप्रिय कानाला मानवणें शक्य नव्हतें आणि तिला आवडणाऱ्या गाण्याच्या मैफलींत आमचे डोळे उघडे राहणें शक्य नव्हतें त्यामुळें तसल्याहि निमित्तानें आमची गाठभेट पडणें शक्य नव्हतें अगदींच कुचकामाची पोर म्हणून आम्ही तिची दखलच न घेण्याचें ठरविलें

–पण एक दिवस तिनें आम्हाला आश्चर्याचा जबरदस्त धक्का दिला बाळ्याचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना मी चकित होऊन बग्याला म्हटलें, " अरे, का रे ! आज काय जग उलटल का रे ? " तो वावळटासारखा माझ्या चेहऱ्याकडे पाहात राहिला

तें १९४२ च्या ऑगस्टचे दिवस होते ९ तारखेला कॉंग्रेसच्या पुढाऱ्याना पकडताच साऱ्या देशांत एकच डोंब उसळला चवताळलेल्या लोकांच्या क्रोधाच्या आवेगात वाटेल त्या गोष्टी आणि वाटेल ते उत्पात घडत होते पण असा काही अपघात घडू शकेल असें आमच्या स्वप्नातहि आलं नव्हतें पण तो उत्पात घडला ती कॉलेजच्या दारावर पिकेटिंग करताना आम्हाला दिसली.

गणित आणि गाणें याशिवाय जिला दुसरें कांहीं समजत नाहीं असें आम्हीं समजत होतों, साड्या आणि सिनेमा याच्याशिवाय जिला दुसरी वस्तु माहित नाहीं असें आम्हाला वाटत होतें, बापाच्या पैशावर गमजा करणारी म्हणून जिची आम्ही हेटाळणी करत होतों, तीच आज चक्क आमच्या डोळ्यासमोर कॉलेजच्या दारावर पिकेटिंग करीत उभी होती.

" बाळ्या, आपलं मत एकंदरीत चुकीचं होतं तर ! "

" हं ! असं वाटतं खरं. "

" निदान आता तें बदलायला खात्रीनं पाहिजे "

पण तिच्यबद्दलचें आमचें मत बदललें हें तिच्या निदर्शनास आणून देण्याचा आम्हाला कधीं अवसरच मिळाला नाहीं कारण याहि वेळीं आम्हीं पूर्वी प्रमाणेंच एकमेकाच्या विरोधी पक्षांत होतों ती 'देशभक्ता'च्या सगतींत होती, तर आम्ही 'देशद्रोह्या'च्या कळपात होतों

आम्हांला आमचे बदललेलें मत जरी तिला कळवितां आलें नाहीं तरी तिनें मात्र आमच्याबद्दलचें तिचें बदललेलें मत आम्हांला पहिल्याच तडाख्यात ऐकवून टाकलं

" तुम्हीं देशद्रोही आहात, बदमाश आहात इतके दिवस मारे क्रातीच्या गप्पा मारीत होता, तेव्हा वाटल असेल काहीं पाणी अगात पण तुम्हीं अगदी भेकड निघालात धि कार असो तुम्हाला " इ इ

आम्हीं तिची समजूत घालायचा प्रयत्न केला, पण ती आमचा एक शब्द ऐकून घ्यायला तयार नव्हती ती आमच्यावर कडाडली,

" चालते व्हा इथून तुमचा एक शब्द सुद्धां ऐकून घ्यायला आम्हीं तयार नाहीं जास्त बडबड कराल तर तोडाला काळ फासून गावातून धिंड काढू "

बग्या आतांपर्यंत शात बसला होता परतु यापुढे त्याच्यानें दम धरवेना. त्याचे डोळे गरगर फिरायला लागले

"हे बघ बाई, " त्यानें अगदीं सथ आवाजात सुनवायला सुरवात केली. " आम्हीं इथं डोकं फोडून घेण्याच्या तयारीन आलों आहोत तुझ्या एवढ्या तेवढ्या धमकीनं का आम्हीं दबून जाऊ ? आम्हाला या गोष्टी कांहीं नव्या नाहींत आम्हाला जें काहीं सागायच तें विद्यार्थ्यांना अगदीं मोठ्यानं ओरडून सागितल्या-शिवाय आम्हीं राहाणार नाहीं "

बग्याच्या आवेशयुक्त भाषणानंतर तिथें लगेच वीररसाच्या प्रकर्षाला सुरवात झाली.

सध्याकाळीं बग्या मला भेटला तेव्हा त्याच्या डोक्याला बॅडेज होतें. माझाहि हात खाद्यापाशीं चांगलाच ठणकत होता. बग्या मला म्हणाला, "अरे, ती मला आज पुन्हा भेटली होती रस्त्यात "

" मग ! काय म्हणाली ? चप्पल वगैरे काढून मारली कीं काय ? "

" नाहीं, तस काहीं नाहीं केल पण म्हणाली, काय हो ! अगात खादीचे

कपडे घालून वर असें देशद्रोही कृत्य करायला लाज नाहीं वाटत तुम्हाला ! ”

“ मग तू काय उत्तर दिलंस ? ”

“ मी म्हणालों कीं तुम्हीं जर जॉर्जेटचीं पातळं नेसून देशभक्ति करू शकता तर आम्हीं खादी घालून देशद्रोह केला तर काय हरकत आहे त्यांत ? ”

बग्या आपण तिची खूप जिरवली याच आनंदात होता, पण मला मात्र तिच्याबद्दल आणि स्वतःबद्दलहि वाईट वाटत होतें तिनें चार-चौघां देखत केलेली आमची शोभा फारशी स्पृहणीय खात्रीनें नव्हती. मी बग्याला म्हटलें, “ काय रे ! ती मघा आपल्याला भेकड म्हणाली ”

“ अरे, म्हणूं दे रे असे कैक पाहिले आहेत आम्हीं. मी सागतों तुला लाल्या, तूं तिकडे लक्ष देऊं नकोस या सगळ्या पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्र्या आहेत. ”

“ छट्–छट्–बग्या, लेका तुझीं ठाम मतं ऐकवणं जरा बंद कर पाहूं असतील पावसाळ्यांतल्या छत्र्या, पण आज ती कॉलेजवर पिकेटिंग करायला आणि पोलिसांच्या लाठ्या खायला तयार आहे कीं नाहीं ? कुठून आली रे ही हिंमत ? ”

“ अरेच्या, फारच तरफदारी करायला लागलेला दिसतोस इंम्प्रेस झालास वाटतं ? ”

“ ए, आचरटपणा बद करा तूं लेका अगदीच आडदाड आहेस कुठ-ल्याहि गोष्टीचा शातपणान विचार करायाची सवयच नाहीं पावसाळ्यातल्या छत्र्या, पावसाळ्यातल्या छत्र्या म्हणून हिणवितोस, पण मला हें साग कीं हें एवढें सगळे विद्यार्थी एकदम कशाची पर्वा न करतां वाटेल त्या दडपशाहीला तोंड द्यायला तयार झाले याचा अर्थ काय ? ”

यावर बग्या निरुत्तर झाला त्याच्या फुटलेल्या डोक्याला जास्त त्रास द्यायची माझीहि इच्छा नव्हती म्हणून मीहि तो वाद तिथेंच सपवला

* * *

दुसऱ्या दिवशीं ती खादीचें पातळ नेसून कॉलेजच्या द्वारावर उभी अस-लेली पाहिली आणि माझा तिच्याबद्दलचा आदर अधिकच वाढला देवळाच्या कट्ट्यावर बसून भोंवतालच्या दहा-पाच विद्यार्थ्यांशीं बोलत असता माझ्या मनात तिच्याबद्दलचे विचार घोळत होते. उगीच पोरगी वाया जाते आहे !

चार आठ दिवस असेच गेले रोज विद्यार्थ्यांच्या मिरवणुकी निघत. जाळपोळ वगैरे प्रकार चालू होते मुख्य मुख्य विद्यार्थ्यांना पोलीस पकडून नेत

होते एक दिवस तिनें हातांत झेंडा घेऊन मिरवणुकीचें नेतृत्व स्वीकारलें लाठी-हल्ला झाला तिला पकडून नेलें

असेच आणखी आठ पधरा दिवस गेले आता मिरवणुकी वगैरे बद पडल्या होत्या पंधराच दिवसापूर्वी सर्व शहरात एकच गोंधळ माजला होता, किंवा देशभर एक मोठें आदोलन झालें होतें हे कुणाला सागूनहि खरें वाटलें नसतें रस्त्यातले खड्डे पुन्हा बुजविण्यात आले होते तुटलेल्या तारा पुन्हा दुरुस्त करण्यात आल्या होत्या फुटलेल्या बत्त्याच्या ठिकाणीं नवे बल्ब बसविण्यात आले होते नाही म्हणायला मधून मधून लष्करी लॉऱ्या रस्त्यानें हिंडत किंवा कुठें तरी एखादी रेल्वे उलटल्याची बातमी येई. धरपकडीचें सत्र मात्र अजून बद झालें नव्हतें.

एक दिवस मी कॉलेज समोरच्या देवळाच्या पारावर बसलों होतों इतक्यात पोलिसची लॉरी तिथें आली आणि मला बसवून घेऊन गेली दोन महिनेपर्यंत मी तुरुगांत सरकारी खर्चानें लोणी खाण्यात आणि माशा मारण्यांत वेळ घालवीत होतों बाहेरच्या जगाची काही खबरबात नव्हती दोन महिन्यानंतर मला सोडून देण्यांत आलें

ती माझ्या अगोदरच तुरुंगातून सुटली होती कॉलेज पुन्हा पूर्वीप्रमाणे सुरु झालें होतें चळवळीचे तीन तेरा झाले होते सगळेच पुढारी झाल्या गेल्या-पासून स्वत चें अग झटकून टाकण्याचा प्रयत्न करीत होते चळवळीत भाग घेतलेले लोक आपल्या पुढाऱ्यांनीं चालविलेला गडबडगुडा पाहून थक्क होत होते, चिडत होते, कित्येक निराशावादाच्या भोवऱ्यात फसून चळवळीकडे कायमची पाठ फिरवीत होते

सुटका झाल्यानतर दुसऱ्याच दिवशी मी कॉलेजात गेलों सगळे व्यवहार पूर्वीप्रमाणेंच चालू होते परतु तरी सुद्धा कॉलेजातील वातावरण पूर्वीप्रमाणें वाटत नव्हतें घरात एखादा मनुष्य मेला तरी घरातले व्यवहार बंद पडत नाहींत. ते पूर्ववत चालूच असतात. पण तरी सुद्धा वातावरण एकदम बदलून जातें तसलीच प्रेतकळा कॉलेजवर आली होती उत्साहाचें कुठें चिन्ह सुद्धां दिसत नव्हतें ती मला कॉलेजात भेटली खादीचें पातळ जाऊन पुन्हा जॉर्जेटची साडी आली होती. पुन्हा हातांत बॅटमिंटनची रॅकेट, गणिताचीं पुस्तकें आणि फडक्यांच्या कादंबऱ्या दिसू लागल्या होत्या पुन्हां पूर्वीच्याच आयुष्याला सुरवात झाली होती.

बम्या मला म्हणाला, " पाहिलंस! अरे स्मशान वैराग्य होतं तें मी तुला म्हटलं तर तूं मला तत्वज्ञान शिकवायला लागलास अरे, गणितं करून करून कंटाळली म्हणून थोडे दिवस देशभक्ति केली झालं "

बम्याचे कान ओढून मी त्याला गप्प बसविलें माझा त्याच्यावर विश्वास बसणें शक्य नव्हतें तिचा पूर्वीचा आयुष्यक्रम पुन्हां सुरू झाला असला तरी कांही तरी चुकल्यासारखें मला वाटत होतें तिच्या डोळ्यांतील काजळाबरोबर तिथें वास्तव्य करून असलेलें खेळकर हास्य आता नाहींसें झालें होतें ओंठावर सदैव नाचणारी गाण्याची लकेर आता लुप्त झाली होती सत्र्याला पहिलाच वार येऊन तो पिवळ्या धम्म सत्र्यानीं फुलून जावा आणि लागलेंच तें झाड मुळापासून जळून जावें तसा कांहींसा प्रकार मला भासला

मी एक दिवस मोठा धीर करून तिला विचारलें, " आता पुढं काय ? "

तिनं आपली निर्जीव नजर माझ्यावर रोखून धरली काही वेळानें ती म्हणाली,

" कसल काय ? हीं बघितलीं किती पुस्तकं अजून वाचायचीं राहिली आहेत आणि परीक्षा तर अगदीं चाहुलीच्या अंतरावर आलेली "

तिनें आपली नजर पुन्हा पुस्तकाकडे वळविली मी सुद्धां खांदे उडविले आणि तिथून निघून गेलों.

---

# श्रमांच्या अश्रूंचें मोल

तो आपल्या शेताच्या बाधीवर उभा होता डोक्याचें मुंडासे सुटून खालीं खांद्यावर ओघळलें होतें तरी त्याची त्याला शुद्ध नव्हती. निश्चल नजरेंन तो त्या हिरव्यागार शेताकडे पहात होता.

हिरव्या शेताच्या रागाच्या रांगा दूर क्षितिजाला मिडलेल्या दिसत होत्या जणू काहीं हिरवा दिसणारा अथांग समुद्रच मधूनच पाढऱ्या शुभ्र कपाशीचीं बोंडें लाटावरील फेसाप्रमाणें चमकत. इवलालीं तुरीची रोपें त्या उभ्या असलेल्या उच आडदाड जवारीच्या धाटांत कुठल्याकुठें लोपून गेलीं होतीं जवारीचीं चाकूच्या तीक्ष्ण पात्याप्रमाणें असलेलीं हिरवीं रुंद पानें मावळत्या सूर्याच्या प्रकाशात एखाद्या संगिनी प्रमाणें तळपत होतीं होय, शेतकऱ्यांच्या त्या सगिनीच होत्या त्याच सज्ज सगिनींच्या सहाय्यानें तो जीवनकलहातून पार पडत असे

—त्या लाबवर पसरलेल्या हिरव्या समुद्राच्या पलीकडे ढगांनीं आच्छादलेल्या डोंगराची धूसर अशी रागच्या रागत दिसत होती कणसाच्या भारानें वाकलेली जवारीचीं धाटें त्याच्या भव्योदात्त आकृतीला नमन करीत आहेत असें वाटत होतें

—त्या बाधीवर उभा राहून तो अनिमिष नेत्रानीं तें सारें दृश्य आपल्या डोळ्यात साठवून ठेवीत होता पहातां पहाता त्याच्या डोळ्यात पाणी उभें

राहिलें एक दीर्घ निःश्वास टाकून तो तोंडातल्या तोंडात पुटपुटला

—" ह्या जमिनीवर माझ्या निढळाचा घाम शिंपलेला आहे. ह्या मातीचा कणन् कण माझ्या श्रमांच्या अश्रूंनीं माझ्याशी एकजीव झाला आहे पण आतां-"

सूर्य आपलें प्रकाशाचें जाळें आवरून घराच्या दिशेनें डोंगराआड चालता झाला. त्यानें एकवार पुन्हा त्या दृश्यावरून नजर फिरविली आणि जड पावलांनी तो दुरून दिसणाऱ्या गावाच्या दिशेनें चालू लागला,

त्याच्या पोटाला पुरेशी त्याची जमीन होती तो, त्याची बायको आणि दोन मुलें इतकीं माणसें त्याच्या कुटुंबात होतीं परंतु कधीहि कुणाकडे तोंड वेंगाडायची पाळी त्याच्यावर आली नव्हती त्याचा म्हातारा बाप त्याला नेहमी म्हणायचा, " बघ पोरा, तुला जन्मभर सुखानं मीठ-भाकर खातां येईल इतकं मी कमावून ठेवलं आहे तेवढं राख म्हणजे झालं. कष्ट पडले तरी हरकत नाहीं पण कुणाजवळहि तोंड वेंगाडायचा प्रसंग येऊ देऊ नको " म्हाताऱ्यानें मरताना पोराला जवळ बोलावून सावकाराच्या घराची पायरी चढणार नाही अशी शपथ घ्यायला लावली होती. गेल्या पाच दहा वर्षांत शेतीची परिस्थिती फारशी चांगली नव्हती, परंतु तरीहि त्यानें म्हाताऱ्याची आज्ञा तंतोतंत पाळली होती पण आज—

गेल्या सालीं पीक बरें आलें होतें, त्याच्याच जोडीला जवारीचे भावहि खूप वर चढले होते ते पाहून त्याचें मन नाचू लागलें यंदा चांगला नफा कमवायचा, त्यातून पुन्हा एक शेत विकत घ्यायचें, असल्या प्रकारची मनोराज्य करण्यात तो गढून गेला आणि त्या मनोराज्यातच त्यानें आपल्या जवळचें सारें धान्य विकून टाकलें त्याची बायको त्याला म्हणाली सुद्धा

"अवो, तुम्ही हे काय करता ? अवदा हंगाम चांगला आला तवा पुढच्या वर्सासाठीं काहीं राखून ठेवायचं, ते सोडून तुम्ही घरां खायाचबि विकून टाकता ! अवो, चालत आलेली चाल मोडणं चांगलं नाही "

—पण त्यानें तिचें ऐकलं नाहीं, उलट तिलाच तो म्हणाला, " मूर्ख आहेस तू. इतके चांगले भाव असताना विकू नको ? अग, असे भाव कधीं पाहिले होतेस ? हे असे थोडेच टिकून रहायचे आहेत ? ह्याच वेळला विकण्यात फायदा आहे भाव उतरल्यावर पुन्हा आपल्याला घेता येईल की "

पण त्याचें हें मनोराज्य मनांतच राहिलें नवीन शेतच काय पण त्याला रोज लागणारें धान्य विकत घेणें सुद्धां अशक्य झाले सारें धान्य जुगाराच्या

कवडीप्रमाणे एका व्यापाऱ्याच्या हातून दुसऱ्याच्या हातीं खेळत होतें आणि भाव बराभर चढतच होत

एक दिवस बाजारांतहि धान्य मिळेनासें झालें बाजरात गेला असता त्याला कुणीसें सांगितलें की 'सरकारनें भाव कंट्रोल केला म्हणून धान्य नाहींसें झालें कंट्रोल काय आहे आणि धान्य कसें गडप झालें हे अर्थातच त्याला कळलें नाहीं त्याला मांजर, कुत्रें, लिंबू, इत्यादि अदृश्य करून दाखविणाऱ्या गावच्या मांत्रिकाची जादूची कांडी माहीत होती त्याला वाटलें 'कंट्रोल हीहि अशीच काही वस्तू असेल

—परंतु त्याला 'कंट्रोल' काय आहे ह्याचें संशोधन करायला फुरसत नव्हती त्याच्यापुढे ताबडतोब आत्ता धान्य कुठून आणायचें हा प्रश्न पडला होता सबंध दिवसभर तो वणवण भटकला बाजारगांवी त्याला माहीत होते नव्हते तेवढ्या साऱ्या व्यापाऱ्यांची घरें त्यानें धुंडाळून काढलीं परंतु प्रत्येकानें नकारघंटा हलवण्यापलीकडे काहीं केलं नाहीं कंटाळून कंटाळून तो आपल्या गावीं परत आला

——ती रात्र तर कशी बशी निघून गेली कारभारणीनें सारीं गाडगीं मडकीं पालथीं करून रात्रीच्या भुकेपुरत्या कण्या पैदा केल्या परंतु उद्या काय ?

रात्रभर दोघांच्याहि डोळ्याला डोळा लागला नाहीं कोणीहि एकमेकांशीं बोलत नव्हतें दोघांच्याहि नजरा शेजारीं स्वस्थ झोपलेल्या पोरावर खिळल्या होत्या सकाळीं उठताच तीं भाकर म्हणून आईला तोडूं लागतील आणि मग—

उधार मागायला जाताना त्याची त्यालाच शरम वाटू लागली, पण इलाज नव्हता

परंतु आज सगळेच दाणे जात्यात होते सुपांतला कुणीच नव्हता मग त्याला उधार देणार कोण ? कफल्लकाकडे भीक मागण्यासारखंच होतं ते तो अगदीं निराश झाला. इतक्यांत दामा सुतारानें त्याला सांगितलें, "हें बघ, धान्य मिळवायचा एक उपाय आहे तो गोविंदराम वाणी आहे ना, तो धान्य विकतो असं मी ऐकलं आहे पहा नशिबाची परिक्षा घेऊन "

गोविंदराम वाण्याचें नाव काढताच त्याचें तोंड आंबट झालें. गोविंदराम, तो कधीच कुणाचा मिंधा न झाल्यामुळें,त्याच्यावर जळत असे अर्थातच त्याच्याकडे जाणे म्हणजे अपमान करून घेण्यासारखें होतें. पण अडल्या नारायणाला गाढवाचे सुद्धां पाय धरावे लागतात. त्यानें मोठ्या कष्टानें गोविंदरामच्या घराचा मार्ग धरला

आणि त्याच्या अपेक्षेप्रमाणेंच त्याचें स्वागत झालें

"आपण का? या–या–कस काय येणं केलत गरिबाच्या घरीं? काय हुकुम आहे?"

'काहीं नाही, थोडीशी जवारी विकत हवी होती' त्यानें चेहऱ्यावर उसनें हसू आणून म्हटलें

"जवारी? माझ्याजवळ कुठली आली जवारी?" वाण्यानें छद्मी स्वरांत म्हटलें

मोठ्या मिनतवारीनें मनधरणी केल्यावर गोविंदराम इकडे तिकडे पहात हळूच म्हणाला,

"हें बघ जवारी देतों पण चिल्लर मिळणार नाहीं एकदम खंडीभर घ्यावी लागेल आणि शभर रुपये पडतील"

"शभर रुपये? थट्टा करतां वाटतं माझी? शंभर रुपये कुठून आणू मी?"

"हें बघ मी काहीं तुझ्या मागें जवारी घे म्हणून लागलो नाही कुठूनहि आण पैसे मला काय सांगतोस? जमीन वीक"

"जमीन विकू?"

"कां मी काही बायका पोरं विकायला सागितल नाही"

सतापानें त्याचें रक्त उसळत होतें पण मोठ्या कष्टानें त्यानं मन आवरलें आणि तिथून तो उठून गेला

* * *

म्हाताऱ्यानं मरतांना सावकाराच्या घराची पायरी न चढण्याबद्दल त्याला शपथ घातली होती परतु त्याच्यावर तोच प्रसग आला गोविंदरामच्या घराचा उंबरा चढताना त्याची छाती धडकत होती हृदयाचा थरकाप उडून गेला होता. म्हाताऱ्यानें मृत्युशय्येवर आपल्या पासून घेतलेल वचन आपण मोडतो आहों ह्या जाणिवेनं त्याच भोळं अधश्रद्धाळू मन कापत होतं परतु घरीं आईला तोडणाऱ्या पोरांचे केविलवाणे चेहरे त्याच्या डोळ्यासमोर उभे राहिले आणि मन घट्ट करून उपरण्यानें नाक पुशीत तो वर चढला

त्यानं आपली जमीन गहाण टाकली तो त्या बाधीवर उभा असताना त्याच हृदय मूक रूदन करीत होतं अंधारानं हळूहळू सावल्याचा पोशाख चढवायला सुरवात केलेल्या त्या शेताकडे पाहून त्याला आतल्या आत हुंदके येत

होते क्षितिजाआड लपणाऱ्या सूर्यानें हळू हळू पृथ्वीला अंधाराच्या कुशींत लोटायला सुरवात केली पृथ्वीवरचा अंधार त्याच्याहि अंत करणावर ताबा गाजवू लागला

आज तो आपली जमीन सावकाराच्या हातात देऊन आला होता सुसरीच्या दाढेंतील माणिक परत मिळविणं एकदा शक्य होईल, पण सावकाराच्या हातीं लागलेली जमीन—

—आपली जमीन !—एका क्षणात ती दुसऱ्याची होऊ शकते हींच का माझ्या आयुष्यभराच्या कष्टाची किंमत ? हेंच का माझ्या श्रमाच्या अश्रूंचं मोल ? —त्याचे डोळे पाण्यान भरून आले. आणि जड पावलानी तो दूर दिसणाऱ्या गावाच्या दिशेनं चालूं लागला.

— - —

# केशवची आई

अमात्या सहित त्या स्थानीं ।
दुःखाग्नींत गेले आहाळोनी ।
अंतःपुरीं सकळ कामिनी ।
आकांत करिती आक्रोशें ॥
करुनिया हाहाःकार ।
वक्षःस्थळ पिटी नृपवर ।

बाहेरच्या बेलाच्या झाडावरील बेलफळ खालच्या पारावर पडून त्याचा फट्ऽऽ असा आवाज झाला.

—पोथी वाचता वाचतां पार्वतीकाकूंची नजर माजघराकडे गेली पार्वतीकाकू रोज उजाडायच्या आधीं उठून सगळे प्रातर्विधी आणि पूजापाती वगैरे उरकून घेत असत स्वयंपाक घरातच एका कोपऱ्यात असलेल्या देव्हाऱ्यासमोर निरांजन तेवत असे आणि त्याचा मंद प्रकाश काकूंच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर पडलेला असे

स्वयंपाकघराच्या दारातून केशव निजत असलेला माजघराचा भाग त्यांच्या दृष्टिपथात येई पार्वतीकाकूंचा पोथीपाठ चालू असे, त्या वेळीं केशव शांत निद्रासुख घेत असे आणि त्याच्या त्या प्रसन्न मुखाकडे पाहून, त्यांची नजर पुन्हा त्यांच्या पुढ्यांतील निरांजनाच्या इवल्याशा फुलवातीकडे वळत असे

पण आज केशव आपल्या जागेवर नव्हता त्याच्या बिछान्याची जागा आज तशीच रिकामी पडली होती त्या रिकाम्या जागेकडे बघताच त्यांचे डोळे

आसवानी भरून आले सुरकुत्याच्या जाळयावरील ठळक अश्रुबिंदू निरांजनाच्या प्रकाशात मोत्याप्रमाणें चमकूं लागले

——आठ दिवसापूर्वीची गोष्ट केशव जेवायला बसला होता काकू चुली-जवळ बसून त्याला वाढत होत्या एकाएकीं त्याचा हात थबकला काकू प्रश्नार्थक मुद्रेनें त्याच्याकडे बघू लागल्या

" आई, नाहीं ग खाववत मला ! " त्याने मोठ्या प्रयासाने आवढा गिळला काकूच्या मातृहृदयाचा थरकाप उडाला ' कांहीं झाल तर नाही माझ्या बाळाला ' अनाहूत शकेन एकाएकीं मनाच दार खाडकन् ढकलून आत प्रवेश केला

केशव काकूंचा एकुलता एक मुलगा होता. त्याचे वडील गेल्यापासून तर केशव क्षणभर त्यांच्या दृष्टीआड झाला, तर त्यांना चैन पडत नसे केशवच्या वडिलानीं घरात निर्माण केलेल्या वातावरणांत जर केशव वाढला नसता, तर त्याच्या ह्या लाडांनीं तो केव्हाच बिघडून गेला असता

——काकूंच्या आयुष्यात त्यांच्या कसल्याच अपेक्षा पुऱ्या झाल्या नव्हत्या. केशवचे वडील प्रेमळ होते, भावनाप्रधान होते पण हा स्वभावच काकूना नडला त्याचें प्रेम आणि हृदय विशाल होते त्यात जितकें काकूंना स्थान होतें, तितकेंच किंबहुना त्याहून जास्त स्थान त्यांच्या आप्तइष्टाना, त्यांच्या मित्राना, गावातल्या साऱ्या लोकाना, देशातल्या साऱ्या जनतेला होतें केशवचे वडील मोठे पुढारी नव्हते, परंतु त्यांचा सारा वेळ गावातल्या उलाढालीत जाई कॉंग्रेसने सत्याग्रहाचे शिंग फुंकताच त्यांनी पुढचा मागचा विचार न करता त्यात उडी घेतली तीन वर्षांच्या तुरुंगवासात त्यांची प्रकृती पार ढासळून गेली पण गृहस्थ स्वस्थ बसणारा नव्हे तशाहि अवस्थेंत रात्रंदिवस सार्व-जनिक कार्यांचा त्यांचा उद्योग चालू असे तुरुंगातून आल्यावर त्यानीं खेड्यापा-ड्यातून ग्रामसुधारणा आणि खादीप्रसाराचें कार्य हातीं घेतलें त्यात त्याना खेडोंपाडीं पायपीट करावी लागत असे शेवटी ह्याच श्रमाचा परिणाम होऊन भर उमरींतच त्याना परलोकची वाट धरावी लागली.

त्यांचे घरात अजीबात लक्ष नसल्यामुळें पार्वती काकूना फार त्रास होत असे आणि एखाद्या वेळेला त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली कीं त्यांचे डोळे अश्रूनीं भरून येत आणि ते काकूना म्हणत "खरंच, मी तुझा फार अपराधी आहे तुझ्याशीं लग्न करून मी तुझ्या सुखाचा नाश केला ' त्यांचे हे शब्द ऐकले की पार्वतीकाकू सारें दु ख तात्पुरत्या विसरून जात आणि म्हणत, " तुम्ही काय मला दारूबिरू पिऊन छळत तर नाहीं ना ! झालं तर मग चांगल्या कामासाठी थोडासा त्रास झाला तर सहन करायलाच पाहिजे "

अशा रीतीनें सतत अपेक्षा निष्फळ झाल्यामुळे त्याची अपेक्षा करण्याची शक्तीच जणू नाहीशी झाली होती रोज देवाची प्रार्थना करताना त्या मनातल्या मनात म्हणत, ' देवा, केशवकडून मला कशाची अपेक्षा नाहीं, पण त्याला तूं माझ्यापासून दूर होऊ देऊं नको '

— अर्थातच केशवनें " आई, नाहीं ग खाववत मला ! " अस म्हणताच त्या घाबरून गेल्या असल्यास नवल नाहीं

" का काहीं होतंय का तुला ? "

' कांही होत नाहीं ग. पण मघा तीं मुल आलीं होतीं मदत मागायला त्यांच्याजवळचे ते दुष्काळाचे फोटो बघितलेस तूं ? आई, बघवत नाहीं ग डोळ्यान माझ्या डोळ्यासमोर ते भुकेले चेहरे जणू नाचत आहेत तिकडे हजारों लोक उपाशी मरत असताना मी इथ स्वस्थपणानं जेवायच कससच वाटतं मला घशाखालीं घास उतरत नाहीं वाटत, आपणहि त्या मुलासारखी झोळी हातात घ्यावी आणि गावोगाव पैसे गोळा करत हिंडाव "

पार्वतीकाकूच्या छातींत एकदम धस्स झाल

" काय वेड्यासारख बडबडतो आहेस तू आपण करून का दुष्काळ थाबणार आहे त्या मुलाना नाहीं उद्योग उगाच उनाडक्या करत हिंडत असतात '

' आई नको ग अस म्हणू बिचारी दिवसभर उपाशी लोकाच्या पोटांत एक कणभर तरी अन्न पडावं म्हणून सारखीं खपत असतात, आणि त्याना तू उनाडक्या करणारी म्हणते त्याच्या चेहऱ्यावरील व्याकुलता पाहून पार्वती काकूनाच स्वत ची लाज वाटली आपल्या पतीची मूर्तीच आपल्या पुत्राच्या रूपानें आपल्या समोर उभी राहून आपल्याला " पार्वती काय बोलते आहेस तू ? मी उनाड होतों का ? असे विचारत आहे असें वाटू लागलें त्याचा चेहरा पाढरा फटक पडला केशवकडे टक लावून बघता बघता त्यांच्या तोंडून एकदम उद्गार बाहेर पडले, " नाहीं हो, चुकल्यें मी नाहीं पुन्हा अस बोलायची "

केशवला आपल्या आईच्या वागण्याचा अर्थच कळला नाहीं परंतु त्या दिवशीं रात्री आपली आई देवासमोर बराच वेळ बसलेली पाहून त्याला आश्चर्य वाटल्यावाचून राहिलं नाहीं

परंतु त्या दिवसापासून पार्वतीकाकूना चैन पडेनासे झाले आपल्या पतीप्रमाणेच आपला मुलगाहि आपल्यापासून दूर तर जाणार नाहीं ना ह्या आशंकेनें त्याचें हृदय एकसारखें खालीं वर होऊ लागले

—आणि त्यानतर चारच दिवसांनी केशवनें घरी येऊन त्याना सांगितलें, " आई, मी शाळा सोडली "

त्याच्या मुद्रेकडे पाहून काकूंनीं विचरलं, "कां ? शाळेंत मास्तराशीं भांडण बिंडण झाल काय ? मास्तर काहीं बोलले ? "

" नाहीं " अस म्हणून तो स्तब्ध राहिला पार्वतीकाकू अचम्यात पडल्या. त्यांना कांहीं कळेना. शेवटीं त्यानें हळू हळू सांगितलें

" आई, विद्यार्थ्यांच एक पथक बगालमध्यें तिथल्या दुष्काळग्रस्ताची सेवा करण्यासाठीं जाणार आहे मी पण त्यांच्याबरोबर जायच ठरवलं आहे "

—त्या दिवशीं आपण त्याला किती बोलल्ों हें आठवून पार्वतीकाकूंचा जीव कासावीस होऊ लागला त्यानीं पदरानें आपले डोळे पुसले आणि निराजनातली मंद होत जाणारी वात पुढें सारली

त्या दिवशी केशव धड न जेवताच झोपी गेला त्याचा हिरमुसला चेहरा पाहून पार्वती काकूंच्या हृदयावर आघात झाला केशवच जेवण होताच त्यांनीं अन्न तसेंच झाकून ठेवलें आणि व आपल्या वळकटीवर येऊन पडल्या.

रात्रभर त्याच्या डोळ्याला डोळा लागला नाही. आईकडून कधींहि एकसुद्धा कटु शब्द न ऐकलेल्या केशवच्या अत करणाची स्थिति, आई रागानें बोलल्यामुळें काय झाली असेल ह्या एका विचारानेंच त्याचे अत करण कासावीस होऊ लागले. झोंपेंत सुद्धा उदास दिसणाऱ्या केशवच्या चेहऱ्याकडे त्या अश्रू भरल्या डोळ्यानीं पहात होत्या त्यानी त्याच्या चेहऱ्यावरून नजर फिरविली खिडकीतून चद्र डोकावत होता क्षणभरात त्या चद्रबिंबाच्या ठिकाणीं त्याना आपल्या पतीचें मुखमडल दिसूं लागलें "पार्वती, माझ्या मुलाचा मला अभिमान वाटतो आणि तू–तू त्याला अडवतेस ? "

पार्वती काकूंचं अत करण पिळवटून निघालें त्या हळूच उठल्या आणि केशवच्या उशाशी येऊन बसल्या.

गालावर उष्ण अश्रूचे थेंब पडताच केशव उठून बसला

" आई तूं कां रडतेस ? मी जाणार म्हणून ? तुला इतक वाईट वाटत असेल तर नाहीं जाणार मी. " शेवटलें वाक्य मोठ्या प्रयासानें त्याच्या मुखावाटे बाहेर पडलें

" नको–नको–बाळ, तू जा बर माझी तुला पूर्ण परवानगी आहे " मोठ्या कष्टानें हुंदका दाबीत पार्वती काकूंनीं उत्तर दिलें

" खरच ! खरंच आई ! " केशव आनदानें उद्गारला

उरलेली रात्र केशवनें आईच्या कुशींत झोंपून काढली त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नता विलसत होती आकाशातल्या चांदण्या प्रफुल्ल नजरेनें त्या मायलेकराकडे बघत होत्या

—दुसऱ्या दिवशीं सकाळीं केशव गेला, तेव्हा पार्वती काकू आपलें दु ख त्याला दिसूं नये म्हणून सारख्या प्रयत्न करीत होत्या आपला मुलगा आपल्या वडिलाच्या पावलावर पाऊल टाकून चांगल्या कार्याकरता जाणार आहे आपलें दु ख त्याच्या दृष्टीस पडून उगीच त्याच्या मनाला अधिक दुखवू न ये असें त्यांना वाटू लागलें सकाळी उठून त्यांनी स्वत ला त्याच्या सामानासुमानाची बांधा-बांध करण्यात गुतवून घेतलें शेजारच्या पांडुरंगपंताची लहानगी सुमी त्याच्या-कडे तुळशीची पानें मागायला आली तिला हें कळताच ती आपले छोटे छोटे डोळे विस्फारून त्याच्याकडे बघत म्हणाली, " खरंच तुमचा केशव दादा फार फार चांगला आहे हो केशवदादा मला नेतोस का रे आपल्या बरोबर ? तिथ म्हणे माझ्या सारखीं लहान लहान मुलं सुद्धा उपाशी मुलाना दूध द्यायचं काम करीत असतात "

त्या एवढ्याशा पोरीचें बोलणें ऐकून पार्वतीकाकूंना कसेंसेंच वाटलें " ह्या एवढ्याशा मुलीला देखील असं वाटतं, आणि मी ? " त्याना आपण अपराधी असल्यासारखं वाटू लागलं

आता देवासमोर बसल्या बसल्या काकूंच्या कानात चिमुरड्या सुमीचे तेच शब्द घुमू लागले ' केशवदादा, मला नेतोस का रे आपल्या बरोबर ?

इतक्यात त्यांच्या कानावर सुमीचा आवाज आला

**" मना चंदनाचे परि त्वां झिजावें**
**तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें "**

बाहेर स्वच्छ उजाडलें होतें काकूंनीं समोरच्या ताम्हनांतल्या पाण्यानें डोळे स्वच्छ धुवून काढले आणि माजघरांत येऊन कोंपऱ्यातली पेटी उघडली. पेटीच्या अगदीं तळाच्या बोचक्यातून त्यांनी एक पाटल्याचा जोड बाहेर काढला केशव झाला त्यावेळीं केशवच्या वडिलांनी त्याना तो करून दिला होता पाटल्या एका कागदात व्यवस्थित गुडाळून त्या पडवींत आल्या आणि सुमीला त्यांनी हाक मारली

" काय म्हणतां काकू ?" "सुमी धावतच आली

" तुला त्या दिवशी धान्य मागायला आलेला केशवचा मित्र माहित आहे ना, त्याला हें नेऊन दे म्हणावं ह तुमच्या फडासाठीं आहे "

सुमी धांवतच निघाली पार्वतीकाकू ओरडून म्हणाल्या,

" सभाळून ग नाहींतर पाडशील बिडशील

# टांगेवाल्याचें राजकारण

त्या दिवशीचा त्याचा तो थाट पाहून मी थक्कच झालों ती पांढरीशुभ्र चुस्त बिजार, गुडघ्यापर्यंत लोंबणारी ती घेरेदार पांढरी शेरवानी, आणि राजमुकुटालाहि लाजवील अशा मिजासीनें डोक्यावर विराजमान झालेली लालभडक गोंडेदार टोपी मिशाचे आकडे सुद्धा नेहमींपेक्षा किंचित वर चढलेले होते चेहऱ्यावर उत्साह नुसता ओसंडत होता त्याची ती ऐसपैस प्रशस्त मूर्ती अशा सणासुदीला शोभणाऱ्या पोशाखात अतिशय लगबगीनें जाताना पाहून मला आश्चर्य वाटलें तर नवल नाहीं मी त्याला विचारलें, " क्यों मियां हबीब, एवढ्या थाटामाटान कुठ निघालास ? "

त्यानें मोठ्या अभिमानानें आपल्या छातीवरील हिरव्या बिल्ल्याकडे बोट दाखविलें आणि घाईघाईनें म्हटलें, " भाई, इस वख्त माफ करो अभी मरनेकोभी फुरसत नहीं है "

मी त्याच्या छातीवरील बिल्ला लक्षपूर्वक पाहिला परंतु मला त्याच्यापासून कांहींच बोध झाला नाहीं मी त्याला पुढें प्रश्न विचारणार होतों पण तो जो घाईघाईनें पुढें सटकला तो माझ्या जिभेवरचा प्रश्न तसाच राहून गेला तसाच मनातल्या मनात आश्चर्य करीत मी बगडगजाच्या मार्गाला लागलों

हबीब टांगेवाल्याला त्या नबाबी पोशाखात मी प्रथमच पाहिलें होतें मी रोज त्याला पाहीं तो डोक्याला एक कळकटलेली आणि गोंडा तुटलेली जुनाट लाल टोपी, अंगात लांब सदरा, त्यावर काळ्या साटिनाचें बुरसटलेलें जाकीट,

आणि कबरेभोंवतीं स्थूल पोटाच्या उघड दिसतील असे आखूड जाडें भरडें धोतर, अशा जामानिम्यात

हबीब टांगेवाल्याचा गावातील दर्जा काय होत तें मला माहित नाहीं पण आमच्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांत मात्र तो अतिशय लोकप्रिय होता सकाळी १० वाजता आम्ही कॉलेजपुढच्या देवळाजवळ चकाट्या पिटीत घटा होण्याची वाट पाहात असू त्यावेळीं बरोबर १०॥ च्या ठोक्याला हबीबची स्वारी प्रो. कानफाट्यांना घेऊन कॉलेजच्या दारासमोर उभी होई दुपारीं ३॥ वाजता आम्ही इतिहासाचा तास संपवून बाहेर यावें तो हबीब तिथे घोड्यापुढें गवत टाकून प्रोफेसरसाहेबाची वाट पाहात आपला विशाल देह टांग्यात आडवा टाकून पडलेला असायचा पधरा मिनिटें आम्ही त्याच्याशी गप्पा मारतों तो साहेबाची स्वारी यायची आणि टांग्यात बसून निघून जायची

हबीब अतिशय हजरजबाबी होता कॉलेजातील मुलें त्याची चेष्टा करायचीं आणि तोहि तशीच मजेदार उत्तरें द्यायचा हबीबचा देह भव्य होता, त्याच्या मिशा विशाल होत्या त्याच्या मळकट सदऱ्यावर झुलणाऱ्या जाकीटाच्या गुंड्या कधीच लागत नसत लोक यावरून त्याची टिंगल करीत एकदा एक चावट पोरटा त्याला उद्देशून म्हणाला, "ऐकलत रे, परवा हबीब वजन करायला म्हणून स्टेशनवरील पार्सलच्या काट्यावर उभा राहिला आणि काडकन् काटा मोडला रेल्वे नुकसान भरपाईची फिर्याद करणार आहे याच्यावर" हें ऐकतांच सगळीं मुलें खो खो हसली हबीबनें चटकन् उत्तर दिलें, 'अरे भाई, मी असा वजनदार आदमी समोर बसायला आहे म्हणून तर तुमचे प्रोफेसर आणि प्रोफेसरीणबाई या दोघानाहि एकदम मागें बसवून घेऊन जाऊ शकतों आहे दुसऱ्या टांगेवाल्याची ही हिंमत? साल्याच्या घोड्याचे पाय अस्मानात उडतील अस्मानात'"

त्याच्या या उत्तरावर दुसरा एक विद्यार्थी म्हणाला, "त्याच्या घोड्याचे पाय अस्मानात उडतील, पण तुझा घोडाच पाताळात जाईल तुम्हा तिघाच्या वजनान, त्याच काय?"

"अरे जा जा—हबीबचा घोडा म्हणजे काय समजलां तुम्ही इतराच्या घोड्याप्रमाणें मरतुकड तट्टू नाहीं तें असे छप्पन प्रोफेसर वाहून नेईल तो अर्जी जनाब, आप क्या समझे? आस्टरलियासे लाया है, आस्टरलियासे—'

हबीबला आपल्या घोड्याबद्दल आणि टांग्याबद्दल वाटणारा अभिमान अगदी सार्थ होता अगदीं उमदें व धिप्पाड जनावर होतें तें आणि हबीब त्याची काळजीहि तशीच घेई गोंड राजाच्या किल्ल्यांत पडक्या बुरुजावर

खोपटे बांधून राहाणारा हा दरिद्री टांगेवाला घोड्यासाठीं वाटेल तेवढा पैसा खर्च करायला तयार असे त्याच्या आयुष्यात त्याला अत्यंत प्रिय अशा तीन गोष्टी होत्या एक त्याची बिवी गुलशन, दुसरा त्याचा मुलगा अब्द्या, आणि तिसरा हा घोडा कधी कधी तो अब्द्याला टांग्यात बसवून घेऊन येई त्याच्या नाकातून वाहणाऱ्या गंगा यमुना आपल्या धोतरानें पुसत पुसत हबीब आम्हाला सांगायचा, "इसको भी तुम्हारे जैसा कालीजमें पढाकर उकील बनाबूंगा क्यों बे पढेगा ना ? फिर तुझे बाप जैसा टांगेमें बैठना नहीं पडेगा "

अब्द्याचें तो ज्या प्रमाणात कौतुक करी त्याच्या दसपट प्रमाणात तो आपल्या घोड्याची काळजी करीत असे एखाद्या दिवशीं पुरेसे पैसे मिळाले नाहींत तर स्वत उपाशी राही, बिबीला उपाशी ठेवी, एवढेच काय पण अब्द्याची सुद्धा एक पैशाच्या फुटाण्यावर बासलात लावी, पण घोड्याला मात्र रोजची चंदी वैरण चुकू देत नसे

त्याचा टांगा सुद्धा मोठा व्यवस्थित असे कुठें खळखळ नाहीं की खिटखिट नाहीं सगळे भाग कसे अगदी फिट्ट आणि पॉलिश लावलेले लाकडाच्या भागां-वर सर्वत्र नक्षीकाम केलेलें आणि जिथेंतिथें आरसे बसविलेले आतील गाद्या अगदी मऊ आणि त्याचे अभ्रे पांढरे स्वच्छ हबीब टांगा–घोड्यावर जो पैसा खर्च करी तें पाहून त्याच्या वर्गातले त्याचे भाऊबंद त्याच्यावर टीका करीत त्यांना तो म्हणे, "साले, हबीब क्या हरामका पैसा खानेवाला है ? गिऱ्हाकसे पैसा लेता हूं तो उनको पूरा आराम भी मिलना चाहिये "

दुसऱ्या दिवशी सकाळी १०॥ ची घंटा वाजली आणि हबीबचा टांगा कॉलेजच्या दरवाजाजवळ येऊन उभा राहिला माझ्या मनातील उत्सुकता अधि-कच जोरदार झाली मी तासाला चाट मारून हबीबलाच गांठण्याचें व त्याच्या-कडून खुलासा काढण्याचें ठरविलें प्रोफेसर्स पुस्तकांचें ओझें सांभाळीत सांभाळीत आत शिरले मुलं भराभर वर्गात शिरली आणि हबीबनें परत जाण्यासाठीं टांगा परतवला तोंच मी ओरडलों, " अरे हबीब मिया, जरा ठैरो तो "

मला पाहातांच तो एकदम म्हणाला "अरे भाई, माफ करना कल मुझे बिलकुल वख्त नहीं [illegible] आप शायद मुझपर खफा हुए हो "

" अरे कमेलें [illegible] बसला आहे खफा होण्याच तू काय चार चव्वल खाले आहेस माझ्या काकाचे मी तुझ्यावर रागवायला पण काल एवढ्या झोकात चालला होतास कुठं तू ? काल काय ईद बिद होती का कुठं शादी बिदी ? "

"ईद, आणि काल ? अरे बामणा, तुझा काय दिमाख बिमाख फिरला कीं काय ? या भलत्याच दिवसात कुठली काढलीस ईद ? "

मग काय शादी-बिदीला गेला होतास वाटत ? "

"छे-छे, शादी बिदी कांहीं नाहीं अरे, कल वो हमारा इलेक्शन था असेंब्लीका और मैं व्हालटर था वहां इसलिये इतनी जलदी और गडबड थी"

एऽऽ–इलेक्शन–असेंब्लीच–तुझा काय संबंध त्यात ? "

हबीबनें मला आश्चर्याचा दुसरा धक्का दिला रोज सकाळीं उठून दारासमोरचे घोड्याचें लीद साफ करणारा हा प्राणी आणि असेंब्लीच्या इलेक्शनच्या गोष्टी करतो ! माझा आपल्या कानावर विश्वासच बसेना मी त्याला म्हणालों, "अरे काय पागल झालास काय ? तुझा काय इलेक्शनशी संबंध ? टांगा सोडून राजकारण कधींपासून हाकायला लागलास तू ? " पण तेवढ्यांत माझ्या मनात एक विचार आला आणि मी किंचित् थांबून पुढें म्हणालो,

"अच्छा, अच्छा, आता आलं लक्ष्यात बरं मग किती पैसे मिळाले काल ओरडण्याबद्दल ? "

माझा प्रश्न ऐकताच हबीब एकदम उखडला हातातला चाबूक घट्ट आवळून तो म्हणाला, " हें बघा मिस्टर, तुम्हींच बोललात म्हणून या वेळीं ऐकून घेतो. दुसरा कोणी असता तर याच चाबकानं बडवून काढला असता काय समजता तुम्ही या हबीबला ? इलेक्शनच्या कामासाठी आणि मी पैसे घेईन ? मला काय कॉंग्रेसचा चवलीवाला व्हालटर समजलांत काय तुम्ही ? मी लीगवाला आहे म्हटल लीगवाला ! स्वतःच्या खिशांतले पैसे खर्च करून वोटर लोकांना चहा पाजला मी आज दिवसभर धंदा बंद करून टांगा दिला आहे फुकटात इलेक्शनच्या कामासाठी देशभक्तीच्या नावाखालीं पैसे मिळवणारे नव्होंत म्हटल आम्ही "

त्याचा चढलेला पारा वेगात वरच जात होता आपण भलताच गाढवपणा केला हे आता माझ्या चांगलं लक्ष्यात येऊन चुकलें होतें कशीबशी मी त्याची समजूत घातली आणि त्याला वाटेला लावलं

* * *

त्यानंतर चार आठ दिवसांची गोष्ट मी रस्त्यानें चाललो असता हबीब किल्ल्याच्या वेशीला लागूनच असलेल्या गुत्त्याच्या कट्ट्यावर चार दोन मित्रमंडळी समवेत फोकनाडा झोडीत बसला होता मला पाहताच तो ओरडला, ' अरे, आइये भाईसाहब, आइये जरा गरीबके तरफभी तो कुछ खयाल रखते जाइये "

मी जरा कांकू करू लागलो तेव्हां तो म्हणाला, अरे, बैठो यार जरा बिडी बिडी पिना और फिर जाना आपको चाहे उधर ”

मी त्याला म्हणालो, ' हबीब मिया, ताडाच्या झाडाखालीं बसून मनुष्य बालामृत प्यायला तरी लोक त्याच्यावर विश्वास ठेवायला तयार होत नाहीत ”

“ अरे, छोडो यार बिलकुलहि डरपोक हो तुम घेतला लोकानी संशय तर घेऊ दे काय आपल करणार आहेत ते ? माझा नाहीं लोक संशय घेत ? मला दारू पितो म्हणतात, गांजा ओढतो म्हणतात, आणखी पुष्कळ म्हणतात खर काय तें एका अल्लाला माहित पण मी करतों का कधीं त्याची पर्वा ? ”

त्याचं हें तत्वज्ञान मला मानवण्यासारखे नव्हतें विशेषत त्यानं मला आपल्या सगळ्या चगीभगी दोस्तासमोर डरपोक म्हटल्यामुळें तर मी जरा चिडलोंच मी त्याला म्हटलं, ' तुझ ठीक आहे बाबा, पण मी काही अजून तुझ्यासारखा हातात चाबूक घेऊन टांग्यावर बसलो नाही मला अब्रूनं दिवस काढायचे आहेत या जगात ”

“ अस्स ! म्हणजे आम्हाला अब्रू नाहीं वाटत ? ठीक आहे तुम्हा सफेद कपडेवाल्याना तस वाटायचच प्रामाणिकपणान मेहनत करून रोटी कमावण हें तुम्हाला कमीपणाच वाटणारच ऐदीपणान घरीं बसून दुसऱ्याच्या जिवावर चैन करणारा किंवा लाड्या लबाड्या करून पैसे कमावणारा हा तुमच्या दृष्टीन खरा अब्रूदार माणूस !

त्याच्या बोलण्यातील कडवटपणा मला आणखीच झोंबला आणि मीहि तितक्याच खवचटपणानं त्याला म्हणालों, “ एवढाच जर तुला प्रामाणिकपणाचा पुळका आहे तर मग आपल्या अबद्याला का बाबू बनविण्यासाठीं धडपडतोस ? ”

अबद्याचे नाव काढताच हबीबचा स्वर एकदम कोमल झाला तो म्हणाला, “ आपल्या मुलान चैनींत आणि आरामात आयुष्य काढाव अस कुणाला नाही वाटत ? अबद्या माझा मुलगा आहे आणि जगात त्याला कसलीहि तकलीफ होऊ नये म्हणून माझी धडपड आहे अप्रामाणिकपणाची आणि लाड्यालबाड्याची मला मोठी चीड आहे परंतु आज दुनियाच उलटी झाली आहे त्याला कोण काय करणार ? आजच्या जगात इमानान कष्ट करणारे उपाशी मरतात आणि बाबू बनून काहीं कष्ट न करता उडाणटप्पूपणा करणारे चैनींत मजा मारतात ’

आमच्या संभाषणात निर्माण झालेला अवघडपणा नाहींसा करण्यासाठीं मी थट्टेच्या सुरात त्याला म्हणालो, " अरे वा, तूं तर एखादा कम्युनिस्टा-सारखा व्याख्यान द्यायला लागलास ! "

" कम्युनिस्ट ! ये किस मर्ज का नाम है ? "

" मर्ज नाहीं तें एका जातीच नाव आहे ते लोक तुझ्यासारख्या दरिद्री आणि अज्ञानी लोकाना आपल्या तावडीत पकडतात त्याना सप करायला लाव-तात, त्यांच्या मिरवणुकी काढतात, त्यांच्याकडून मारामाऱ्या घडवून आणतात. ते लोकाना सागतात की हे श्रीमत तुम्हाला लुटतात, त्याना या जगांतून नष्ट करा त्यांची सपत्ती जप्त करा आणि सगळ्याना वाटून द्या कामगाराच व शेत-कऱ्यांचं जगात राज्य करा सर्व लोक जगात सारखे असले पाहिजेत अस सागून ते सगळ्या लोकाना भडकवीत असतात "

मी माझ्याकडून कम्युनिस्टाचे शक्य तितकें भयकर चित्र काढण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्याचा त्याच्यावर काही फारसा परिणाम झालेला दिसला नाहीं तो मला म्हणाला, " अरे वा, ये तो बडे अच्छे लोक मालुम होते हैं "

कांहीं तरी भयकर गोष्ट कानावर आदळावी तसा चेहरा करून मी म्हणालो, ' अच्छे लोक ! अरे तुला माहीत नाहीं हे लोक महाभयंकर आहेत वाटेल तशा थापा मारून लोकाना चिथवीत असतात अशा गोष्टी कधीं जगात घडल्या आहेत ? कांहीं तरी करून दंगा माजवायचा या लोकाचा प्रयत्न असतो अतिशय बदमाश लोक आहेत हे याचा धर्मावर विश्वास नाही, शादीवर विश्वास नाही बुरखा नष्ट करून बायका सगळ्यांच्या मालकीच्या करणार, मशिदी पाडून टाकणार,—"

मी आणखी पुष्कळ बोलणार होतों, पण मला मध्येंच थांबवून तो म्हणाला, ' जाने दो यार, कशाला पाहिजे आपल्याला या कटकटी ? कम्युनिस्ट काय चीज असते तें सुद्धां मी अजून पाहिलेल नाहीं मग कशाला पाहिजे आपल्याला त्याची भानगड ? आपली लीगच आपल्याला पुरेशी आहे '

हबीब लीगवाला झाला ही गोष्ट त्या दिवसापासून माझ्या मनात डाचत होती एका मामुली टांगेवाल्यानें राजकारणात लुडबुड करावी ही गोष्टच मुळी पहिल्यादा कुठल्याहि कायद्याला धरून नव्हती शूद्राला ज्याप्रमाणें वेदाध्ययनाचा हक्क नाहीं त्याचप्रमाणें टांगेवाला, रिक्षावाला, पाटीवाला, हमाल, इत्यादि भिका-रचोट लोकाना राजकारणाशीं लगट करण्याचा मुळींच अधिकार असू नये असें माझें प्रामाणिक मत होतें पण साऱ्या जगाला धुऱ्यावर बसविणारा हबीब काय माझ्या मताची पर्वा करणार ? तो राजकारणात पडलाच नुसता राजकारणातच पडला नाही, तर वर लीगवाला झाला

मी त्याला विचारलं, "काय रे हबीब, तुला ही अवदसा कशी आठवली ? तू कधीपासून लीगवाला झालास ?

"कधींपासून म्हणजे ' प्रत्येक मुसलमान हा मुळी लीगवालाच असतो जो लीगमध्यें नाहीं, तो मुळी मुसलमानच नाहीं

"अरे वा ! बरीच प्रगति केलेली दिसते तू मग आता तू इथ पाकिस्तान आणणार म्हणायचा ?"

'आणणार म्हणजे ! काहीं संशय आहे होय ? अरे मिया, पाकिस्तान मिळेपर्यंत दम घेणार नाहीं आम्ही "

'ठीक-ठीक मग पाकिस्तान झाल्यावर आम्हाला हाकून देणार म्हणतोस तू इथून "

"तोबा, तोबा ये क्या कह रहे हो आप ? आपको हकालके क्या करेंगे हम ? आपने क्या बिघाडा है हमारा ?"

' मग कशाला पाहिजे तुला पाकिस्तान ?"

माझ्या प्रश्नानें तो एकदम गोंधळात पडला काय उत्तर द्यावें हे त्याला सुचेना आपल्याला पाकिस्तान पाहिजे हं त्याला कळत होतें पण तें कशासाठीं हें त्याला कुणी सांगितलेंहि नव्हतें आणि याचा त्यानं आतापर्यंत विचारहि केला नव्हता. त्यामुळें मी एकाएकीं असा प्रश्न विचारतांच तो एकदम गोंधळात पड-ल्यास नवल नाहीं पण हबीब असा एकाएकी हार जाणारा मनुष्य नव्हता थोड्याच वेळात तो स्वत ला सावरून घेऊन म्हणाला, " हें बघा, असा आपला वकिली पेंच मला घालूं नका पाकिस्तान मिळाल कीं काय करायच तें मी अगदीं पक्क ठरवून ठेवल आहे पहिली गोष्ट म्हणजे तो त्या ५ नंबरच्या कपड्यांतला जॉबर महाद्या त्याला हाकलायचा तुम्हाला माहित नाहीं, पण साला बडा बदमाश आदमी आहे मी या गावात आलो तेव्हां मला काहीं काम धंदा नव्हता तेव्हा काम मिळावं म्हणून मी त्याच्याकडे गेलो भालदारपुऱ्यात तो माझा दोस्त आहे ना आबाजी तो घेऊन गेला होता मला त्याच्याकडे पण साल्यानं मला साफ नकार दिला कारण काय तर मी मुसलमान म्हणून अच्छा बेटा, देख लेंगे कहना तसेच ते तुमच्या चिटणीसपुऱ्यातले बामण त्यांचाहि पाकिस्तान आलें कीं खिमा करणार साले आम्हांला कुत्र्या इतकीहि किंमत द्यायला तयार नाहींत बायकामंडळी कुठ बाहेर जायची असली कीं म्हणतात, त्या मुसलमानाच्या टांग्यात नको, एखादा हिंदूचा टांगा बघा. जणू काहीं मुसलमान म्हटला कीं शराफतशीं त्याची अदावतच

असते स्वत मात्र साले दिवसांतून दहा चकरा मारत असतील गंगाजमनावर तसाच तो तुमच्या अखबारात लिहिणारा—काय साल्याच नाव आहे लक्षातहि राहात नाहीं. त्यान मारे रोज बोंब मारायला सुरवात केली आहे की मुसलमानाकडून हिंदु स्त्रियानीं बांगड्या भरून घेऊ नयेत म्हणून गरीब बिचारे इन मीन बोटावर मोजण्या इतके मुसलमान बांगड्या विकुन आपल पोट भरत आहेत, तर त्याच्या-बरहि त्याची गदा—"

आणि अशा रीतीनें हबीबने पाकिस्तानांतून हाकून लावायच्या लोकांची एक भली मोठी लांबलचक यादीच माझ्यापुढें मांडली दर महिन्याला त्याला भाड्यासाठी तंग करणारा गोंड राजाचा मुनीम, लाईट वाऱ्यान विझल्याचें निमित्त साधून त्याचा टांगा अडविणारा आणि त्याच्याकडून पैसे उकळणारा नाक्यावरचा पोलिस, त्याच्या एका चुलत चुलत्याच्या चुलत पुतण्याला सरकारी स्कॉलरशिप देण्याचें नाकारणारा स्कूल्स इन्स्पेक्टर, बुधवार बाजारात हमाली करणाऱ्या एका छत्तीसगडी हिंदु स्त्रीशी त्यानें लग्न लावलें म्हणून टाऊन हॉल-मध्यें जाहिर सभा भरवून त्याचा निषेध करणारे हिंदुत्वनिष्ठ पुढारी, इत्यादि बरेच लोक त्याच्या यादींत होते परंतु एवढ्यावरच हबीबची महत्वाकांक्षा थांबली नाहीं त्याच्या यादींत त्यानें नमूद केलेल्या लोकांची हकालपट्टी करण्याबरोबर त्याच्या आणखीहि कांहीं मागण्या होत्या त्याची बिबी किती तरी दिवसापासून नव्या रेशमी ओढणीसाठी त्याच्यामागें लागली होती परंतु किंमती भरमसाट वाढल्यामुळें त्याला तिची ती हौस पुरी करणें कधींच शक्य झालें नव्हतें पाकिस्तान येतांच ओढणीच्या किंमती ताबडतोब कमी होऊन त्याच्या बिबीची हौस पुरी झाली पाहिजे अशी त्याची अत्यंत महत्वाची मागणी होती त्याशिवाय त्याच्या अब्दाला 'वकील' बनविण्याचा सवाल होताच साऱ्या नागपुरात एकच उर्दू हायस्कूल आहे आणि त्याचा हेडमास्तर उगीचच फी मागतो अशी हबीबची तक्रार होती आपल्या अब्दाला हायस्कुलात फुकट प्रवेश मिळाला पाहिजे किंवा निदान शिक्षणाला आवश्यक तेवढा पैसा तरी मिळाला पाहिजे अशी हबीबची दुसरी महत्वाची मागणी होती मास्तरावर कृपाळू होऊन पुस्तकाचे पैसे तेवढे स्वत खर्च करायची हबीबची तयारी होती परतु वर एक कवडीहि खर्च करायला तो तयार नव्हता. कारण तेवढी त्याची ताकतच नव्हती परतु 'अब्दाला' निव्वळ 'वकील' बनवूनहि प्रश्न कायमचा सुटत नव्हता वकील झाल्यावर त्याला ताबडतोब चांगली नोकरी मिळाली पाहिजे अशीहि त्याची मागणी होती, कारण म्हातारपणींहि टांग्यावर बसूनच दिवस

काढण्याची त्याची मुळींच तयारी नव्हती तो म्हणाला, " अजी, एक बार अबद्याको नोकरी तो लगने दो, मै चला सीधा मक्का "

हबीबच्या अशाच आणखी किती तरी छोट्या मोठ्या मागण्या होत्या आणि त्यासाठी त्याला पाकिस्तान पाहिजे होतें हिंदूंचें राज्य असतांना या गोष्टी मिळ-तील अशी खात्री त्याला वाटत नव्हती तो म्हणाला, ' कारखाने उनके, धंदा उनका, बेपार उन्हीका, सरकारी अफसर–वो भी उन्हीके इस्कूलें भी उनकी-सब चीजें उन्हीके हाथमें—फिर हमारा क्या ? "

हबीबनें हा जो पाकिस्तानचा नकाशा माझ्या नजरेपुढें उभा केला तो पाहून माझी मति अगदीं गुग झाली आदल्याच दिवशीं मी जिनासाहेबाचें एक जोरदार वक्तव्य वाचलें होतें त्यांत ते म्हणाले होते की मुस्लिम हें एक स्वतंत्र राष्ट्र असून हिंदु आणि मुसलमान हे कधींहि एकत्र राहाणें शक्य नाहीं बहुधा हबीबनें तें वाचलें नसावें, कारण तो मला पाकिस्तानमध्यें राहूं द्यायला तयार होता एवढेंच नव्हे तर थोडे मूठभर लोक सोडून बाकीच्या सर्वच असुस्लिमाना तो आपल्या अगदी घराशेजारीं जागा द्यायला तयार होता जिनासाहेबाच्या आणि हबीबच्या पाकिस्तानमधील ही तफावत पाहून मला कमालीचें आश्चर्य वाटलें आणि मी त्याला म्हटलें, "तुझी ही पाकिस्तानची कल्पना मोठी रम्य आहे बिबीला रेशमी ओढणी, अबद्याला शिक्षण आणि नोकरी, आणि तुला म्हातारपणीं मक्केची यात्रा यापेक्षा आणखी काय पाहिजे माणसाला ? पण काय रे, तुझा तो मौलाना आणणार का हे असलेंच पाकिस्तान ? "

अरे वो साला मादरचोद क्या करेगा ? सालेकी सारी जिंदगी गोवन-साहाबके जुते चाटते चाटते गई और वो पाकिस्तान लानेवाला है ? "

हबीबनें अचानक पवित्रा बदललेला पाहून मी स्तमितच झालों मला वाटलें तो आपल्या नालायक उमेदवाराचें तावातावानें समर्थन करायचा प्रयत्न करील पण तसें कांहीं न करता तो त्याला एक शिवी हासडून मोकळा झाला मी त्याला विचारलें, असें जर आहे तर मग तू त्याला निवडून देण्यासाठीं एवढा का धडपडत होतास ? "

माझ्या अज्ञानाबद्दल कीव प्रदर्शित करणारे भाव चेहऱ्यावर आणून तो म्हणाला, " तुम्हे नहीं समझनेका वो. आम्ही त्याला निवडून दिलं नाही, लीगला निवडून दिलं आहे लीगहि पाकिस्तान लानेवाली है, बस्स, पाकिस्तान आनेहि दो फिर ये गधे के बच्चेको टांग पकडकर फेंक देंगे मुनसीपालटीके गडरमें "

क्र. २६२१८ ...